**प्रस्तावना :** भारतीय समाजाचे जाती हे अद्वितीय वैशिष्ट आहे. काही अभ्यासक जपान, अफ्रीका, पॉलिनेशिया सारख्या देशात जाती सदृश्य (Cast Like) व्यवस्था असल्याचा निर्देश करतात, परंतु अनेक समाजशास्त्र आणि मानवशास्त्रांनी हे मत नाकारले असून, त्यांच्या मते, जाती हे भारतीय समाजाचेच वैशिष्टे असून ती सर्व व्यापार आणि मूलभूत संस्था आहे. जाती आधारे भारतीय समाजाचे उच्च - निम्न स्तरात विभाजन झाले आहे. हिंदू समाज घटकांचे जन्मापासून मृत्युपर्यंत जातीद्वारे नियमन केले जाते. वर्तनाचे संकेत, संबंधाचे स्वरुप आर्थिक जीवनाचे निर्धारण, धमचि वर्तनाचे आदर्श एकूण संपूर्ण जीवनाचे नियंत्रन जाती प्रमाणकांनी केले जाते. हिंदू धर्मिय आणि जाती यात एक अनुबंध आहे. असे सर्व साधारण विधान केले जात असले तरी मुस्लीम धर्मियात १९०१ च्या जनगणनेप्रमाणे मुस्लीम धर्म सांगणा-या १३३ जातींची नोंद केली आहे. ख्रिश्चन, जैन, शीख, ज्यु, धर्मियात जाती आढळतात. बौध्द धर्मात जातींना स्थान नसले तरी श्रीलंकेतील सिंहली ह्या बौध्द धर्मियात जाती समूह दिसतात. येथे हे स्पष्ट केले पाहिजे की, इतरदेशातील मुस्लीम, ख्रिश्चन धर्मियात पंथभेद प्रकर्षाने आहेत. मात्र जाती नाहीत भारतातील विभिन्न धर्मियात जाती असणे हे धर्मांतराचे फलीत असावे.

**जातीचा अर्थ : (Meaning of Caste)** जातीसाठी इंग्रजीत (Caste) असा प्रतिशब्द आहे. हा शब्द म्हणजे वंश ह्या पोर्तुगीज भाषेतील शब्दावरून रूढ झाला आहे. त्याचा अर्थ जन्माने मिळणारा समूह तसेच वंशानुक्रमाने चालणारा समुह असा होतो. जाती ही मराठी भाषेतील शब्द जन या संस्कृत धातूपासून बनला आहे. त्याचा अर्थ जन्म असा होतो. एकुण जन्माने मिळणारा समूह म्हणजे जाती होय. जाती चा उल्लेख प्राचीन काळापासून केलेला आढळतो. जातीचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास अनेक विदेषी आणि ऐतिहासिक अभ्यासकांनी केला आहे. त्यात जनगणना आयुक्त सामाजिक मानवशास्त्रज्ञ सहा आहेत. जे एच. हट्टन, नेसफिल्ड, क्रोबर, गो.स.घुर्ये, इरावती कर्वे, एम.एन. श्रीनिवास, एन. के. दतत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. व्य. केतकर, वगैरे अभ्यासकांचा प्राध्यानाने उल्लेख करता येईल.

**चार्लस कुल** (C.H.Cooley) : जेव्हा वर्ग विशेष करून अनुवंशाने ठरतो, तेव्हा त्याला जात असे म्हणतात. ("When a class is some hat strictly hereditary we may call it a caste."

इरावती कर्वे (Iravati Karve) म्हणतात ती म्हणजे एक विस्तारित कुटूंब होय. v ("Caste is an extended family.") – Karve

डॉ. श्री. व्यं. केतकर जातीची दोन ठळक वैशिष्ट्ये सांगतात १. जातीचा सदस्यता अनुवंशाने मिळते. २. जाती अंतर्विवाही असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मते, जातीतील अंतर्विवाहातून (Endogamy) जाती शतकानुशतकापासून टिकुन आहे. सेनॉर्ट ने वंश व व्यवसायाचा शुध्दतेवर भर दिला आहे. लुई डुमॉने शुध्दता - विटाळ यावर जाती आधारित असल्याचे म्हटले आहे. एम. एन. श्रीनिवास (M.N. Shrinivas) यांच्या व्याख्येनूसार, जाती हा एक वंशानुक्रमाने मिळणारा अंतर्विवाही समूह असून तो स्थानिक असतो. तसेच त्याचा एक पंरपरागत व्यवसाय असतो. जातीला स्थानिक, सामाजिक सस्तंरणात एक विशिष्ट स्थान असते. या व्यवस्थेत व्यक्ती विशिष्ट जातीत जन्म घेते आणि तिला जातीनुरूप दर्जा मिळते. व भूमिका वठवाव्या लागतात.

**जाती व्यवस्थेची वैशिष्ट्ये : (Characteristics of Caste)**

१समाजाची खंडात्मक विभागणी (Segmental Division of Society)भारतीय समाजाची जाती - उपजातीचे आधारे असंख्य खंडात विभागणी झालेली आहे. प्रत्येक जाती - उपजतीची विशेष जीवनशैली विकसित झाली आहे. जातीचे सभासदत्व जन्माने मिळते आणि ते कायम असते. एकप्रकारे जातीचे स्वतंत्र विश्व असते. ही जीवन पध्दती एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे संक्रमित होते. त्यामुळे जातीचे खंड सातत्याने प्रत्ययास येतात. इतकेच नाही तर जाती स्वयंकेंद्रियतेची धारणा खंडांना टिकवून ठेवण्यात मदत करीत असते.

२ अधिकम व्यवस्था (Hierachal Order) कोबरचे मते अंतर्विवाहामुळे जातीतील संस्तरणाला पक्के केले आहे. मॅक्सवेबर यांनी जातीला बंद दर्जा समूह ;बसवेमक`जंजने हतवनचद्ध असे म्हटले आहे. हा दर्जा प्रदत्त (ascriptive) असतो. एकप्रकारे जातीमध्ये आणि त्यांच्यातील पोटजातीत दर्जाची उतरंड असते. या उतरंडीच्या वरच्या टोकांवर ब्राम्हण जात असून यानंतर प्रादेशिक वैशिष्ट्यानूसार संस्तरणाची मांडणी केली जाते. जसे - ब्राम्हणानंतर क्षत्रिय वर्णाचा दावा करणा-या जाती येतात. अर्थात हा सुध्दा एक वादाचा मुधा आहे. कारण भटक्या, आदिवासी जातीपासून क्षत्रियाचा दावा करण्यात येते. ह्या जातीगटांमध्ये सामाजिक अंतर (Social disturbance) कायम ठेवलेले असते. तसेच वरच्या जातींना विशेषाधिकार असतात

३ सदस्यत्व (Membership)जातीचे सदस्यत्व जन्माने मिळते आणि या वंशात जन्माला येणारी अपत्ये त्या जातीची ठरतात. हे सदस्यत्व कायम असते. त्यात बदल करता येत नाही. व्यक्तीला जन्माने मिळालेला जातीचा दर्जा प्राप्त होतो. जातीतील जन्माची मीमांसा कर्मसिध्दांताने केली जात असे. संस्कृतीकरणाच्या प्रकियेत काही जातींनी वरच्या वर्णात समाविष्ट होण्याचे प्रयतन केलेले आढळतात. मात्र जाती संस्तरणात गतिशीलतेचा अभाव जाणवतो.

४ अंतर्विवाह (Endogamuy)जाति अंतर्विवाही असते. या वैशिष्ट्यांचा उल्लेख केतकर, कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वगैरे बहुतांशी समजातशास्त्रांनी केला आहे. जातिअंतर्विवाही असतेच, परंतु वास्तविक अर्थाने पोटजात अंतर्विवाही असते. जीवनशैलीतील समानता, हे त्यात प्रधानकारक सांगता येते. जातीपंचायतीचा दबाव, पारंपारीक मनोवृत्ती समाजमान्यता, विवाहस्तर, जीवनातील तडजोडीत यश ह्या बाज तितक्याच महत्वाच्या ठरतात. स्वजातीचे श्रेष्ठतव जोपासण्याची प्रवृत्ती यांच्या मुळाशी दिसते. परंतु अंतर्विवाहामुळे सामाजिक अभिसरणाची वाट बंद झाली, हे लक्षात घ्यावे लागते.

५ पारंपारीक व्यवसाय :;Traditional occupation)प्रत्येक जातीचा विशिष्ट व्यवसाय होता. हा व्यवसाय परंपरेने चालत असे व व्यक्तींना व्यवसाय निवडीची संधी व गरजही नव्हती. साधारणः ग्रामीण जीवनातील गरजांशी संबंधित व्यवसाय होते. अशा व्यवसायांची



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

संख्या मर्यादित होती. वरच्या जातीचे व्यवसाय पवित्र मानण्यात येईल. (उदा. ब्राम्हण) त्यानंतरच्या व्यवसायाच्या दर्जात उतरंड होती. बलुतेदारी व्यवस्थेमुळे जाती आणि व्यवसायाचा संबंध दृढ झालेला होता. व्यवसायात बदल करण्याचे स्वातंत्र नव्हते. (अपवाद - सेनादलातील नोकरी) खालच्या जातीचे व्यवसाय अपवित्र व नफा न देणारे होते. व्यवसाय विभाजनातून जातीनिष्ठ विषम सामाजिक रचना पक्की झालेली आढळते. प्रामुख्याने जातीचा उल्लेख व्यवसाय नावाने करण्यात येई. (नेसफिल्डचा सिध्दांत) शासन दरबारी व्यक्तीची निर्देश जाती नामाने होत असे- सर्व वरच्या जाती त्यांच्यापेक्षा खालच्या जातीवर सामाजिक बंधने टाकीत. त्यामुळे तळागाळाच्या जातीवर निर्बंध होते. अस्पृश्यांची समस्या यातुनच उदभवून पक्की झालेली आढळते. पवित्र - अपवित्रेच्या धारणेतून सामाजिक अंतर ठेवले जाई. अस्पृश्य जातीना मंदिर प्रवेश, धार्मिक ग्रंथाचे वाचन, संस्कृतचे अध्ययन, सण संस्कारावर निर्बंध होते. जन्म, मृत्यू व काही कारणांनी विटाळ पाळल्या जाई. परंतू काही जातीचा विटाळ हा कायम स्वरूपाचा होता. त्यांच्या शुध्दिकरणाची कोणतीही व्यवस्था नव्हती. बहुतांशी अस्पृश्य जातीची वस्ती गावाच्या बाहेर होती.

## जातीचे गुण (Merits of caste)

१. सामाजिक कार्ये (Social Functions)

(अ) जातीच्या माध्यमातून सामाजिक वारशाचे संक्रमण (Transmission of Social heritage) जातीची सदस्यता जन्माने मिळते. जातीच्या परिवेशात बालकचे संगोपन होते. या प्रक्रियेत वडिलधारी मंडळी बालकाला सामाजिक वर्तनाचे शिक्षण देतात. प्रथा, पंरपरा, चालिरीतीचा परिचय करून देण्यात येतो. त्या जातीची गुण वैशिष्ट्ये बालक आत्मसात करते. त्यांच्या वर्तनातून सामाजिक वारसा अंगिकारल्याचा ठसा ठळकपणे प्रत्ययास येतो. (ब) जाती सदस्यास दर्जा (Status) प्रदान करते. या दर्जाचे स्वरूप प्रदत्त असते. दर्जानुरूप व्यक्तीला भूमिका पार पाडाव्या लागतात. भूमिका कशा वठवाव्या हे जाती संकेताने ठरते.(क) समाजीकरण (Socialization) चे कार्य जातीच्या माध्यमातून संपन्न होते. त्यात कुटूंब, शेजार आणि जाती घटकातील सदस्यांचे योगदान असते. जातीतील संकेत, विश्वास, प्रथा, परंपरा, भाषा एकुण जीवनपध्दतीचा स्वीकार बालकाने करावा यासाठी सतत प्रयत्न केले जातात. त्यामुळेच जातीची गुण वैशिष्ट्ये बालकाच्या वर्तनात प्रतिबिंबित होतात. (ड) जाती आपल्या सदस्यांना सामाजिक सुरक्षा (Social Security) प्रदान करते. कोणत्याही संकटाचे प्रसंगी जाती सदस्य परस्परांना मदत करण्यासाठी तत्पर असतात. सदस्यांमध्ये असलेल्या आम्ही भावनेतून (We feeling) हे कार्य अग्रक्रमाने पार पाडले जाते. जाती संघटनांनी या संदर्भात संस्थात्मक उभारणी केली आहे.(इ) सामाजिक नियंत्रण (Social Control) जेव्हा व्यक्ती जाती परिघात जीवन घालवितात तेव्हा जातीने प्रभावित केलेल्या वर्तन प्रकाराचे अनुसरण करतात. जातीचे नियम मोडणे कठीण असते. यात लोकनिंदा समाविष्ठ असते. जाती पंचायत नियंत्रणाचे कार्य करते. जातीच्या नियमांच्या विरोधी वर्तन करणा-यांना जातीबाहेर टाकले जात असे. अर्थात आजही पध्दती क्वचितच आढळते.(फ) जाती सदस्य आणि विशेषत: जाती सदस्यांमध्ये नाते संबंध असतात. त्यांची जीवनपध्दती सारखी असते. सण, उत्सव, कुळाचारात, धार्मिक, विधीमध्ये ते सहभागी होतात. त्यामुळे जाती घटकात ऐक्यांची भावना (Integration) प्रबळ असते. निवडणुकाच्या कालखंडात ही भावना प्रकर्षाने नजरेत येते.

२२. मानसिक कार्य (Psychological Function)जाती गटातून सदस्यांना मानसिक सुरक्षा (Security) प्राप्त होते. सामाजिक आर्थिक तसेच नैसर्गिक संकटाचे काळात जातीघटक एक दुस-यांना मदत करतात. ठिकठिकाणी कार्यान्वित असलेली जाती मंडळे (Caster assocation) याचे प्रतिक आहेत. जातीसदस्यांच्या सहवासातूनच व्यक्ती मानसिक समाधानाचा अनुभव घेतात. परस्परांच्या सुखदु:खात सहभागी होतात.

३. आर्थिक कार्ये (Economic Function)(अ) पुर्वी प्रत्येक जातीचा स्वतंत्र व्यवसाय होता. या व्यवसायाचे ज्ञान कुटूंब सदस्यांच्या द्वारा पुढच्या पिढीतील व्यक्तींना मिळत असे. त्यामुळे व्यवसायातील कसब वाढत असे. त्यातील बारकावे लक्षात घेतले जातात. आता जाती आणि व्यवसायाचा संबंध कोणीही लक्षात घेत नसले तरी आजही काही व्यवसायाचे ज्ञान पारंपारीक पध्दतीनेच संक्रमित केले जाते. उदा. न्हावी, सोनार, शेतीचा व्यवसाय, इ.(ब) जाती आपल्या सदस्यांना आर्थिक सुरक्षा (Economic Security) प्रदान करतात. अवर्षण, अतिवर्षण, दुष्काळ, आणि इतर नैसर्गिक आणि मानवी संकटाचे काळात स्वजातीस आर्थिक मदत करण्याची जबाबदारी मानली जाते. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे, शिष्यवृत्या, अधिकोषातून कर्ज देण्याची सुविधा ही उदाहरणे आर्थिक सुरक्षेत सम्मिलित होतात.

याच बरोबर धार्मिक वारशाचे संक्रमण जातीतून केले जाते. वर्तमान काळात राजकीय जीवनात जातीचा प्रभाव वाढलेला आहे.

## जातीचे दोष (Demerits of Caste)

१) लोकशाही विरोधी (Undemocratic)

जातीचा आधार विषमता आहे. ती व्यक्तीच्या दृष्टीने न बदलणारी चौकट आहे. तसेच जातीने प्रदत्त दर्जा प्राप्त होतो. हा दर्जा कायम असतो. ही जातीची वैशिष्ट्ये लोकशाही विरोधी आहेत. स्वातंत्र्य समता, बंधुत्व आणि समान न्याय ह्या मूल्यांना छेद देणारी आहेत. त्यामुळे घटनेत १५ व्या कलमान्वये जन्म, लिंग, धर्म, भाषा व तत्सम आधारानुसार प्रत्ययास येणा-या



Scanned by CamScanner

विषमतेला नाकारण्यात आले आणि समतेचा पुरस्कार केला आहे. जातीभेद पूर्णतः नाकारण्यात आला आहे. सारांश, जाती लोकशाही विरोधी व्यवस्था ठरली आहे.

२) अस्पृश्यता (Untouchability)जाती प्रथेतून अस्पृश्यता जन्मास आली आहे. जातीतील श्रेष्ठ-कनिष्ठतेची धारणा, पवित्रता आणि विटाळांची संकल्पना अस्पृश्यतेला कारणीभूत आहे. ब्राम्हण वगळून खालच्या सर्व जाती कोणत्या ना कोणत्या प्रकाणात अस्पृश्य आहेत. अस्पृश्यतेचे संचयी स्वरूप सर्वात खालच्या जातीसंबंधात आढळते. अस्पृश्यावर टाकलेली बंधने त्यांचे माणूसकीला काळीमा फासणारे जीवन, दारिद्रिय, उपेक्षा, शोषणासाठी जाती व्यवस्था जबाबदारी आहे. गुलामापेक्षा अतिशय उपेक्षेचे जीवन अस्पृश्यांना जातीप्रथेमुळे शतकानुशतके जगावे लागले. एकुण, जातीचे वाईट फलीत म्हणजे अस्पृश्यता होय.

३) स्त्रियांचा निम्न दर्जा (Low status of Women)जाती व्यवस्थेची बंधने सर्व जातींवर आणि जाती घटकांवर होतीत्र स्त्रियांवर होणा-या अन्यायासाठी जातीप्रथा जबाबदार आहे. जातीत पुरूषसत्तेची जोपासना केली असून स्त्रियांना अनाधिकारी ठरविले आहे. सर्व सण, समारंभ, संस्कारात त्यांचे स्थान दुय्यम असून सतीप्रथा, बालविवाह, विधवाविवाहास प्रतिबंध, केशवपन, अत्याचाराचे पोषण जाती घटकांनी केले आहे. स्त्रियांचे जीवन दुर्लक्षित आणि उपेक्षित बनलेले दिसते. परंपरेने स्त्री-पुरूश समानतेचे गोडवे गायिलेले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र विषमता हेच वर्तनाचे सूत्र आहे. थोडक्यात, स्त्रियांच्या निम्न दर्जासाठी जातीप्रथा जबाबदार आहे.

४) सामाजिक गतिशिलतेस अडथळा (Obstacles of Social Mobility) जाती व्यवस्था सामाजिक गतिशिलते बरोबर व्यावसायिक आणि स्थानिक गतिशिलतेस सुध्दा विरोधक आहे. ग्रामीण समुदायाचे अविभाज्य वैशिष्टय असलेल्या जातीव्यवस्थेत सदस्यांना पारंपारीक व्यवसाय करण्यावर बंधन होते, म्हणजेच व्यावसायिक गतिशिलतेला कोणतेही स्थान नव्हते. व्यावसायिक प्रगती असंभव होती. लोकांचे जीवन गावाच्या कक्षेत घालविल्या जाई. त्यातून स्थानिक गतिशिलतेला संधी नव्हती. बलुतेदारी व्यवस्थेमुळे लोकांच्या गरजा भागविल्या जात, त्यामुळे गतिशिलतेची गरज आणि आकांक्षा लोकांच्या मनात नव्हती. एका जातीतून वरच्या किंवा खालच्या स्तरात जाण्याचे मार्ग बंद होते. एकुण जाती सामाजिक गतिशिलतेच्या मार्गात अडथळा होती.

५) आर्थिक विकासाला बाधक (Hindirance to Economic Development)जाती व्यवस्थेत आर्थिक उन्नतीसाठी लागणा-या प्रेरणांचा अभाव होता. जातीच्या परंपरागत व्यवसायोच बंधन, बंद स्तररचना, परंपरावादी मनोवृत्ती या कारणांमुळे सदस्यांना जातीने दिलेला व्यवसाय करण्यावाचून गत्यंतर नव्हते. एखादया व्यक्तीजवळ दुस-या व्यवसायास लागणारे कौशल्य असले तरी लोकबंधनामुळे त्याला व्यवसाय बदलाचे मार्ग बंद होते. वरच्या जातीचे व्यवसाय गरजा भागवून नफा देणारे होते. परंतु शेवटच्याबदलाचे मार्ग बंद होते. वरच्या जातीचे व्यवसाय गरजा भागवून नफा देणारे होते. परंतु षेवटया स्तरातील लोकांचे व्यवसाय निव्वळ न्यूनतम गरजा भागविण्याशी जुळलेले होते. त्या व्यवसायाचे स्वरूपही गलिच्छ आणि निम्न प्रतीचे होते. जातीतून व्यवसायाच्या विभाजनाबरोबर माणसांचे विभाजन होवून एक प्रकारची स्थायी विषमता निर्माण झालेली होती.

**निष्कर्ष** :जातीयता कमी करण्यासाठी शाळा, महाविद्यालये, वसतीगृहे, आरोग्य केंद्रे, शिरगणती, संस्था संघटनांमधून जी जातीची नोंद होते ती थांबविली पाहिजे. जातीय पक्ष, संघटना, संस्था यांच्यावर बंदी घातली पाहिजे. शिक्षणाद्वारे आणि प्रचार माध्यमांद्वारे जनतेला, सुशिक्षित, सुजान बनविले पाहिजे. आर्थिक विषमता, दारिद्रिय, बेकारी, वैमनस्य इत्यादी घटक प्रामुख्याने जातीय दंगली निर्माण होण्यसास कारणीभूत असतात. तेव्हा या घटकांच्या विकासाच्या दृष्टीने शासनाने प्रयतन करणे गरजेचे आहेत. त्यासाठी केंद्रसरकारने विकासात्मक अशा विविध उपाययोजना आखल्या पाहिजेत. जातीयतेचा फायदा घेऊन निवडणुक लढविणा-या उमेदवाराला शासनाने निवडणुक लढविण्यास बंदी घातली पाहिजे. केवळ अशा संविधानात्मक तरतूदी करून जातीयतेचा प्रश्न सोडविणे शक्य होणार नाही. त्यासाठी शासनाबरोबरच, राजकीय कार्यकर्ते आणि जनता यांनी जबाबदारीने जाणिवपूर्वक जातीवाद जातीय निर्मुलनाचे कार्य सातत्याने केले पाहिजे. तेव्हाच काही प्रमाणात का होइना जातीयतातील अडसर दूर होऊ शकेल.

<u>**संदर्भ :**</u>


1 बी.बी. पाटील - 'भारतीय शासन आणि राजकारण' प्रकाशन फडके, कोल्हापूर, पाचवी आवृत्ती जानेवारी २०१२

2 डॉ. वा.भा. पाटील - 'भारतीय राज्यघटना' प्रशांत पब्लीकेशन्स, प्रथम आवृत्ती जून२०१२

3 डॉ. विजय तुंटे डॉ. संदिप नेरकर 'भारतीय राज्यव्यवस्था' प्रशांत प्रशांत पब्लीकेशन्स, प्रथम आवृत्ती २०११

4 माधव गोडबोले 'भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरिक्षा' राजहंस प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०१२

5 भा.ल. भोळे 'भारतीय शासन आणि राजकारण' पिंपळापूरे बुक डिस्ट्रीब्युटर्स दुसरी आवृत्ती, नागपूर, नोव्हें २००७




Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# महात्मा ज्योतिराव फुले : भारतीय सामाजिक क्रांतीचे प्रणेते

प्रा. रिता धांडेकर, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर मोबाईल नं.९८९०२२५०२०

**प्रस्तावना:**एकोणिसावे शतक हे भारतातील वैचारिक मंथनाचे शतक होते. या शतकात जे काही घडले ते अभूतपूर्व होते व त्याने भारतीय समाजांतर्गत बदलाचे एक महत्त्वाचे पर्व सुरु झाले. हे जे समाजांतर्गत बदल होते त्यांना सर्वसाधारणपणे 'सामाजिक सुधारणा' असा मूल्यवाचक शब्द वापरला जातो आणि या काळाला सामाजिक सुधारणांचा प्रारंभकाळ असे संबोधिले जाते. भारतीय संदर्भात सामाजिक सुधारणा या संज्ञेचे स्वरुप पुढीलप्रमाणे मांडता येईल जी विचारप्रणाली जातीसंबंधातील सुधार किंवा जातीव्यवस्थेचे विसर्जन, स्त्रियांचे समान हक्क, बालविवाह विरोध, विधवा पुनर्विवाह, सामाजिक व वैधानिक विषमतेविरुध्द लढा यांचे समर्थन करते. त्या विचारप्रणालीस व त्या अनुषंगाने होणाऱ्या कार्यास सामाजिक सुधारणा म्हणता येते. खरे पाहता ही समाजसुधारणेची शास्त्रीय व्याख्या नसून ऐतिहासिक अवलोकनानंतर केलेली मांडणी आहे. या संदर्भात सामाजिक सुधारणांचा अर्थ पुढील चार प्रकारे स्पष्ट करता येतो.

१) समाजाच्या पारंपारिक मुल्यांच्या चौकटीत व्यक्ती किंवा व्यक्ती समुहाला दिल्या जाणाऱ्या स्थानात किंवा वागणुकीत प्रस्तावित केलेला बदल.

२) समाजाच्या मूळ चौकटीला धक्का न लावता काही मर्यादित बदल करुन व्यक्ती–व्यक्ती आणि व्यक्तीसमूह यांच्यातील परस्पर संबंधातील प्रस्तावित बदल.

३) समाजाच्या धार्मिक, नैतिक मूल्यांच्या पांरपारिक चौकटीत संस्थात्मक बदल घडवून आणणे त्यायोगे व्यक्ती–व्यक्ती किंवा व्यक्तीसमूहांच्या परस्पर संबंधातील प्रस्तावित संस्थात्मक बदल आणि

४) वैश्विक स्वरुपाच्या नैतिक मूल्यांवर आधारित समाजाच्या चौकटीत व्यक्ती–व्यक्ती आणि व्यक्तीसमूहातील संस्थात्मक संबंधातील प्रस्तावित मूलगामी बदल.

यापैकी एक किंवा अनेक किंवा सर्व प्रकारचे बदल म्हणजे सामाजिक सुधारणा होय.[१]

वरील विवेचनाच्या संदर्भात एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. या विवेचनात 'बदल' आणि 'सुधारणा' हया संज्ञा परस्परांना पर्यायी म्हणून वापरल्या आहेत. हे तत्त्वत: अयोग्य आहे. तरीही त्या वापरल्या जातात याचे कारण आजही बदल म्हणजे सुधारणा हे समीकरण अनेकदा रुढ झालेले दिसते. बदल ही एक ऐतिहासिक प्रक्रिया आहे. बदलाच्या संदर्भात स्थळ, काळ, व्यक्ती आणि समाज हे चार अनुबंध मानले तर स्थळ, वगळता बाकीचे तीनही अनुबंध कुठल्याही प्रेरकाशिवाय काळाच्या ओघात बदलतात. हा असा काळाचा ओघात घडून आलेला बदल ही सुधारणा नसते. सुधारणा या संज्ञेत निश्चित उद्दिष्ट असते. निश्चित दिशेने झालेले प्रयत्न असतात म्हणजे अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी केलेली शाब्दिक व प्रत्यक्ष कृती म्हणजे सुधारणा होय असे सुधारणेचे स्वरुप सांगता येईल. यावरुन 'सामाजिक सुधारणा' या संकल्पनेत असाच उद्दिष्टानुगामी बदल अभिप्रेत असतो असे म्हणता येईल.

सामाजिक शब्दाचा अर्थ लक्षात घेता हे स्पष्ट होते की व्यक्तीचे स्थान अथवा अस्तित्व समाजमान्य संस्थांचा सदस्य म्हणूनच असते. कुटुंबसंस्था, जातीसंस्था, विवाहसंस्था, धर्मसंस्था यासारख्या अनेकविध संस्थांमधून व्यक्ती बांधलेली दिसते. यातील प्रत्येक संस्थेला विशिष्ट प्रकारचे संकेत असतात. त्यातून पुढे रुढी व परंपरा निर्माण होतात व पुढे यांना आचारधर्माचे स्वरुप प्राप्त होते. आचारधर्म म्हणजे जीवनाची पध्दती होय. समाजातील व्यक्तीसमूह ही पध्दती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वारसाच्या रुपाने देतात. असा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वारसाच्या रुपाने चालत आलेला आचारविचार धर्माचा वारसा म्हणजे संस्कृती होय.

भारतातील समाजसुधारणेच्या संदर्भात विचार करता या सांस्कृतिक पगडयाच्या प्रभावातून मुक्त होऊन अथवा ही सांस्कृतिक चौकट कायम ठेवून समाजातील बदल कसा घडवून आणावा हा खरा प्रश्न अनेक समाजसुधारकांना पडला असावा. कारण वर बघितलेल्या सामाजिक सुधारणांच्या चार प्रस्तावापैकी वरील तीन बदल हे वरवर होणारे तात्कालीक स्वरुपाचे बदल वाटतात. त्यामुळे भारतीय संस्कृती कायम ठेवून सामाजिक सुधारणा करावयाची म्हणजे नेमके काय करावयाचे असा मोठा प्रश्न समाजसुधारकांसमोर निर्माण झालेला दिसून येतो.[२]

ज्या काही थोड्या समाजसुधारकांनी ही अडचण लक्षात घेऊन हे आव्हान स्वीकारले त्यासाठी त्यांना काही धाडसी गृहीतके स्वीकारावी लागली. त्यातील सर्वात महत्त्वाचे गृहीतक म्हणजे भारतीय संस्कृती ज्या मूल्यांच्या आधारावर उभी आहे ती सर्व मूल्ये आदरणीय नाहीत, ती जतन करुन ठेवण्यासारखी नाहीत त्यामुळे ही मूल्ये मूळासकट उपटून फेकून दिली पाहिजेत. त्याशिवाय समाजाची पुनर्रचना करता येणार नाही. १९व्या शतकात महाराष्ट्राच्या संदर्भात अशी धाडसी भूमिका घेणारे समाजसुधारक फारच थोडे होते. ज्यात महात्मा फुले हे अग्रस्थानी होते.

महात्मा फुले हे १९व्या शतकातील केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारताच्या सामाजिक क्रांतीचे प्रणेते ठरतात. या काळात भारतात जे पुनरुज्जीवनाचे उर्फ सुधारणांचे वारे वाहत होते त्यासाठी विविध संस्था आणि व्यक्तींनी प्रयत्न सुरु केले होते मात्र या दोहोंच्या प्रयत्नात मुलभूत स्वरुपाचा फरक होता. या काळातील फुल्यांच्या समकालीन ज्या सुधारणावादी चळवळी फोफावल्या होत्या त्या हिंदूधर्माच्या प्रमुख मुल्यांच्या विरोधी नव्हत्या. त्या मूल्यांनी बहुजन वर्गावर जाणिवपूर्वक हीनत्व लादलेले होते. या मूल्यांना नाकारण्याचा विचार या



Scanned by CamScanner

चळवळींनी केला नाही त्याऐवजी त्या मूल्यांचे नवे विश्लेषण करुन ते कायम ठेवणे अभिप्रेत होते त्यामुळे ह्या चळवळी मर्यादित राहिल्या. महात्मा फुल्यांना मात्र ही मुल्ये मुळापासून जनमानसातून उपटून फेकून दयावयाची होती त्यामुळे त्यांचे कार्य मुलभूत परिवर्तनवादी होते.[3]

महात्मा फुल्यांचे 'गुलामगिरी' हे पुस्तक म्हणजे जोतीरावांनी सुरु केलेल्या विषमताविरोधी आंदोलनाची नांदी होती. बहुजन समाजाच्या दाहक अपमानाचा व जीवघेण्या सामाजिक आणि आर्थिक दु:खाच्या हुंकारातून जन्मलेला पहिला नकार आणि विद्रोह त्यांनी गुलामगिरीच्या रुपाने शब्दबध्द केला. गुलामगिरीत मांडलेल्या प्रखर विचारांमुळे तो ग्रंथ अनेकांना मूल्यव्यवस्थेचा विध्वंसक वाटला. परंतु ज्या सामाजिक मूल्यांना त्याचा स्पष्ट नकार होता ती मूल्ये ते समाजातून उपटून फेकून देऊ इच्छित होते. त्यासोबतच काही नविन मूल्यांची प्रतिष्ठापना करावी हे ही त्यांना अपेक्षित होते. ही नविन मूल्ये कोणती असावित त्याचे स्पष्टीकरण त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या त्यांच्या ग्रंथात केलेले आहे. फुल्यांनी उभी केलेली सत्यशोधक चळवळ ही सामाजिक व धार्मिक पुनर्रचनेची चळवळ होती. बुध्दिप्रामाण्य, इहवाद, उदारमतवाद, आणि समतावाद ही चळवळीची चतु:सुत्री होती. फुल्यांनी केलेली चिकित्सा खिस्ती मिशनऱ्यांच्या प्रचारातून उफाळलेली होती असा समज त्यांच्या काळात होता. परंतु प्रत्यक्षात त्यांच्या विचारांची कक्षा खिस्ती मिशनऱ्यांच्या पलीकडे जाणारी होती. ओ हॅण्लन म्हणतात त्याप्रमाणे टॉमस पेन 'एज ऑफ रीझन' या ग्रंथाने फुल्यांसमोर खिस्ती धर्मश्रध्देच्या मर्यादा स्पष्टपणे ठेवल्या होत्या. जोतीराव व तुकाराम, यांच्या मांडणीतील व शैलीतील साम्यस्थळे दर्शूवन डॉ. सदानंद मोरे यांनी जोतीरावांच्या विचारामागील एतद्देशीय प्रेरणा स्पष्ट केल्या आहेत.

गुलामगिरी या ग्रंथातून जोतिरावांचे व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्यांच्या संबंधी विचार स्पष्ट होतात. मनुष्याला स्वातंत्र्य असण ही मोठी जरुरीची गोष्ट आहे. जेव्हा मनुष्य स्वतंत्र असतो तेव्हा त्याला आपले मनात उद्‌भवलेले विचार स्पष्ट रीतीने इतर लोकांस बोलून अथवा लिहून दाखविता येतात. तेच विचार त्यास स्वतंत्रता नसल्यामुळे मोठे असून लोकांचे हितावह का असेनात, तथापि त्यास दुसरे कोणास कळविता येत नाहीत आणि असे झाले म्हणजे काही काळाने ते सर्व विचार लयास जातात. ह्या उताऱ्यातील जोतीरावांचे विचार हे मानवाच्या मुलभूत हक्कांचे खंदे समर्थक असल्याचे स्पष्ट होते. सुप्रसिध्द विचारवंत व लेखक प्रा. ल. भा. कुरकुरे म्हणतात, रानडे, गोखले, आगरकर यांचा उदारमतवाद अभिजनवादी, मवाळ व परंपरेपुढे मान तुकविणारा होता, तर फुले यांचा उदारमतवाद, मुलगामी, क्रांतीकारक व सर्व वंदनीय परंपराविरुध्द प्राणपणाने बंड करुन पुरणारा होता. सामाजिक आशय हा जोतिरावांच्या उदारमतवादाचा प्राण होता.[4]

बहुजन समाजाचे होणारे पारंपारिक सामाजिक शोषण आणि इंग्रजी आमदानीत कळसाला पोहचलले आर्थिक शोषण यांचा सामाजिक घटकांच्या संदर्भात विचार करणारे पहिले सामाजिक विचारवंत म्हणून जोतिरावांचा उल्लेख केल्यास चूक ठरणार नाही. फुल्यांच्या मते शोषण हा एक तात्कालिक अपघात नव्हता, तर तो एका सांस्कृतिक परंपरेचा अंगभूत भाग होता. 'सामाजिक विषमता हा आर्थिक विषमतेचा परिणाम आहे', अश्या फसव्या तत्त्वांवर फुल्यांचा फारसा विश्वास नव्हता. आर्थिक विषमता व सामाजिक विषमता ह्या दोन्ही स्वतंत्र अस्तित्वाला असलेल्या बाबी आहेत म्हणून केवळ आर्थिक समानतेवरच्या उपायांनी सांस्कृतिक विषमता नष्ट होऊ शकेल का? असा मुलभूत प्रश्न फुल्यांनी उपस्थित केला. समाजातील भट ब्राम्हण ही केवळ धार्मिक–सामाजिक जात नसून तो एक आर्थिक वर्गही आहे याची जाणिव असणारे फुले हे पहिले विचारवंत होते[5] शोधाच्या नव्या वाटा ज्या संस्कृतीमुळे शेतकरी व शुद्रांचे दारिद्र्य टिकवून ठेवले आहे ते या वर्गाच्या सामाजिक व आर्थिक वर्चस्वामुळेच त्यामुळेच या वर्चस्वावर त्यांनी तीव आक्षेप घेतला. संस्कृतीच्या नावाखाली रुढी परंपराच्या माध्यमातून बहुजनवर्गाची आर्थिक दैन्यावस्था टिकवून ठेवणे हेच येथील समाजरचनेचे कार्य होते असा निष्कर्ष फुल्यांनी काढला.

स्त्रियांच्या दास्यासंबंधी सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकात जोतिराव म्हणतात, 'या लोभी व धाडसी पुरुषांनी मोठी कावेबाजी करुन कोणत्याही कामामध्ये स्त्रीजातीची संमती घेतल्याशिवाय एकंदर सर्व पुरुषांनी आपलेच घोडे पुढे दामटले, त्यांस मानवी हक्क समजू देऊ नये, या इरादयाने त्यास विद्या शिकविण्याचा प्रतिबंध केला. यामुळे एकंदर सर्व स्त्रियांवर अशा तऱ्हेचा जुलमी प्रसंग येवून गुदरला.' स्त्रीमुक्तीच्या चळवळीला प्रेरणा देणार हा विचार जोतीरांवाना शतकापूर्वी मांडला व त्याचा कृतीने पाठपुरावा देखील केला. जोतिरावांनी आपल्या सार्वजनिक कार्याचा प्रारंभ इ.स.१८४८ साली पुण्यातील बुधवार पेठेतील भिडयांच्या वाडयात शुद्रातिशुद्रांसाठी मुलींची पहिली शाळा काढून केला. जगाच्या इतिहासात १८४८ हे वर्ष अनेक घटनांमुळे क्रांतिकारक ठरले आहे. शोषित, दलित, मानवसमुहांच्या मुक्तीचा संघर्ष चेतविणाऱ्या कार्ल मार्क्स याचा 'कम्युनिस्टांचा जाहिरनामा' याच वर्षी प्रसिध्द झाला. अमेरिकन स्त्रीमुक्तीच्या चळवळीला न्यूयॉर्क शहरात याचवर्षी सुरुवात झाली. संस्कृती व परंपरेच्या नावावर चालणाऱ्या विकृतीवर प्रहार करणारी लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची लेखमाला याच वर्षी प्रसिध्द झाली. अशा काळात हिंदू धर्मशास्त्रानुसार स्त्रिया आणि शुद्र यांना विद्येचा अधिकार नव्हता. अशा काळात सावित्रीबाई शाळेत जावून शिक्षिकेचे काम करु लागल्या. सुमारे दोन हजार वर्षाचा कालावधीनंतर ही घटना म्हणजे हिंदू स्त्रीने सार्वजनिक क्षेत्रात उतरण्याचे पहिलेच उदाहरण म्हणता येईल.[6] त्यांच्या या कृत्यासाठी वडिलांचा विरोध होऊन त्यांना घर सोडून बाहेर पडावे लागले. स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत टिळकांनी सकारात्मक भूमिका घेतली नाही. फुले मात्र स्त्रीचा मानवी हक्क म्हणून स्त्रीशिक्षणाचा आग्रह धरीत होते. समाजाकडून झालेल्या अनन्वित छळानंतरही १८५२ साली त्यांनी मुलींसाठी शाळा उघडली. १८५२ साली मागासवर्गियांसाठी मोफत वाचनालय सुरु केले. विधवांचे केशवपन, विधवापुनर्विवाह, स्त्रियांचा हीन दर्जा, अज्ञान, शारीरिक व मानसिक शोषण यावर केवळ शाब्दिक टीका करुन थांबले नाहीत तर ठोस उपायांचा अवलंब केला. केशवपनाची अमानुष प्रथा बंद पाडण्याची न्हाव्यांना आवाहन केले. पुरुषांच्या वासनेला बळी पडणाऱ्या विधवांना आत्महत्येबद्दल वाचविण्यासाठी बालहत्याप्रतिबंधक ग्रहाची स्थापना केली. त्या अनाथ मुलांचे पालकत्व जोतिराव व सावित्रीबाईंनी स्वीकारले. त्यांच्यातीलच एक मुलाला दत्तक घेतले. यशवंतराव हे नाव देवून संगोपन केले. १८७६ साली त्यांचे पुणे नगरपालिका सदस्य म्हणून नामांकन केले. १८७७ च्या भीषण दुष्काळात सर्वतोपरी सर्वांना मदत केली.

नवसमाजरचनेचे कार्य चार समाजसुधारकांच्या हातून होण्यापेक्षा आत्मभान आलेल्या अन्यायग्रस्त घटकांकडून अधिक प्रभावीपणे पार पाडले जाते अशी खात्री झाल्यामुळे जोतीरावांनी स्त्रीशुद्रादिकांना जाणिवजागृत करण्याचा कायम प्रयत्न केला. शिक्षणातून जागृत झालेल्या या



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

वर्गांनी आपल्या हक्कांसाठी संघटितपणे लढावे अशा दृष्टीने त्यांच्या अनेक आंदोलनाचे नेतृत्व जोतीरावांनी केले. जोतिरावांच्या तत्त्वज्ञानात शुद्रादि अतिशुद्राची दास्यमुक्ती आणि स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या तीन मूल्यांचे अधिष्ठान असलेली सामाजिक न्याय प्रस्थापित करणारा जातीविहीन एकात्म समाज निर्माण करणे हे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी सक्तीचे सार्वत्रिक शिक्षण व जातीभेद निर्मूलन आणि जातीव्यवस्था नष्ट करणे हे त्यांचे पहिले पाऊल होते. जोतीरावांना क्रांतीकारक ठरविणारे त्यांच्या विचारांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे संपूर्ण विचार हे मुख्यत्वे मानवकेंद्रे आहेत. माणसाला माणूस म्हणून ओळखणे आणि जाती, धर्म, पंथ यांना इतकेच नव्हे तर ईश्वराला सुध्दा माणसापेक्षा गौण ठरविणे या बाबीवर शंभर वर्षापूर्वी कुणाचाच विश्वास बसला नसता. समाजाची रचना, कार्यपध्दती व नीतिनियम या सर्व गोष्टींचा इष्टनिष्टतेचा एकमेव निकष जोतिरावांना अभिप्रेत होता तो म्हणजे मानवी जीवनाचा संदर्भातील त्यांची 'उपयुक्तता' म्हणून परंपरेच्या जोखडातून मानव्याची मुक्ती करणे हे जोतीरावांचे अवतारकार्य होते.[७] समाजाची समताधिष्ठीत पुनर्रचना लोकशाही मूल्यांची पायाभरणी, मुलभूत मानवी हक्क व व्यक्तीस्वातंत्र्य यांचा पुरस्कार या सर्व उपक्रमांमध्ये माणसाची 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याची त्यांची तळमळ दिसून येते.

**समारोप** : ''सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय, विचार, उच्चार समजुती, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा आणि संधी यांची समानता प्राप्त व्हावी आणि राष्ट्राचे ऐक्य आणि व्यक्तीची प्रतिष्ठा वाढावी यांची शाश्वती मिळून त्यांच्यामध्ये भ्रातृभाव वाढावा''. या भारतीय राज्यघटनेच्या उद्दिष्टांमध्ये अशी एकही गोष्ट नवीन नाही की जी आपणांस महात्मा फुले यांचे विचार व कृती यामध्ये आढळणार नाही. 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' या दोन शब्दांमधून व्यक्त होणारी बांधीलकी भारताच्या राज्यघटनेच्या प्रतिज्ञालेखातील उद्दिष्टांमध्ये समाविष्ट करुन घेण्यास १९७६ साल उजाडावे लागले. त्यावर्षी मंजूर झालेल्या ४२व्या घटनादुरुस्ती कायद्याने भारतीय जनतेने समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला. १९७६ मध्ये भारतीय जनतेने व्यक्त केलेल्या समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला. १९७६ मध्ये भारतीय जनतेने व्यक्त केलेल्या समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्याचा निर्मितीच्या निर्धाराचा मागोवा घेतला तर आपणांस १८७३ मध्ये प्रसिध्द झालेले महात्मा जोतीराव फुले यांचे गुलामगिरी, १८८३ मध्ये लिहून पूर्ण केलेले शेतकऱ्याचा आसुड, १८८५ मध्ये प्रसिध्द झालेले इशारा आणि १८८९ मध्ये लिहून पूर्ण केलेले पण त्यांच्या मृत्यूनंतर १८९१ मध्ये प्रकाशित झालेले सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक ही पुस्तके दीपस्तंभासारखी वाटतात. १९७६ मधल्याच राष्ट्रीय ऐक्याच्या जोडीला 'एकात्मता' हा शब्द घटनेच्या प्रतिज्ञालेखात समाविष्ट केला. परंतु एकात्म म्हणजे 'एकमय लोक' ही संकल्पना देखील महात्मा जोतीराव फुले यांनी १८८९ साली लिहिलेल्या सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकात वाचावयास मिळते. यातून जोतीरावांचा दृष्टेपणा सिध्द होते व म्हणून कृषिअर्थतज्ञ, कामगार चळवळीचे जनक वंचित व शोषितांचे लढवय्ये, स्त्रीमुक्तीचे आद्यकर्ते अशा विविध रुपात महात्मा फुल्यांचे कार्य समाजाच्या सर्वच घटकांशी संबंधित व सर्वव्यापी स्वरुपाचे होते. समाजातून सर्वच प्रकारची मानवनिर्मित विषमता दूर करुन समताधारीत नवसमाजरचनेची निर्मिती करणे हे जोतीरावांचे ध्येय होते. म्हणूनच स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या मुल्यांचा पुरस्कार करणारे जोतीराव फुले हे भारतीय समाजक्रांतीचे प्रणेते ठरतात.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१) नरके हरि, महात्मा फुले – शोधाच्या नव्या वाटा, संपादित चरित्रसाधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, ४०००२१, २००७, पृ.क्र.२
२) नरके हरि, महात्मा फुले – शोधाच्या नव्या वाटा, (संपादित) चरित्रसाधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, ४०००२१, २००७, पृ.क्र.३
३) भोळेभाल, महात्मा फुले वारसा आणि वसा, पृ.३८
४) नरके हरि, महात्मा फुले – शोधाच्या नव्या वाटा, (संपादित) तत्त्वज्ञ – ल. भा. कुकेकर, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, ४०००२१, २००७, पृ.क्र.२०९
५) देशपांडे अरविंद, पर्यायी संस्कृतीचे जनक – महात्मा फुले, चरित्र साधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई–२१, २००६, पृ.८
६) नरके हरि, महात्मा फुले – शोधाच्या नव्या वाटा, (संपादित) तत्त्वज्ञ – ल. भा. कुकेकर, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, ४०००२१, २००७, पृ.क्र.२१०
७) भोळे भ. ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर २००३, पृ.८१९
८) अस्मितादर्श
९) लोकराज्य
१०) दैनिक लोकसत्ता



Scanned by CamScanner

# शंकरराव चव्हाण आणि शून्याधारित अर्थसंकल्प

कु.माधवी ल. जाधव, संशोधक विद्यार्थिनी, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर मो.9850324202

**प्रस्तावना:** 1986 सुमारास महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी राजीनामा दिला. त्यामुळे राजीव गांधींनी 14 मार्च 1986 ला शंकरराव चव्हाण यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी दली. 14 मार्च 1986 ते 24 जून 1988 या काळात ते दुसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. याही काळात शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी अनेकविध उपक्रम राबविले होते आणि अनेक धाडसी निर्णय घेतले होते.

**शून्याधारित अर्थसंकल्प –**

दुसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणुन शंकरराव चव्हाणांची दि.12/03/1986 रोजी कारकिर्द सुरू झाली ती 26/06/1988 रोजी संपली. या कालखंडामध्ये त्यांनी महत्वपुर्ण असे धोरणात्मक निर्णय जाहीर केले व त्यांचे अनेक धोरणे व योजना वादग्रस्त ठरल्या होत्या. परंतु सर्व धोरणांचे व निर्णयाचे परिक्षण केले असता ते देशहिताचेच होते असे स्पष्ट होते. त्यापैकी शून्याधारीत अर्थसंकल्प हा एक होय. या शुन्याधारीत अर्थसंकल्पाची मूळ कल्पना अमेरिकेची आहे. शंकरराव चव्हाण अमेरिकेच्या दौऱ्यावर असतांना या संकल्पनेचा बारकाईने अभ्यास केला व अशा प्रकारचा प्रकल्प भारतात राबविता येईल का याकडे विशेष लक्ष दिले व मुख्यमंत्री असतांना ह्या अर्थसंकल्पाची अंमलबजावणी केली. याबाबतीत भारतातील महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य समजले जाते. आपल्या खर्च आपल्या उत्पन्नाच्या मर्यादेत ठेवण्यासाठी काही कठोर उपाययोजना अपरिहार्य आहे हे त्यांनी ओळखले होते. सद्यस्थितीत आपल्या खर्च विषयक धोरणांचे समग्र पुनर्विलोकन करण्याची गरज निर्माण झाली होती. भूतकाळात जेव्हा जेव्हा तदर्थ तत्वावर आणि सरसकटपणे खर्चामध्ये कपात करण्यात आली, तेव्हा तेव्हा तात्पुरती सोय जरी झालेली होती तरी त्यातून टिकाऊ स्वरुपाची फलनिष्पत्ती झालेली नव्हती. निरर्थक डामडौलाचा आणि अनुत्पादक खर्च करण्यास वाव नव्हता. गुंतविलेल्या प्रत्येक रुपयापासून अधिकाधिक लाभ मिळविण्यासाठी अधिक झटले पाहिजे. केवळ खर्च करीत राहण्यापेक्षा प्रत्यक्ष उद्दिष्ट साध्यकरणे अधिक महत्वांचे आहे. शासनाने आपल्या खर्चाची अधिक परिणामकारकता साधली पाहिजे व शासन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवरील खर्च कमी केला पाहिजे. याकरीताच शून्याधारीत अर्थसंकल्प जाहीर केला गेला. परंतु या धोरणांवर महाराष्ट्रात मोठे वैचारीक वादळ निर्माण झाले होते. शासकीय कर्मचाऱ्यांच्या कपातीचे धोरण यावरही महाराष्ट्रातुन टीकेचे प्रहार झाले होते. शासकीय कर्मचाऱ्यांच्या कपातीचे धोरण यावरही महाराष्ट्रात टिकेचे प्रहाण झाले होते हा अर्थसंकल्प रद्द व्हावा म्हणुन विरोधी पक्षनेत्यांनी महाराष्ट्रात जनआंदोलने उभी केली होती. परंतु शंकररावांचे प्रशासन स्वच्छ असल्याने, अभ्यासात्मक धोरण असल्यामुळे पुढे जनतेने प्रतिसाद दिला व चव्हाणांनी आपल्या कालखंडात हे धोरण यशस्वी करून दाखविले होते. या धोरणामुळे नुकसान न होता फायदाच दिसून आला. शून्याधारीत अर्थसंकल्पनेचा सुक्ष्म अभ्यास केला असता पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

शून्याधारीत अर्थसंकल्पनेत शून्याधारीत अर्थसंकल्पनांची संपूर्ण कार्यवाही ही संबंधीत प्रशासकीय विभागांतर्गत मर्यादीत करण्यात आली होती ही योजना व कार्यक्रम यांचे पुनर्विलोकन करण्याची प्राथमिक जबाबदारी पूर्णपणे संबंधीत विभागावरच सोपविण्यात आली होती.

कर्मचारी वर्गाच्या कपातीची चिंता ही अडचण बऱ्याच प्रमाणात कमी करण्यासाठी असे ठरविण्यात आले होते की जो कर्मचारी वर्ग आवश्यकतेपेक्षा जास्त ठरेल, त्याच्या बाबतीत जे पदाधारक किमान 3 वर्षे सेवा रितसर व प्राधिकृत मार्गाने भरती आवश्यक विभागीय व इतर विहीत परिक्षा उत्तीर्ण होणे आणि कामाचा अभिलेख समाधानकारक असणे यासारख्या विशिष्ट अटी पूर्ण करतात अशा कर्मचारी वर्गाला पुन्हा सामावुन घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत. अशा कर्मचारी वर्गाला त्यासाठी पुन्हा सामान्य प्रशासन विकासात एक अतिरीक्त संवर्ग कक्षही स्थापन करण्यात आला होता. आणि असाही निर्णय घेण्यात आलेला होता की अतिरिक्त ठरलेला कर्मचारी जोपर्यंत दुसरीकडे नेमला जात नाही तोपर्यंत तो ज्या कार्यालयात काम करीत असेल त्याच आस्थापनेवर राहून त्याच कार्यालयातून आपले वेतन घेईल.

शासनाच्या निरनिराळ्या विभागाच्या मोठ्या प्रमाणात विकासाविषयक गरजा नजरेसमोर ठेवुन असे ठरविण्यात आले होते. की शासनाच्या कोणत्याही विभागाने केलेली बचत निश्चीतपणे त्याच विभागाला खर्चाच्या अग्रक्रमाच्या क्षेत्रात पुन्हा उपाययोजनांसाठी शक्य तितक्या जास्त प्रमाणात दिली जाईल असे जाहीर केले होते. शून्याधारीत अर्थसंकल्प तयार करण्याची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे होती.

1)प्रत्येक विभागातील उच्चस्तरीय व्यवस्थापकांनी आपल्या व्यवस्थापनातील निर्णयघटक निश्चीत करावेत म्हणजेच खर्चविषयक निर्णय घेणारे व्यवस्थापनातील स्तर निश्चीत करावेत. उच्चस्तर व्यवस्थापनाने सर्व निर्णय घटकांना आपल्या विभागाची एकूण उद्दिष्ट्ये आणि कर्तव्ये स्पष्टपणे कळवावीत.

2)प्रत्येक निर्णयघटकांनी त्यांची उद्दिष्ट्ये स्पष्ट घालुन दिली पाहिजेत तसेच त्या उद्दिष्टांचा विभागाचा एकूण उद्दिष्ट्यांशी काय आणि कसा संबंध आहे हेही स्पष्ट सांगितले पाहिजे.

3)प्रत्येक निर्णय घटकाने त्यांची स्वतची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी जेथे शक्य असेल तेथे विविध पर्यायी मार्गांचा शोध घेतला पाहिजे आणि या पर्यायात होणारा खर्च व त्यापासून मिळणारे फायदे त्यांचे स्पष्टीकरण केले पाहिजे.

4)अनेक शासकीय योजना सामाजिक आर्थिक आणि कल्याणकारी स्वरुपाच्या असतात आणि म्हणुन त्यांच्याकडे खाजगी कंपन्यांपेक्षा वेगळ्या दृष्टीकोणातुन पहिले पाहिजे.

वरील धोरणात्मक पध्दतीने हा शून्याधारीत अर्थसंकल्प तयार करण्यात आला असल्यामुळे त्यात लोककल्याणकारी कामांचा अधिक समावेश असलेला दिसून येतो.

याच बरोबर सातव्या पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी करण्यास राज्य शासनाला साधनसंपत्ती उभारण्यामध्ये येणाऱ्या तीव्र अडचणी लक्षात घेऊन शंकरराव चव्हाणांनी असा निर्णय जाहीर केला होता की अपव्यय होणारा खर्च काढुन टाकण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. खर्चा संबंधीचे प्रस्ताव तपासण्याची सध्याची पध्दत अतिशय काटेकोर करण्यात आली पाहिजे आणि त्यायोगे सदर प्रस्तावावरील खर्चाची परिणामकारकता आजमावण्यात आली पाहिजे. अनावश्यक कामे टाळावी, काही कामांची पुनरावृत्ती होऊ न देणे आणि कार्यपध्दती सुटसुटीत होणे, यासाठी प्रशासकीय सुधारणा जलद गतीने होणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

या सर्व घटकांवरून शंकररावांची दुरदृष्टी व त्यांच्यातील कुशल अभ्यासकांचे व प्रशासकाचे गुण स्पष्ट दिसतात. याखेरीजी या शुन्याधारीत अर्थसंकल्पामुळे महाराष्ट्रातील शासकीय उधळपट्टी, कालबाह्य योजनांवर व्यर्थपणे होणारा खर्च व इतर आर्थिक नुकसान याला बऱ्याच मोठ्या प्रमाणात आळा बसलेला होता व महाराष्ट्राची आर्थिक स्थिती मजबुत होण्यास मदत झाली होती. याशिवाय शासकीय उधळपट्टी व अनावश्यक योजनांवर खर्च न केल्यामुळे 1 वर्षात महाराष्ट्र शासनाच्या तिजोरीमध्ये जवळपास 100 कोटी रुपये जमा झाले होते. असा उपक्रम याआधी भारताच्या कोणत्याच राज्यात झालेला दिसून येत नाही. एवढी लक्षणीय कामगिरी शंकरराव चव्हाणांच्या हातुन घडली म्हणुन काही राजकीय नेते व सामाजिक कार्यकर्ते त्यांना अर्थतज्ञ म्हणुन संबोधायचे हे अगदी खरे ठरते. याचे उदाहरण पहावयाचे झाल्यास मुख्यमंत्रीपदी वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या राजीनाम्यामुळे मुख्यमंत्रीपदी मराठवाड्यातील शिवाजीराव पाटील निलंगेकर यांची पक्षश्रेष्ठींनी निवड केलेली होती. परंतु एम.डी. परिक्षेतील मार्कशीट प्रकरणावरून त्यांनाही राजीनामा द्यावा लागला होता आणि पुन्हा महाराष्ट्रात मुख्यमंत्री कोण? असा प्रश्न उपस्थित झाला होता. या काळात शंकरराव चव्हाण हे केंद्रीय गृहमंत्री म्हणुन जबाबदारीचे काम करीत होते. त्याच वेळेस पंजाब प्रश्न, देशांतर्गत दहशतवादी कारवायांची व काही मोठ्या राष्ट्रीय समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याने ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेत नव्हते. पण निलंगेकरांच्या नंतर मुख्यमंत्री कोण ? या पदाला न्याय देणारी अन्य कोणतीही व्यक्ती त्यावेळी नव्हती म्हणुन पक्षश्रेष्ठींनी शंकरराव चव्हाणांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी दुसऱ्यांदा निवड केलेली दिसते. ही त्यांच्या एकंदरीत कार्याची पावतीच समजावी लागेल.

**शून्याधारीत अर्थसंकल्पाची आवश्यकता –**

प्रत्येक वार्षिक योजनेच्या साधनसंपत्तीविषयक गरजा दिवसेंदिवस वाढत असतांना दिसतात. जरी साधन संपत्तीच्या वर्धनक्षमतेमुळे काही साधनसंपत्तीची उभारणी आपोआप होत असली आणि राज्य शासनाच्या महसुलातही समान वाढ होत असली तरीही अशी वर्धनक्षम आणि कमी जास्त होणाऱ्या महसुलामुळे राज्य शासनाला उपलब्ध होत असलेली साधनसंपत्ती अतिशय मर्यादीत आहे. वार्षिक योजनेसाठी अधिकाधिक साधनसंपत्ती उभारण्यासाठी आणि आर्थिक बोजा समाजातील सर्वच घटकांवर शक्यतोवर सारखा व न्याय प्रमाणात वाटला जावा म्हणुन राज्य शासन सर्वकष आणि नवनवीन उपाय योजते. तथापि प्रतिवर्षी अशी अतिरीक्त साधनसंपत्ती किती प्रमाणात निर्माण करता येईल यालाही काही मर्यादा पडतात.

प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस विद्यमान योजनेचा खर्च योजनेनंतर खर्च म्हणुन रुपांतरीत होत असतोच. तदनुसार वर्धनक्षमतेमुळे आणि सर्वसाधारण वाढीच्या प्रमाणात त्यावेळापर्यंत वाढलेल्या खर्चातील वाढीच्या तुलनेत अशी महसुलातील वाढ नेहमीच अपुरी पडत असते. शिवाय योजनेनंतर खर्च हा विकासेतर खर्च असतोच असे नाही. 1987–1988 च्या आर्थसंकल्पनीय अंदाजानुसार असे दिसते की, रुपये 5,351.88 कोटी इतक्या एकुण योजनेनंतर खर्चापैकी 68 इतका विकासविषयक खर्च आहे. रुपये 3,637.82 कोटी आणि रुपये 1,000.65 कोटी इतका विकासेत्तर खर्च आणि रुपये 713.41 कोटी इतका सेवाविषयक खर्च होता. याप्रमाणे योजनेतर खर्चातील विकासेतर खर्चाव्यतिरिक्त, योजनेतर विकासावरील या प्रचंड खर्चाचे काळजीपुर्वक पुनर्निरीक्षण पडताळणी केली नाही तर विकासविषयक खर्चाच्या अधिक प्रमाणात खर्च द्यावा. क्षेत्रामध्ये साधनसंपत्तीचे वाटप करण्यासाठी बाबतीच्या बाबी शोधणे अशक्य होईल या व्यापक आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर शुन्याधारीत अर्थसंकल्पाची आवश्यकता होती.

**शून्याधारीत अर्थसंकल्पाचे गुण दोष –**

1)सुसुत्रीकरणाचा एक भाग म्हणुन आणि वसुलीचा खर्च कमी करण्यास पर्यटन विभागाकडून राबवला जाणारा महाराष्ट्र हॉटेल्स व निवासगृह या मधील विभागाकडून राबवला जाणारा महाराष्ट्र हॉटेल्स व निवासगृह या मधील ऐषारामावरील अधिनियम 1974 हा काहीसा कालबाह्य झाला असल्याचे निदर्शनास आले होते. याखेरीज इतर काही कर विषय कायद्यांच्या तरतुदींशी सुसंगती ठेवुन निनिर्दिष्ट कालावधीत कर देण्याची जबाबदारी करदात्यांवर सोपविणे आणि त्याने कर न भरल्यास त्यावर व्याज आकारणे आवश्यक आहे असे वाटले होते. वसुलीचा खर्च कमी करण्यासाठी आणि या करापासून मिळणाऱ्या महसुलात वाढ व्हावी म्हणुन या करांच्या अंमलबजावणीचे काम हे विक्रीकर कर्मचारी वर्गावर सोपविल्यास ते फायद्याचे ठरेल असेही वाटले. म्हणुन महाराष्ट्र हॉटेल्स व निवासगृह यामधील ऐषारामावरील कर अधिनियम 1987 हा नवीनअधिनियम करण्यात आला. यांच्या परिणामी पर्यटन वि ागातील निरनिराळ्या संवर्गातील 19 पदे रद्द करण्यात येतील व त्या योगे शासनाच्या खर्चात बचत होईल. या सुसूत्रीपणामुळे करांपासून मिळणाऱ्या महसुलातही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून आली होती.

2)शासनाची कार्यालये व कर्मचारी वर्ग यांच्यासाठी लागणारी व्यवस्था करण्याकरीता शासकीय इमारती बांधण्यासाठी, भांडवली साधनसंपत्ती उभारण्याकरीता, पथदर्शी तत्वावर निवड ठिकाणी असलेल्या प्रस्थापित नवीन जागांचा काही भाग निवडक प्रकरणी केंद्र शासनाला, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना, बँका व सहकारी संस्था यांना भाड्याने कसा देता येईल याचा विचार या धोरणात केला असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या तिजोरीत वाढ झाल्याचे दिसून आले.

3)सार्वजनिक बांधकाम विभागाने रुपये पंचवीस लाखांपेक्षा अधिक खर्च असलेल्या काही निवडक पुलांचा वापर करणाऱ्या वाहनांवर पथकर आकारण्याची पध्दती अवलंबिली होती.

4)पाटबंधारे सार्वजनिक बांधकाम विभागाकाडून काढण्यात येणाऱ्या निवीदा सूचना विहीत नमुन्यात सुधारणा करण्यात येत असून तो बराच प्रमाणात सोपा करण्यात आला होता.

5)इंडियन बँक व बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या शाखांमार्फत मोटार वाहन कर गोळा करण्याची योजना निवडक ठिकाणीच सुरु करण्यात आली होती. या योजनेन्वये मुंबईत इंडियन बँकेच्या पंचवीस शाखा मोटार वाहन कर गोळा करतात. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या शाखांमार्फत ठाणे व पुणे जिल्ह्यात हे कर गोळा करते. याही उपक्रमामुळे कराच्या माध्यमातुन महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही परिपक्व होण्यास मदत झाल्याचे दिसते.

6)मोटार वाहन चालकांनी नवीन लायसन्स मिळविणे व त्यांचे नुतणीकरण करणे यासाठी मोटार वाहन विभागाऐवजी, निरनिराळ्या प्रकारची फी रोख गोळा करण्याऐवजी स्टॅम्पद्वारे गोळा करण्याचे ठरविण्यात आले होते. यामुळे या विभागातील लिपीकवर्गीय काम बऱ्याच प्रमाणात कमी झाले.

7)काही प्रकारच्या कामांसाठी जेवढे मनुष्यबळ लागते तेवढ्या प्रमाणात ते लागु नये म्हणुन काही निवडक क्षेत्रात अत्याधुनिक साधन सामुग्रीही पुरविण्यात आली होती. यादृष्टीने उचलण्यात आलेले एक महत्वाचे पाऊल म्हणजे पोलिस खात्याला फोटो कॉपीची यंत्रे पुरविली. यामुळेच अभिलेखांच्या प्रती बनविण्याच्या कामात गुंतल्यामुळे बऱ्याच लेखनिक पोलिसांना हे काम करावे



Scanned by CamScanner

लागले नाही व त्यांचा पोलिसांया नित्याच्या कामासाठी उपयोग करुन घेण्यात आला होता. याप्रमाणे चाळीस फोटो कॉपी यंत्राची तरतुद केली गेली. 883 पोलिस हे पोलिसांच्या नित्याच्या कामासाठी उपलब्ध होऊ शकले. त्यामुळे 121.54 लाख रुपये एवढी वार्षिक बचत झाली होती.

8)पाटबंधारे विभागातील उपलब्ध कर्मचारी वर्गाची कामाच्या कार्य भाराच्या संदर्भात पाहणी करण्यात आली व कर्मचारी वर्ग पध्दतीत सुधारणा करण्याची तसेच कर्मचाऱ्यांची जादा पदे कमी करण्याचे ठरविण्यात आले होते. परिणामी तीन मंडळे, दहा विभाग व 97 उपविभाग गरजेपेक्षा अधिक असल्याचे आढळुन आले होते. त्यामुळे प्रतिवर्षी रुपये 7.37 कोटी एवढ्या रकमेची बचत झाली होती.

9)ज्या पोलिस रुग्णालयातील अंतर्गत सुविधांचा वापर कमी प्रमाणात करण्यात येत होता, त्या पोलिस रुग्णालयाचे दवाखान्यांमध्ये रुपांतर करणे सहज शक्य होईल असे निदर्शनास आले होते. परिणामी वॉर्ड बॉईजची व परिचारीकांची 10 पदे प्रस्थापित करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंध केंद्राच्या सहकार शाखेचे कमक्षाचे त्या मानाने थोडे कमी असलेले काम गुन्हा अन्वेषण विभागाच्या विद्यमान कर्मचारी वर्गाकडे सोपविण्यात आले व सहकारी शाखेच्या कर्मचारी वर्गाला दुसरे काम नेमुन देण्यात आले त्यामुळे दरवर्षाला 10 लाख रुपयांची बचत झाली होती.

10)सुसूत्रीपणाचा महत्वाचा प्रयत्न म्हणुन 1987–88 या वर्षापासून दुचाकी वाहनावर एकाचवेळी कर वसुलीची पध्दत झाली होती. त्यामुळे लिपीकांच्या 89 पदांचे फेरवाटप करता आले व त्यामुळे अधिक उत्पादकता कार्यक्षमता वाढविणे आणि महसुल संघटन करणे शक्य झालेले होते. तसेच त्यामुळे दुचाकी वाहनांवरील कराची खात्रीलायकपणे संपूर्ण वसुली होण्याचे उद्दिष्ट साध्य झालेले दिसते. ज्याच्याच परिणामस्वरुप वसुलीचा खर्च बराच कमी झालेला होता.

11)कृषी अभियांत्रिकी कार्यशाळांमधील कार्याचा आढावा घेण्यात आल्यावर दिनांक 1 ऑक्टोबर 1987 पासून 10 पदे रद्द करण्यात आलेली होती.

12)सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षेच्या संदर्भात खाजगी सनदी लेखापरिक्षकांच्या सेवेचा जास्तीत–जास्त वापर करण्यात यावा असे ठरविण्यात आले होते. त्यामुळे या सर्व सहकारी संस्थांची शासकीय लेखा परिक्षकांकडून लेखा परिक्षण करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांची पूर्णकालीन पदे निर्माण करावी लागणार नव्हती हा सुध्दा एक फायदा दिसून आला होता.

13)जपानी पध्दतींची भात शेती लोकप्रिय करण्यासाठी चालु करण्यात आलेली भारत–जपान केंद्रे व उपकेंद्र दिनांक 9 सप्टेंबर 1987 पासून बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यामुळे विविध प्रवर्गातील 57 पदे अतिरीक्त ठरली होती.

14)बुलडोझर चालकांची व इतर सहाय्यक कर्मचारी वर्गाची 69 पदे रद्द करण्यात आली होती. परिणामी प्रतिवर्षी रुपये 12.58 लाखांची बचत झाली.

**शून्याधारीत अर्थसंकल्पामुळे झालेले नुकसान –**

वास्तविक पाहता शून्याधारीत अर्थसंकल्पामुळे नुकसानापेक्षा फायदेच जास्त दिसून येतात, असे असले तरीही सामाजिक दृष्टिकोनातुन पाहिल्यास एकीकडे झालेल्या नोकर कपातीमुळे शासनाच्या तिजोरीत भर पडली. पण, नोकर कपातीची कुऱ्हाड कर्मचाऱ्यांवर पडली. त्यांचे कौटुंबिक नुकसान झालेले दिसून येते. शिवाय अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर झाल्यामुळे बेकारीच्या प्रमाणात वाढ झाली. तसेच अत्यावश्यक असणाऱ्या पुणे व मुंबई येथील औद्योगिक रासायनिक शाळा बंद केल्यामुळे याचाही औद्योगिकीकरणावर अनिष्ट परिणाम दिसून आला होता. यावरोबर व्यवस्थापन पध्दतीतही बदल घडवुन आणण्यासाठी शासनाने सर्वकष प्रयत्न केले होते. परंतु शुन्याधारीत अर्थसंकल्पाखालील काही बाबींमध्ये साध्य केलेल्या गोष्टी परिणामाच्या स्वरुपात मांडणे शक्य होते. परंतु त्याचबरोबर अशाही काही बाबी होत्या की ज्यांच्या खर्चातील बचतीचे किंवा निर्माण होणाऱ्या अतिरीक्त महसुलाचे निर्धारण करणे अवघड झाले असेच त्यांना वाटत होते. त्यांनी टंचाई स्थितीची व्यापकता पाहिली व करून घेतली होती. तेव्हा केंद्र सरकारकडून वस्तु व पैशांच्या स्वरुपात राज्याला टंचाई निवारणासाठी 50 कोटी रुपयांची मदत लागलीच करण्याची त्यांनी औरंगाबादच्या सभेत दिलेली ग्वाहीही मुख्यमंत्री चव्हाण यांच्या लोकाभिमुख कार्यपध्दतीची पावतीच म्हटली पाहिजे.

संदर्भ ग्रंथ–

1) महाराष्ट्र विधीमंडळातील शंकरराव चव्हाण –डॉ.उत्तम सावंत,निर्मल प्रकाशन, नांदेड 2005
2) लोकानुवर्ती राज्यकर्ता शंकरराव चव्हाण–पाटील पंढरीनाथ, प्रकाशक–आशादेवी प.पाटील
3 )मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण –वि.स.वाळींबे, प्रकाशक – आनंद बल्लाळ
4) भारतीय शासन आणि राजकारण–डॉ.अलका देशमुख,साईनाथ प्रकाशन, नागपूर 2009
5) भारताचे शासन आणि राजकारण –डॉ.जोगेंद्र गवई व शेख हासम
6) महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव चव्हाण –डॉ.सुरेश सावंत, म.रा.साहित्य आणिसांस्कृतिक मंडळ, मुंबई 2010
7) शंकरराव चव्हाण जीवन व कार्ये–डॉ.उत्तम सावंत, निर्मल प्रकाशन नांदेड 2000
8) असामान्य लोकनेता डॉ.शंकररावजी चव्हाण–प्रा.संतोष देवराये नर्मल प्रकाशन नांदेड 2010



Scanned by CamScanner

# सबलीकरणच्या प्रक्रियेत कुणबी स्त्री

**संगिता गिरीधर सोमवंशी**, संशोधक विद्यार्थिनी रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रस्तावना:**

आधुनिक काळात जेव्हा आपण महिलांच्या सबलीकरणाच्या संदर्भात विचार करतो तेव्हा आपणास भारतीय स्त्रियांचे पूर्वीचे स्थान व भूमिका बदललेली दिसून येते. याबाबत आपण नेहमीच वर्तमान पत्रातून वाचत असतो आणि समाजात त्याची चर्चा सुध्दा होत असतांना बघतो. आज समाजात महिलांची कोणती स्थिती आहे हे खऱ्या अर्थाने जाणून घ्यायचे असेल तर स्त्रियांकडून त्यांच्या विषयीच्या अनेक प्रश्नांची उकल करावी लागेल उदा. त्यांच्याशी कशाप्रकारे व्यवहार केला जातो त्यांना समाजात कशाप्रकारे वागविले जाते.

समाजात स्त्रिला जे स्थान असते. त्या स्थानानुसार तिला काही विशेष अधिकार प्राप्त होतात. तसेच काही कर्तव्यही तिला पार पाडावी लागतात. हे अधिकार आणि कर्तव्ये समाजात स्त्रियांची कोणती स्थिती आहे हे निश्चित करतात. जीवनात होणाऱ्या परिवर्तनाबरोबर व्यक्तीचा दर्जा आणि भूमिकेत परिवर्तन होत असते. एकाच व्यक्तीला समाजात एकच दर्जा आणि एकच भूमिका एकावेळी पार पाडावी लागते असे नाही तर एकाच अवस्थेत व्यक्तीला अनेक स्थाने असतात आणि अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. स्त्रीला कराव्या लागणाऱ्या विविध भूमिकांमुळे तिच्या मनात संघर्ष निर्माण होतो. सर्वसामान्यत: असे म्हटले जाते की, स्त्रिया आज्ञाधारक असतात कारण निसर्गत:च त्या विनयशील, समर्पित, कोमल, भावूक, भीरू असतात म्हणून समाजात त्यांची भूमिका निश्चित झालेली आहे. सांस्कृतिक प्रभावामुळे आणि सामाजिक अपेक्षेमुळे हे गुण तिला चिकटविले जातात.

जेव्हा आपण कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचे विश्लेषण करतो तेव्हा त्या समाजात स्त्रियांचे स्थान व त्यांना करावी लागणारी भूमिका कोणती याचा सारासार विचार करावा लागतो. स्त्रियांना समाजात जे अधिकार व जबाबदाऱ्या मिळाल्या असतात ते सर्व समाजात एकसारखे नसतात. ज्या स्त्रिया स्वत:च्या चरितार्थासाठी पतीवर अवलंबून राहत नाही, त्यांची स्थिती पतीवर अवलंबून राहणाऱ्या महिलांपेक्षा चांगली असते. म्हणूनच प्रा. सौ माधवी कवि म्हणतात. "भूतकाळात समाजात, भारतीय स्त्रिला जे स्थान प्राप्त झालेले होते त्यानुसार सध्याचे अधिकार प्राप्त झाले. म्हणून भारतीय महिलांची आजची स्थिती समजण्यासाठी तिला भूतकाळात प्राप्त झालेल्या स्थानाची पार्श्वभूमीही जाणणे योग्य ठरते" [१]

**वैदिक काळातील भारतीय स्त्री :** वैदिक काळापासून आपल्या भारतीय इतिहासाला सुरूवात होते. या काळामध्ये स्त्रियांना विशेष स्थान मान होता. त्यांच्याकडे उदार दृष्टीकोनातून पाहिले जाई. त्याकाळी अध्ययन व अध्यापनात कार्यरत स्त्रियांची उदाहरणे आढळतात. धार्मिक कार्य, वैदिक विधी, मंत्राचे ज्ञान त्यांना होते. ऋग्वेदातील काही ऋचा स्त्रियांनी रचलेल्या आहेत. विधवा स्त्री पुनर्विवाह करू शकत. अविवाहीत राहून विदूषी स्त्रिया ज्ञानोपासना आणि सामाजिक कार्यात गुंतलेल्या आढळतात. त्यात गार्गी वाचकवनी मैत्रैयी, सुलभा इत्यादी स्त्रियांचा समावेश आढळतो. स्त्रियांच्या पावित्र्यापेक्षा वंशरक्षणास प्राचीन भारतात अधिक महत्व दिले होते. त्या काळात गृहिणीचा कुटूंबात योग्य मान राखला जाई.

वैदिक कालखंडात स्त्रियांच्या सामाजिक दर्जात बरेच बदल झाले. स्त्रियांच्या दृष्टिने हा कालखंड फार प्रतिकुल स्वरूपाचा होता. येथूनच स्त्रियांच्या अधोगतीला सुरूवात झाली.

**बौध्दकाळ** : बौध्द धर्मने स्त्रियांना धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात समानता आणि मानाचे स्थान दिले. पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनाही मठात राहूत अध्ययन करता येई. अनेक स्त्रियांनी व्रतस्थ धार्मिक आचरण पत्करून इतरांना प्रेम व विश्वबंधूत्व याचा संदेश देण्यासाठी आपले आयुष्य वेचले. बौध्द धर्मातील 'थेरी गाथेत' अनेक उत्कृष्ट भक्तीगीते रचनाऱ्या स्त्रिया फार विद्वान कवयित्री होत्या या काळात स्त्रियांची बौध्दिक व आध्यात्मिक क्षेत्रात उच्च प्रगती झाली होती.

**मध्ययुगीन काळात स्त्रियांचे स्थान:—**

इ.स. १२०० ते इ.स. १८०० पर्यतच्या कालखंडाला 'मध्ययुग' म्हटले जाते. इ.स. १२०० नंतर मुस्लिम राज्यकर्ते भारतात आले त्यावेळी मुस्लिम स्त्रिया पडदानशील असत. या काळात स्त्रियांचा दर्जा घसरत गेला. सतीप्रथा रूढ झाली. पुरूषांचे वेश्याशी सबंध वाढले. स्त्रियांना घरगुती कामात सदैव जखडून ठेवले जाई. बालविवाह, हुंडा, पुरूषी वर्चस्व वाढले होते. समाज रूढीवादी झाल्यामुळे तत्कालीन स्त्रियांचा समाजातील दर्जा घसरत गेला.

**आधुनिक काळ:—**

साधारणत: आणि खऱ्या अर्थाने १९व्या शतकाला आधुनिक काळ म्हणता येईल. १९व्या शतकात माहिलांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न समाजसुधारकांनी केला. वारकरी संप्रदायात सर्व संतानी स्त्री वर्गात नवा आत्मविश्वास निर्माण केला. आद्य कवी महदाईसापासून ते संत बहिणाबाईपर्यंतच्या सर्व संत महिलांनी समाज प्रबोधनाचे कार्य केले. प्रबोधनाच्या या कालखंडात इंग्रजाच्या बरोबर ख्रिश्चन धर्माचा प्रचार करणाऱ्या मिशनऱ्यांचेही भारतात आगमन झाले. बऱ्याचशा सामाजिक कार्यकर्त्यांनी सती प्रथा, बालविवाह, विधवा पूनर्विवाह बंदी, बुहपत्नी विवाह अशा सामाजिक अमानुष प्रथा दूर करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटीशांचे भारतात आगमन झाल्यापासून ते भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यतचा कालखंड हा प्रबोधनाचा कालखंड राहिला आहे. या प्रक्रियेत स्त्रीचा सामाजिक दर्जा भूमिका या विषयीचे बरेच विचार मंथन झाले. स्त्रिजीवनाचा उध्दार, प्रगती करण्यासाठी या कालखंडात स्त्रियापेक्षा पुरूषांनीच मोठे कार्य केले. १९व्या शतकातील ह्या प्रबोधनकाळातील स्त्री म्हणजे प्राचीन स्त्री व आधुनिक स्त्री शृंखले मधील ती दुवा ठरली. सामाजिक सुधारकांच्या प्रयत्नामुळे सुशिक्षित स्त्री, समाजसेविका, स्त्री डॉक्टर, सत्याग्रही अशा स्त्रीच्या प्रतिमा निर्माण झाल्या.

भारतात महिला आंदोलनाचा उगम १८८० ते १९३० या काळात झाला याच काळात स्थानिक, प्रांतिक, राजकीय पातळीवर महिला संघटनांची स्थापना झाली. परंतु हे आंदोलन समाजातील काही लोकांपूरतेच मर्यादित राहिले. १९१० नंतर राष्ट्रीय तसेच प्रांतिक पातळीवर महिलांचे संघटन स्थापन झाले. भारत महिला महामंडळ, भारतीय महिला संघटन, मुंबई प्रांतिय महिला परिषद, भारतीय राष्ट्रीय महिला परिषद, अखिल भारतीय महिला संमेलन इत्यादी.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

गांधीजींनी स्त्रियांमधील शक्ती ओळखली म्हणून त्यांनी म्हटले आहे, स्त्रियांजवळील असामान्य धैर्यामुळेच व अहिंसक स्वभावामुळे त्या पुरूषापेक्षा उत्तम सत्याग्रही होऊ शकतात. गांधीजींचा तसा विश्वास होता. भारतीय स्वातंत्र्य लढयात स्त्रियांनी पुरूषांच्या खादयाला खांदा लावून पुरूषार्थ गाजवला.

थोडक्यात म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियाबद्दलचे व त्यांच्या कार्यक्षमतेबद्दलचे गैरसमज दुर झाले. शिक्षणाची दारे खुली होवून राजकीय क्षेत्रात सहभाग वाढला आणि त्यामुळे त्यांच्यात गतिशीलता निर्माण झाली. स्त्रियासाठी झालेल्या कायदयामुळे स्त्री–पुरूषांमधील विषमता दूर झाली.

**स्वातंत्र्योत्तर काळ :**

१९४७ नंतर भारतीय राज्यघटनेचे लिंगावर आधारित भेदभाव समाप्त केला स्त्रियांच्या कल्याणासंदर्भात अनेक योजना आणि कायदयाच्या तरतुदी करण्यात आले. १९७५ साली युनोने 'महिला वर्ष' जाहीर केल्यावर स्त्री–मुक्तीचळवळीचे वारे शहरी व ग्रामीण भागात वाहू लागले. स्त्रिवादाच्या कल्पनेमुळे स्त्रियांचा दारिद्रय, बेकारीचा प्रश्न कमी झाला. परंतु आजही ग्रामीण विभागातील कामाची परिस्थिती बदलली नाही. स्त्रियांना आर्थिक क्षेत्रातील अधिकार फारसे प्राप्त झाले नाही. राजकारणात ३३ टक्के आरक्षण दयावे ही मागणी अजुनही मान्य झालेली नाही परंतु पंचायत राज्यात ३० टक्के राखीव जागा स्त्रियांसाठी ठेवण्यात आल्या. स्त्री–पुरूष स्पर्धेमुळे समाजात अस्थिरता निर्माण झाली. रशियन क्रांतीचा प्रणेता लेनिन याने, स्त्रियांनी पूर्ण नागरिक व्हावे व आपले अधिकार आणि कर्तव्ये ही पुरूषाप्रमाणेच बजावावीत हा विचार मांडला. स्त्रियांना स्वतंत्र करणे ही सामाजिक गरज असल्यांची जाणीव प्रथम रशियन क्रांतीचा प्रणेता लेनिनने दिली. त्यांच्यामते कुठल्याही क्रांतीचे यश हे तिच्यामध्ये स्त्रियांचा सहभाग किती आहे यावर अवलंबुन असते. [२]

**सबलीकरण:–**

महिला सबलीकरण याचा अर्थ आहे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांना पुरूषासारखेच समान अधिकार दिले जाणे होय. लैंगिक विषयतेच्या आधारावर सामाजिक विषमता योग्य म्हणता येणार नाही. शारिरिक, सामाजिक, बौध्दीक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रात तिला समान संधी दिल्याने तीचा सर्वांगिण विकास होवु शकतो. सुत्र संचालन, प्रशासन आणि इतरही क्षेत्रात तिला सुदृढ बनविणे म्हणजे सबलीकरण होय. तिच्या विषयीचा पारंपारिक पुरूषी दृष्टीकोन बदलल्याने ती सबल होईल. तिला अधिक बलवान सक्षम बनविण्याची प्रक्रिया म्हणजे नियोजित परिवर्तन होय. तीचे सबलीकरण काही निकर्षावर तपासले जावू शकते. उदाहरण त्यांची शैक्षणिक स्थिती, आरोग्य स्थिती, तिचा जन्मदर व मृत्युदर तसेच तिच्याविषयीचा पुरूषांचा पांरपारिक दृष्टीकोन बदलला आहे काय? कुठल्याही निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग किती आहे? तिच्याकडे समानतेच्या दृष्टिकोनातुन पाहण्याचे प्रमाण किती आहे? तिचा राजकीय आर्थिक क्षेत्रात किती सहभाग आहे? तिच्याकडे स्त्री म्हणुन बघीतल्या जाते की व्यक्ती म्हणून बघितल्या जाते, तिच्या विकास मार्गातील अडथळे कोणते व किती प्रमाणात आहे? अशा विविध निष्कर्षावर तिचे सबलीकरण तपासता येवू शकते. आधुनिक भारतात या संदर्भात स्त्री अधिक सक्षम होत चालली आहे असे म्हणता येईल परंतु अजुनही ती पूर्णपणे सबळ झालेली दिसून येत नाही. सर्वांगिण सबल होण्यासाठी बरीच मजल गाठावयाची आहे. आजही स्त्री म्हणजे सौंदर्य, कामुकता, सेक्स सिम्बॉल, नाजुक, कोमल, पुरूषांच्या तुलनेत दुय्यम असे विचार करण्याचे प्रमाण अजुनही बरेच आहे. वाढत्या कन्याभ्रूणहत्या वाढते बलात्कार, वाढते अपहरण, वाढते लैंगिक अत्याचार, वधूदहनाच्या घटना, कौटूंबिक हिंसाचार, ऑनरकिलिंग राजकीय व धार्मिक क्षेत्रात पुरूषांच्या प्रमाणात तिचे अल्पप्रमाण इत्यादी चित्रे तिच्या सबलीकरणा ऐवजी अबलीकरणच दर्शविते. आजही स्त्रीयांचा फार मोठा भाग पारंपारिक स्त्रिच असा आहे असे दिसून येते हे प्रमाण धर्मानुसार, जातीनुसार, प्रदेशानुसार कमी अधिक आढळून येते. ज्या समाजात शिक्षणाचा प्रचार, प्रसार फारसा झालेला नाही अशा समाजातील स्त्रियांची स्थिती तुलनेने कमी समाधानकारक आहे. मुठभर स्त्रियांच्या सबलीकरणातुन किंवा त्यांच्या प्रमाणावरून सर्व स्त्रिया सबल झाल्या आहेत असे विधान करणे धाडसाचे नव्हे तर अशास्त्रीय ठरेल. खालील सारणीवरून वरिल विधानाला बळकटी मिळते.

स्त्रियांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटना खालील तक्त्यावरून स्पष्ट होतात.

| गुन्हा | १९९५ | १९९६ | १९९७ | १९९८ | १९९९ | २००० |
|---|---|---|---|---|---|---|
| बलात्कार | १३५७४ | १४८४७ | १५३३० | १५१५१ | १५४६८ | १६४९६ |
| हुंडा बळी | ५०९२ | ५५१३ | ६००६ | ६९७५ | ६६९९ | ६९९५ |
| त्रासदेणे | ३११२७ | ३५२४७ | ३६५९२ | ४१३७६ | ४३८२३ | ४५७७८ |
| शोषण | २८४७५ | २८९३९ | ३०७६४ | ३९९५९ | ३२३११ | ३२९४० |
| छेडखानी | ४७५६ | ५६७१ | ५७९६ | ८९३४ | ८८५८ | ११०२४ |

स्त्रोत: भारतातील गुन्हे, एन.सी.आई.बी.–२०००

**कुणबी समाज:**

कुणबी समाज वरवर प्रगत व पुरोगामी वाटत असला तरी तो रूढीवादी, परंपरागत आहे. विज्ञानाच्या प्रगतीवर त्याने आपले बाहय जीवन आधुनिक घडविले असले तरी त्याचे स्वरूप उपभोगवादीच अधिक दिसून येते. मानसिकता बौध्दीकतेच्या स्तरावर कुणबी समाज स्वत:ला पुरेसा विज्ञानवादी घडवू शकला नाही. कुणबी समाजातील रूढी परंपरावादास सर्वाधिक जोपासण्याचे काम महिलांनीच केल्याचे आढळते.

वैदिककाळातीलवाङ्मयातआलेला'कुर्मी'याशब्दाचाकुलंबी–कुळंबी–कुंबी–कुळंबीज–कणबी–कुणबी–कुणबा–कुडुम्बाइत्यादी प्रकारे अपभ्रंश झालेला आहे. जमिनीची (कुर्माची) मशागत वा रक्षण करणारा तो कुर्मी कुणब्याचा प्रमुख व्यवसाय शेती हा होता. महाराष्ट्रात तो मोठया प्रमाणात दिसून येतो. कुणबी ही जात मानल्या गेली ती संपूर्ण भारतात विविध राज्यामध्ये वेगवेगळया नावाने ओळखली जाते. महाराष्ट्रात 'कुणबी' या जातीत अनेक पोटजाती देखील आहे. आणि त्या सर्व अंतर्विवाही आहेत. कुणबी उपजातीत विवाह करीत नाही आज याबाबत कट्टरता दिसून येते.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

स्त्री ही निर्मिती असल्याने तिच्याकडे आदराने अन् पुजनीय भावनेने बघितले जात असे. शिव हे कुणब्यांचे दैवत असले तरी सर्वाधिक पुजेचा बहूमान पार्वतीला मिळाला आहे. कुणब्यांचे दुसरे दैवत शेती. शेती ही स्त्रिलिंगी आहे. त्यामुळेही महिलांविषयक आदर अधिक होता. आर्यपूर्व काळातील कुणबी स्त्री ही डोक्याला फेटा, हातामध्ये मणिबंध, कंबरपट्टा अशी योध्दासारखी वस्त्र प्रावरणे धारण करणारी होती. जीवनाश्यक बी–बीयाणांचा शोध सुध्दा स्त्रीयांनीच लावला होता. हे सर्वात मोठे वैशिष्टे होय. [३]

प्राचीन भारताचा इतिहास, कुणबी संस्कृती व सभ्यता शोधून तपासण्याचा, चिकित्सा करण्याचा समाजशास्त्रीय प्रयत्न केला तर स्त्रीची भूमिका किती महत्वाची होती हे सहज कळुन येते. पुराणग्रंथामध्ये सुध्दा स्त्रियांची कामगिरी पुरूषांपेक्षा वरचढच दिसते. पुढे आर्यांच्या प्रभावामुळे स्त्रीयांच्या वाटयाला दुय्यमत्व आले, मानसिक, बौध्दिक, आर्थिक सामाजिक गुलामगिरी आली. परिणाम स्वरूप कुणबी महिलेचे जीवन गुलामासारखेच झाले. कुणबी स्त्री अधिकच गुदमरू लागली. [४]

आज परिस्थिती बदलेली असली तरी स्त्रियांचे प्रश्न मात्र सुटलेले नाही. राजकारण, राजकारणातले हेवेदावे, भांडणे, वैमनस्य, राजकारणामुळे लागणारे शौक, व्यसनाधिनता, राजकीय प्रतिष्ठेसाठी होणारी पैशाची उधळण हयांचा सर्वाधिक परिणाम मात्र कुणबी स्त्रियांवर होतो.

एकीकडे कुणबी स्त्री मानसिक, बौध्दिक, आर्थिक, समाजिक दृष्टया दडपणाखाली राहिली असली तरी दुसरीकडे संधी मिळताच तिने आपल्यातील कर्तृत्वही सिध्द् केले आहे. पौराणिक काळातील रूक्मिणी, दमयंती, सत्यवती हया कुणबी स्त्रियांनी बंडखोरी करून आले अस्तित्व सिध्द केले. अलिकडच्या काळात तर कर्तबगार कुणबी महिलांची फळीच्या फळी तयार झाली आहे. राजकारण, साहित्य, संस्कृती, व्यवसाय, नोकरी, प्रशासन या सर्व क्षेत्रात त्या आपला प्रभाव गाजवीत आहेत.

**निष्कर्ष:**

१ शहरीकरणामुळे शहरी भागातील कुणबी स्त्री सुशिक्षित सुसंस्कृत, प्रगत वाटत असली तरी तिच्यामध्ये निर्णयशक्ती पूर्णपणे, विकसित झालेली दिसत नाही. कर्मकाडांच्या प्रभावातून पूर्णार्थाने मुक्त होण्यास ती अपयशीच ठरली आहे.

२ स्त्रीया शिक्षित असूनही त्यांना नोकरीसाठी मनाई करण्यात येत असल्याचे तसेच मुलीचा विवाह त्यांच्या मनाविरोधात होण्याचे प्रमाण सुध्दा कमी नाही.

३ कुणबी समाजात खानदानीपणा, प्रतिष्ठेच्या कल्पना, घराणेशाही, परंपरा हयाचा प्रभाव तसेच पुत्रप्राप्तीशिवाय मोक्ष प्राप्ती नाही वा घराण्याला वारस हवा ही जी पुरूषप्रधान मान्यता आहे तिचा बळी सुध्दा कुणबी स्त्री ठरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे कुणबी स्त्री काही प्रमाणात अंधश्रध्देमध्ये गुरफटलेली दिसते.

४ सर्वसाधारण ग्रामीण स्त्रियांची स्थिती फारसी समाधानकारक म्हणता येणार नाही. आजही ती पुरूष वर्चस्वाखाली व परंपरतेच्या बोजाखाली गुदमरत आहे. ज्या कुणबी स्त्रिया शिकल्या आणि विवाह होऊन शिकलेल्या कुटूंबात गेल्या त्याचे सबलीकरण त्या ग्रामीण महिलांच्या तुलनेने अधिक झाल्याचे चित्र दिसत असले तरी असे ठामपणे म्हणता येत नाही की शिक्षित स्त्रियांचे सबलीकरण झाले आहे वा स्त्रिया अबला राहिल्या आहेत. अजुनही कुटूंबातील पुरूषीप्रभाव संपलेला नाही. पारंपारिक प्रभाव कमी होत आहे हे जरी सत्य असले तरी पूर्ण सत्य नाही.

५ सबलीकरणाचे उज्ज्वल,स्पष्ट, स्विकृत चित्र साकार होण्यास अजून थोडा कालावधी जाऊ दयावा लागेल आणि थोडा प्रयत्न करावा लागेल यासाठी स्त्री संघटना, कुणबी समाज मंडळाच्या प्रयत्नाची आवश्यकता आहे. अपवादात्मक उदाहरणावरून सर्वसामान्य स्त्रियांचे चित्र रेखाटणे केवळ चूकीचेच नव्हे तर धोक्याचे देखील आहे. यासाठी अजुनही स्त्रीशिक्षण, स्त्रियांच्या संदर्भातील कायदे व हक्क आणि त्यासंबंधीतची जागृकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आजही आहे.

संदर्भ:

१. प्रा. सौ. माधवी कवि महिला कल्याण आणि विकास पृष्ठ क्रं. ५
२. कित्ता पृष्ठ क्रं. ४९
३. जेमिनी कडू कुणबी समाज (स्वरूप, संस्कृती आणि सभ्यता पृष्ठ क्रं. ६२सातवी आवृत्ती
४. कित्ता पृष्ठ क्रं. ६२



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# भारत–पाकिस्तान परराष्ट्र संबंधातील दहशतवाद मुख्य अडथळा

**प्रा. राजेंद्र ओ. बेलोकार**
एस एन. मोर. महाविद्यालय,
तुमसर जिल्हा–भंडारा

**डॉ. पी. एच. सुर्यवंशी**
सहयोगी प्राध्यापक तथा विभाग प्रमुख(राज्यशास्त्र)
प्रा. राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय नादगांव खडेश्वर जि. अमरावती

**प्रस्तावना :–**

दहशतवाद ही आज भारत– पाकिस्तान या दोन देशासमोरील समस्येसोबतच एक जागतिक समस्या सुध्दा बनलेली आहे. कारण दहशतवादाने भारत–पाक सोबतच अफगाणिस्तान, पॅलेस्टीन, इस्त्राइल, सीरिया, इजिप्त, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, चीन, श्रीलंका, इराक, इराण, मलेशिया, अल्जेरिया,इथोपिया, सुडान, इन्डोनिसिया, तुर्की तसेच सोमालिया असे किती तरी देश होरपळून निघाले आणि निघत आहेत. दहशतवाद हा आधुनिक जगाचा कॅन्सर असून तो आजच्या सुव्यवस्थित आणि विकसित समाज रचनेच्या वाटचालीमधील प्रमुख धोका आहे. त्याच बरोबर मानवाला अनेक प्रकारची दु:खे आणि यातना पोहचविणारा आहे.

आज दहशतवादाचा प्रसार जगाच्या सर्व भागात झालेला असून भारतीय उपखंडात आणि मध्यपूर्वेमध्ये दहशतवादाने रौद्रय रुप धारण केलेले आहे. दहशतवादाने हत्या, बॉम्बस्फोट, अपहरण , खंडणी इत्यादीच्या माध्यमातून नीच दर्जाची सवंग आणि अत्यंत हीन अशी हिसंक कार्यवाही करुन मानवी अधिकारांचा गळा घोटण्याचे काम केलेले दिसते.

दहशतवाद हे असे कृत्य आहे की, ज्यामध्ये हिसांचाराची धमकी असून लोकांची सुरक्षा, स्वातंत्र्य, प्राण यांना धोका, असून राजकीय आणि सामाजिक उद्दिष्टये साध्य करण्याकरीता व्यक्तीविरुध्द, मालमत्ते विरुध्द शासन तसेच नागरी समुदाय किंवा त्यांचा अंश राज्यात दहशत निर्माण करण्याकरिता किंवा त्यांच्यावर जबरदस्ती करण्याकरीता अवैध हिंसाचाराचा अगर बळाचा वापर केला जातो.

दहशतवादाला धार्मिककट्टरता, जेहाद, बेरोजगारी, गरिबी, कौटुंबिक–हिंसा, नैराश्य, बदल्याची भावना तसेच इतर राष्ट्रांविषयी द्वेश इत्यादीमुळे तरुणांना दहशतवादी संघटना मध्ये भाग घेण्यास भाग पडावे लागते किंवा (सोशल मीडिया) द्वारे ब्रेन वॉश करुन (समाज माध्यमाद्वारे) भाग पाडले जाते.

दहशतवादाअंतर्गत धार्मीक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक तसेच राजकीय परिस्थिती सुध्दा कारणीभूत असते. त्याहीपेक्षा बाह्यशक्तीचा वाढता हस्तक्षेप सुध्दा कारणीभूत ठरतो. उदा. अमेरिका, रशिया तसेच इतर विकसित राष्ट्रांनी आपल्या स्वार्थासाठी अविकसित तसेच विकसनशिल राष्ट्राच्या (अफगानिस्तान–अविकसित तर पाकिस्तान–विकसनशिल) अंतर्गत व्यवहारामध्ये हस्तक्षेनप करुन त्यांना मोठया प्रमाणात शस्त्रास्त्र पुरविले त्यामुळे याला आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे स्वरुप प्राप्त झाले असल्याचे समजते.

मानवी समाजासाठी आज दु:खाची बाब ही आहे की, २१ व्या शतकामध्ये एकीकडे जग विकासाकडे वाटचाल करीत असतांना दुसरीकडे जगामध्ये लष्कर–ए–तोहबा, आय. ए. आय, जैश–ए–मोहम्मद, हिजबुल मुजाहिद्दीन, तालीबानी तसेच इसिस (इस्लाममिक स्टेट ऑफ इराक अॅन्ड सीरिया) सारख्या शेकडो दहशतवादी संघटना मानवाच्या विकासात खीळ घालून मोठया प्रमाणात जीवित आणि वित्त हानी पोहचवित आहेत.

वरील भयानक परिस्थिती निर्माण करणाऱ्या अशा दहशतवादावर तोडगा काढण्यासाठी तसेच भारत–पाक परराष्ट्र संबंध सुरळीत चालू ठेवण्यासाठी काय करायला हवे?

१) दहशतवाद हा निसर्गनिर्मित नसून मानव निर्मित आहे हे सर्वप्रथम समजून घ्यायला हवे कारण मानवाने आपल्या भौतिक आणि क्षणिक स्वार्थासाठी दहशतवादी संघटनाची निर्मिती केली आणि त्याला नष्ट सुध्दा मानवच करु शकतो यामध्ये काहीही शंका नाही.

२) 'वसुदैव कुटुंबकम' म्हणजे सारे विश्वची माझो घर' ही संकल्पना सर्व दहशतवादयांशी संबंधीत असणाऱ्या सर्व प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष संघटनांनी समजून घेणे गरजेचे आहे.

३) दहशतवाद फोफावण्याच्या वेगवेगळया कारणापैकी आर्थिक विषमता हे एक सर्वात मोठे कारण असून जगातील समुध्द देशांनी ज्या देशामध्ये दहशतवाद बळावतो आहे अशा देशांना आर्थिक मदत फक्त त्यांच्या विकासासाठी करावी.

४) दहशतवादी संघटनांना आत्मसमर्पण करण्यासाठी,यांना प्रेरित, प्रोत्साहित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष संस्था, संघटनाची स्थापना व्हायला हवी

५) संयुक्त राष्ट्र संघटनेला जास्तीत जास्त अधिकार देऊन दहशतवांदाच्या मुद्दयावर स्थायी सदस्य राष्ट्राचे एकमत व्हाला हवी.

६) 'इस्लाम खतरे मे है' अशी घोषणा देवून जेहाद (धर्मयुध्द) करायला तयार रहा असा विषारी प्रचार करणाऱ्या त्याचबरोबर नवतरुणांना धर्माच्या नावावर भडकविणाऱ्या मुल्ला–मौलवी तसेच समाज माध्यमांवर योग्य ती कठोर कार्यवाही करावी.

७) इस्लाम म्हणजे शांती, इस्लाम म्हणजे सलामती हे दहशतवादयांनी समजून घेणे गरजेचे आहे.



Scanned by CamScanner

८) आतंरराष्ट्रीय स्तरावर ईस्लामच्या सच्चा पाईकांनी पुढे येऊन दहशतवादाची घोर निर्भत्सना करणे आवश्यक आहे.

९) धर्मनिरपेक्षतेची भावना दहशतवादामध्ये जागतिक पातळीवर खऱ्या अर्थाने रुजविण्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करण्याची गरज आहे.

१०) आजपर्यंत कोणत्याही समस्येचा तोडगा हा हिसेंच्या मार्गाने सुटला नसून तो शांततेच्या, म्हणजेच चर्चा, संवाद तसेच सामजंस्याच्या माध्यमातूनच सुटू शकतो. हे जगविख्यात असून. ते दहशतवादी संघटनांनी समजून–उमजून घ्यायला हवे.

११) दहशतवादी संघटनामध्ये भाग घेणाऱ्या नवयुवकांकडे तसेच मुस्लिम समाजाकडे धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता त्यांच्याकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. त्यांना समाजाच्या योग्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवेत.

१२) जागतिक स्तरावर मूलतत्वावादी विचार धारेची समीक्षा होऊन समाज कटंकाकडून होणारे ाार्मधानुकरण थांबवायला हवे.

१३) कुटूंबातील नातेसबंध घट्ट असल्यास तसेच सुसंस्कारी पणा जपल्यास दहशतवाद कमी होण्यास मदत होते.

१४) दहशतवादी विचारसरणी मुळात निर्माण होणार नाही किंवा मर्यादित राहील यासाठी उदारमतवादी आणि व्यापक विचार होणे गरजेचे वाटते.

खाजगीकरण–उदारीकरण–जागतिकीरकण (खा–ऊ–जा) च्या वातावरणात एका देशाला जगातील इतर देशावर अवलंबून राहावेच लागते. देशातील दळण–वळणाची साधने, शिक्षण मनुष्यबळ तेथील धर्मनिरपेक्षता, सामाजिक, राजकीय, आर्थिक तसेच सांस्कृतिक, भौगोलीक परिस्थिती किती सुदृढ आणि मजबूत आहे याबाबींवर त्या देशाचा विकास अवलंबून असतो. त्या देशामध्ये जर नेहमी दहशतवादी कार्यवाहया होत असतील तसेच देशातंर्गत वातावरण जर पोषक नसेल तर विकसित राष्ट्रे आपल्या मोठया कंपन्या स्थापन

करण्यासाठी तसेच व्यावसायकि गुंतवणूक करण्यासाठी समोर येत नाही. त्यामुळे विकसनशील तसेच अविकसित राष्ट्रे गरीबी, बेरोजगारी अशा कितीतरी मानवी विकासातील समस्या सोडविण्यास असमर्थ ठरतांना दिसून येतात. उदा. पाकिस्तान आणि अफगाणिस्थान मधील वाढत्या गरिबीतील, बेरोजगारीचे तसेच इतर अनेक समस्यांची मुख्य कारणे तेथे वाढणारा दहशतवाद आहे हे नाकारता येत नाही.

**सारांश :–** दहशतवादा विषयी एकूण विचार केला असता भारत व पाकिस्तानचे शेजारी तसेच परराष्ट्र संबंध सुरळीत चालु ठेवण्यामध्ये दहशतवाद मुख्य अडथळा म्हणून समोर येत आहे. उदा. भारतीय संसदेवरील हल्ला, मुंबईवरील दहशतवादी हल्ला, यांच्या विषयी उघड होत असलेल्या माहीतीवरुन हल्लेखोरांमध्ये संबंधीत देशाच्या समाजकटकांचा सहभाग होता. यावरुन या दहशतवादी हल्ल्यांने भविष्यातील दहशतवादी हल्ल्यांसाठी त्याच देशातील असंतुष्ट किंवा असंतुलित व्यक्तीचा वापर होणार यांचे स्पष्ट संकेत दिलेले आहेत. त्यामुळे आतातरी भारत आणि पाकिस्तान बरोबर जगातील सर्वच देशांनी अगोदर आपले घर अशा भेदींपासून सुरक्षित कसे ठेवता येईल? याकडे कटाक्षाने लक्ष पुरवायला हवे त्याच बरोबर जगातील अविकसित विकसनशील आणि विकसित अशा सर्व राष्ट्रांनी आपआपसातील मतभेद बाजूला ठेऊन दहशतवाद ही भारत–पाकिस्तानचीच समस्या नसून ती आपल्या सर्वांची ज्वलंत समस्या आहे. हे समजून आणि उमजून घ्यायला हवे. कारण दहशतवादी संघटनांना पुरविली जाणारी आर्थिक मदत थांबवायची असेल तर जागतिक स्तरावर सहकार्य आणि सौहार्द असणे ही आज काळाची गरज आहे. आर्थिक मदत थांबली तरच खऱ्या अर्थाने दहशतवादाची कोंडी होऊन त्यांचा मुळावर घाव घालता येईल आणि सर्व देशांकडून दहशतवाद मुक्त करता येईल.

**संदर्भ सूची :–**

१) रत्तू कृष्णकुमार, दक्षिण एशिया आतंक का साया और सार्क घोषणाए, बुक एनक्लेन, जयपूर, संस्करण २००५.

२) पलसानियॉ एम. एस., अंतरराष्ट्रीय आतंकवाद एवं भारत को नई सुरक्षात्मक चुनौतियॉ, राज पब्लिशिंग हाऊस जयपूर, संस्करण, २०१०.

३) उद्गावकर म. न. एकविसाव्या शकातील दहशतवाद, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

४) तळवलकर गोविंद, इराक दहन, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २००५.

५) साप्ताहिक लोकप्रभा, २७ नोव्हेबर २०१५,

६) साप्ताहिक सकाळ, २८ नोव्हेंबर,२०१५.

७) दैनिक देशोन्नती, २ डिसेंबर २०१५.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# भारतीय लोकशाहीची आंतरिक समस्या - नक्षलवाद

प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे , संत भगवान बाबा कला महाविद्यालय , सिंदखेड राजा, जि. बुलढाणा.

**प्रस्तावना :**

जगात दुस-या महायुध्दानंतर स्वातंत्र मिळविलेल्या अनेक देशात राजकीय व्यवस्थेबाबत अनेक स्थित्यंतरे घडत असतांनाच भारतीय लोकशाही भक्कम पायावर उभी आहे हे जगातील लोकशाहीचे सर्वोत्तम उदाहरण आहे. हलाखिची आर्थिक परिस्थीती, कमालीची सामाजिक, सांस्कृतिक विविधता, प्रचंड विरोधाभास असुनही भारतीय लोकशाहीचा दिवसेंदिवस विकास होत आहे. जागतिक पातळीवर अनेक परिवर्तने होत असली तरी भारतीय लोकशाही समर्थपणे अनेक परिवर्तनाला सामोरी जावून विकसित होत आहे. भारतीय लोकशाहीला विकासाची किनार असली तरी अनेक आंतरिक समस्याही आहेत ज्या निस्तारण्याकरीता बरीच आर्थिक व राजकीय शक्ती घालवावी लागत आहे. यामध्ये नक्षलवाद असीच एक आंतरिक समस्या आहे. नक्षलवादाचे आपले भयंकर कुर स्वरूप प्रगट करणे सुरू आहे. अनेक प्रयत्न करूनही पाहिजे तसे यश अजुन मिळाले नाही. काही अंशी नक्षलवादाला आळा घालण्यात दिसून येणारे यश निश्चितच भविष्यकालीन आनंदाची नांदी ठरावी. प्रस्तुत शोध निबंधात नक्षलवाद कशी लोकशाहीची समस्या ठरते आहे याच आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिश्टे :–**

1) नक्षलवाद समस्या निर्मितीची कारणे जाणून घेणे.
2) शासकीय उपाय योजनांचा आढावा घेणे.

**गृहितकृत्य :–**

1) नक्षलवादामुळे प्रचंड जिवितहाणी होत आहे.
2) लोकशाहीच्या यशश्वीतेला फार मोठा अडथळा निर्माण झाला.
3) शासन व प्रशासनाच्या इच्छाशक्तीचा अभाव.
4) नक्षलवादी भागात पायाभूत सुविधांचा अभाव.

**नक्षलवाद :**

लोकशाही मार्गाने भूमिहिनांना कधीही जमीन मिळणार नाही. भारतीय घटनेत "राईट टू प्रॉपटी" मान्य केला ह्याचा फायदा भूमिहिनांपेक्षा जमीनदारांना होईल. यातूनच चारू मुजुमदारांनी दार्जिलिंग जिल्हयातील सिलीगुडी उपविभागामध्ये तीन पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या खेडयातील जनतेला सोबत घेवून सशस्त्र उठाव केला. यात नक्षलवादी सोबतच फांसीदेवी व खारीबारी येथील शेतमजुर सहभागी झाले. कनू सन्याल व आदीवासी नेते जंगल संथाल यांनी या उठावाचे नेतृत्व केले. येथे नक्षलवाडी चळवळीचा जन्म झाला म्हणजेच इ.स. 1967 साली बंगालच्या दार्जिलिंग जिल्हयातील लक्षलवाडी येथे माओवादी कम्युनिस्ट लोकांनी जी सशक्त चळवळ सुरू केली तिला नक्षलवादी चळवळ म्हणतात. नक्षलवाद हा मार्क्सवादी व लेनीनवादी चळवळीचा भारतातील एक अविष्कार होय. माओत्से–तुंगची विचारसरणी भारतात रूजविण्याकरीता पं. बंगालमध्ये कनू सन्याल याने उभारलेली नक्षलवादी चळवळ तत्कालीन सरकारने दडपून टाकली. जमीनीचा मालकी ताबा मिळविण्याच्या प्रयत्नातून हि संघटना निर्माण झाली. जनतेचे राज्य स्थापन करण्याचा यांचा निर्धार आहे. आदिवासी, भूमिहिन शेतकरी, शेतमजूर व दलितांचे आपण कैवारी आहोत असा त्यांचा दावा आहे.

1969 साली चारू मुजुमदार यांनी या चळवळीत वैचारिक अधिष्ठान मिळवून दिले. 1967 ते 1972 या कालखंडात गोपीवल्लभपूर, श्रीकाकुलम, वानाड येथे केलेले उठाव दडपून टाकण्यात आले. इ.स. 1967.69 या कालखंडात या चळवळीद्वारे "व्हिलेज सोविएत" ची स्थापना करून ग्रामीण भागातील गरिबी व विषमतेचे प्रश्न मांडले, इ.स. 1969 ते 1971 या काळात वर्गशत्रुचा नाश करून ग्रामीण भागातील जमीनदार, सावकार, व्यापारी, पोलिसांचे हस्तक यांना ठार मारणे असे धोरण होते. इ.स. 1971 नंतर गनिमी युद्ध, लपून–छपून हल्ले, असे धोरण होते. आज या चळवळीने अतीशय उग्र रूप धारण केले आहे. यामधे अनेक निरपराध लोकांचे प्राण यामधे जात आहेत या समस्येला आळा घालण्याकरीता केंद्र व राज्य सरकारच्या पातळीवर अनेक प्रयत्न केल्या जात आहेत. आज देशातील अनेक राज्यात याचे अस्तीत्व आहे.

| State | District in State | District affecte |
|---|---|---|
| Andhra Pradesh | 13 | 8 |
| Bihar | 38 | 11 |
| Jharkhand | 24 | 18 |
| Chattisgarh | 27 | 9 |
| Maharashtra | 35 | 3 |
| Orissa | 30 | 9 |
| Telangana | 10 | 8 |
| Uttar Pradesh | 75 | 3 |
| West Bengal | 19 | 3 |
| Madhya Pradesh | 50 | 1 |
| Total | 318 | 77 |

(Source: en-wikipidia.org/w/index.php_letter-maxalite_Maoist_in surgery and action)



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

**क्रुर नक्षलवाद :**

नक्षलवादाने अत्यंत विदारक व भयंकर स्वरूप प्रगट करायला सुरूवात केली आहे. अनेक गांव, तांडे उजाळ केली आहेत. 2013 पर्यंत ठार केलेल्या आकडेवारी वरून याची कल्पना येते.

| Period | Civilians | Security forces | Insurgents | Total |
|---|---|---|---|---|
| 1989-2001 | 1610 | 432 | 1007 | 3049 |
| 2002 | 382 | 100 | 141 | 623 |
| 2003 | 410 | 105 | 216 | 731 |
| 2004 | 466 | 100 | 87 | 653 |
| 2005 | 524 | 153 | 225 | 902 |
| 2006 | 521 | 157 | 274 | 952 |
| 2007 | 460 | 236 | 141 | 837 |
| 2008 | 399 | 221 | 214 | 834 |
| 2009 | 586 | 317 | 217 | 1120 |
| 2010 | 713 | 285 | 171 | 1169 |
| 2011 | 275 | 128 | 199 | 602 |
| 2012 | 146 | 104 | 117 | 367 |
| 2013 | 123 | 83 | 136 | 642 |
| Total | 6615 | 2421 | 3146 | 12181 |

(Source: en-wikipidia.org/w/index.php_letter-maxalite_Maoist_in surgery and action)

या व्यतिरिक्त 1990 ते 2010 या विस वर्षात 6000 पेक्षा जास्त नागरीकांचा बळी गेला (बी.सी.सी) राज्यसभेत दिलेल्या माहितीनूसार मागील तीन वर्षात नक्षलवादी हल्ल्यात एकूण 1922 लोकांचा म्रत्यू झाला, ज्यामध्ये 1179 सामान्य नागरिक होते (प्रेस टस्ट ऑफ इंडिया 22 जुलै 2014). छत्तीसगड मधील एका हास्पीटलच्या बाजुला सी.आर.पी.एफ. जवानांचे कपडे कचऱ्याच्या टपात आढळून आले. यामधे 14 जवानांचा मृत्यू झाला. (प्रेस टस्ट ऑफ इंडिया 4 डिसेंबर 2014). तर गृह मंत्रालयाच्या सांखीकीय आकडेवारीनुसार गत तीन दशकात 12000 नागरीक 300 जवानांचा नक्षल चळवळीत मृत्यु झाला आणि 4638 नक्षलवादी याच कालखंडात मारले गेले. आकडेवारीत विविधता असली तरी एकंदरीत सामान्य नागरीक व सुरक्षा दलातील जवान राज्याचे पोलीस यांच्या कधीही भरून न येणारी जीवीताची हानी होत आहे.

**नक्षलवादाचे लक्ष :**

नक्षलवादी शस्त्राच्या बळावर सत्ता हस्तंगत करणे व त्यांना अपेक्षित असलेले कायदे लागू करणे, आर्थिक संपन्नता व सत्ता हे नक्षलवादाच्या विरोधातील प्रमुख शस्त्र आहे. करीता राज्याची सत्ता नेस्तनाभूत करून नक्षलवादाला अपेक्षीत सत्ता व कायदे लागू करणे. करीता त्यांचे लक्ष हे आदीवासी जनता आहे जेथे प्रशासन कमकुवत असून विकासापासून संबंधित भाग दूर्लक्षित आहे. दुसरे लक्ष असे की लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीवर हल्ला करून, त्यांची हत्त्या करायची व सामान्य जनतेत दहशत निर्माण करायची. जेणेकरून सामान्य जनता पोलीस आणि प्रशासनापासून दूर जाईल व नक्षलींची सत्ता स्थापन होईल. या करीता भयंकर कुर स्वरूपाचे गुन्हे, हत्त्या, बलात्कार, अपहरण करून आर्थिक संपन्नता नसलेल्या आदीवासींवर प्रभाव टाकून त्यांना अंकीत केल्या जात आहे.

**नक्षलवादाचे दुस्परिणाम :**

**जीवित हानी :–** नक्षलवादाचा सर्वात भयंकर दुष्परिणाम म्हणजे कधीही भरून न निघणारी जीतीत हानी होय. ज्यामध्ये काहीही कारण नसतांना अनेक कुटूंब प्रमुखाची हत्त्या झाल्यामुळे कुटूंबाची वाताहत होते. त्यामुळे सामान्य जनता दहशतीत जगतांना दिसते. सतत मृत्युचे तांडव समोर दिसते. दहशतीला कंटाळून व जीवीताची शाश्वती म्हणून सामान्य जनता नक्षलवाद्यांना मदत करण्याच्या मनस्थितीत असण्याची भिती यामधून निर्माण होते.

**आर्थिक हानी :–** नक्षलवादी कार्यवाही दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे त्यातून आर्थिक हानी मोठया प्रमाणात होत आहे. यामध्ये रेल्वेरूळ उद्धस्त करणे, पुलांना हानी पोहचविणे, भुसुरूंगाचे स्फोट करून वाहनांची नासधूस करणे, शस्त्रासाठा लुटणे, जाळपोळ करणे अशा अनेक घटकांमधून सार्वजनिक संपत्तीची हानी होत आहे.

**सामाजिक व मानसिक हानी :–** अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जात दूर्गम भागात जीवन जगणा–या आदीवासींच्या जीवनात नक्षलवादींनी अजुनच समस्या निर्माण केलेल्या आहेत. सदैव मृत्युचे तांडव समोर असतांना शासनाकडून होणरे दुर्लक्ष किंवा तोकडी मदत, भ्रष्टाचार, कमालीचे दारिद्रय, अविकसितपणा, सेवा सुविधांची उणीव यामुळे आदीवासी जनता सतत मानसिक तणावात जगते आहे, त्यामुळे ती मुख्य प्रवाहापासून दुरावते आहे.

लोकशाही शासन व्यवस्थेत राज्यातील तळागाळातील शेवटच्या व्यक्तीचा सहभाग लोकशाहीच्या यशस्वीतेकरीता आवश्यक असते. या प्रकियेत नक्षलवादामुळे फार मोठा अडथळा निर्माण होत आहे. शासनाच्या विकासाच्या योजनांची अंमलबजावणीत अनेक अडथळे यामुळे निर्माण होत आहेत. शासनाच्या विकासाच्या योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचणे गरजेचे असते, परंतु नक्षलवादामुळे लाभ शेवटच्या घ्टकापर्यंत पोहचत नाही. परिणामतः त्या समुहामध्ये शासनाप्रती आपपरभाव निर्माण होतो. ज्यामूळे नक्षलवादीला आपला प्रभाव निर्माण करण्यास वाब मिळतो. त्यामुळे शासन व प्रशासनाची बरीचशी शक्ती विकास कामापेक्ष आंतरीक सुरक्षिततेच्या प्रश्नांवर खर्च होते.

**नक्षलवाद समस्येवर उपाय :–**नक्षलवादी चळवळ ज्या जमीनदारी कायद्यामुळे निर्माण झाली आहे त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. दुर्गम भागात व जंगलात राहणाऱ्या आदीवासींची स्थितीत सुधारणा करणे आवश्यक आहे. जंगला संबंधीत विविध योजना



Scanned by CamScanner

राबवितांना आदीवासींच्या हिताला बाधा येणार नाही याची काळजी शासनाने घेणे आवश्यक आहे. अनेक शासकीय योजना राबवितांना आदीवासींना त्यात सहभागी करून घेणे आवश्यक आहे. योजना आपल्याच हिताकरीता आहेत अशी जाणीव जागृती करणे गरजेचे आहे. आदीवासींच्या मुळ समस्यांचा अभ्यास करून त्यानुसार योजना आखणे आवश्यक आहे. अन्यथा आजार एक व उपचार वेगळा अशी अवस्था होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. शासन प्रशासकीय यंत्रणा व आदीवासी यांच्यात सुसंवाद निर्माण होणे गरजेचे आहे त्यामुळे संशयाचे वातावरण नाहीसे होवून शासन प्रशासनावर आदीवासी जनतेचा विश्वास बसेल. त्यांचा विश्वास संपादन होत नाही तोपर्यंत हि समस्या सोडविणे कठीण आहे. शस्त्राच्या बळावर समस्या सोडविण्यापेक्षा मुलभूत सोईसुविधांची निर्मिती करून समस्या सोडविण्यावर भर देणे आवश्यक आहे. प्रगतीची पायाभूत चौकट निर्माण करून संबंधित जनतेचा त्यावर विश्वास निर्माण करणारे ध्येय धोरण राबविणे आवश्यक आहे.

नक्षलवादीच्या समस्या सोडविण्याकरीता आवश्यक असलेली शासकीय व प्रशासकीय इच्छाशक्ती आवश्यक असणे गरजेचे आहे. वरवर उपाय योजना न करता मुळातून या समस्येच्या निवारणार्थ उपाययोजना आतून त्याची प्रामाणिक अंमलबजावणी आवश्यक आहे. शासन अपयशी ठरले आहे हा भ्रम त्यांच्या मनातून नाहीसा करणे आवश्यक आहे. सामाजिक व आर्थिक मागासलेपण नक्षलवादीपेक्षा शासन दूर करू शकते असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण करणे आवश्यक आहे. म्हणजे नक्षलवादीच्या प्रभावातून सामान्य जनता बाहेर पडेल. शिक्षणाच्या सुविधा, आरोग्य, दळणवळण संपर्काची साधने निर्माण करणे आवश्यक आहे. शासन शत्रु आहे तेव्हा त्यांना विरोध करा असे जे मत झाले आहे त्यातून त्यांना बाहेर काढणे आवश्यक आहे. दोन बंदुकीच्या (नक्षलवादी व सुरक्षा दल) कचाट्यात सापडलेल्या आदिवासींना यामधून सहीसलामत बाहेर काढणे आवश्यक आहे. शासन व प्रशासन आणि सुरक्षा दल आपला शत्रु नसून मित्र आहे, अशी शाश्वती/भावना निर्माण करणे आवश्यक आहे. विविध विकासाच्या योजना जाहिर करून समस्या सोडविली जाणार नाही तर योजना भ्रष्टाचार मुक्तपणे राबविणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शासनांनी बरेच प्रयत्न करूनही अपयश येणऱ्या कारणांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. जेणेकरून पुढील ध्येय धोरण ठरवितांना लाभ होईल.

**निष्कर्श :–**

आज नक्षलवादी समस्या सोडविण्याकरीता तत्काळ उपाययोजना नाही. सामान्य परिस्थीती यायला वेळ देणे आवश्यक आहे. कायदा व सुव्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे. नक्षलींच्या क्रुरतेपासून नक्षल भागातील जनतेची सुटका होणे आवश्यक आहे. शासन, प्रशासन व न्याय व्यवस्थेवर विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. नक्षलवादीला विरोध करण्याकरिता उत्कृष्ठ प्रशिक्षित जवान व अत्याधुनिक शस्त्रास्त्र आणि संपर्क यंत्रणेचे प्रचंड मोठे जाळे निर्माण करणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आवश्यक आहे. ज्यामध्ये शिक्षण, आरोग्य व आर्थिक सुबत्ता, दळणवळण, जलद संपर्काची साधणे व तत्पर शासकीय यंत्रणा निर्मितीवर भर देणे आवश्यक आहे.

नक्षलवाद लोकशाही शासन सत्तेला व त्यातील कायदा सुव्यवस्थेला विरोध करून हिंसक प्रवृत्तीवर विश्वास ठेवते. नक्षलवादी विरोधी जुन्या संकल्पना बदलणे आवश्यक आहे. जिवीत हानी होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. या समस्येचा सामना धिरोदात्तपणे व एकजुटीने आणि सामंज्यस्यपणे करणे आवश्यक आहे. नक्षलवाद समस्या मुळात अन्याय, अत्याचार, शोषण, कर्जबाजारीपणा, अविकसितता यांच्याशी जोडली गेली असल्यामुळे विकासाचे लाभ आणि न्याय तळागाळातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचणे गरजेचे आहे

**समारोप :–**

नक्षलवादी समस्या सोडविण्याकरीता शासन पातळीवरून अनेक उपाय योजना करण्यात आल्या. त्यामुळे हि समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होतांना दिसत आहे. अनेक नक्षलवादी शरणही येत आहेत हे शासकीय योजनांचे फलीत आहे. परंतु समस्या सोडविण्याकरीता अत्याधुनिक उपाय व विकासाशी निगडीत पैलूंची सांगड घालणे गरजेचे आहे. असे करूनही नक्षलवाद पुन्हा डोकेवर काढणार नाही याची शाश्वती नाही. आज भारतीय लोकशाही समोर मोठे आव्हान आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय समता व न्याय, स्वातंत्र, बंधुभाव, जनतेची आर्थिक प्रगती इत्यादी खडतर मूल्य भारतासमोर आहेत. हि पूर्ण करण्याकरीता जो ताण शासनावर पडतो आहे, त्यात नक्षलवाद्यांच्या समस्येवर लक्ष केंद्रीत करावे लागते. त्यामुळे अतिरिक्त ताण सरकारवर पडत आहे. सरकारने अधिक गांभिर्याने या ज्वलंत समस्येकडे बघितले तर या समस्येचे हमखास समुळ उच्चाटण करणे शक्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**


1. प्रा. उद्गावकर म.न. – "एकविसाव्या शतकातील दहशतवाद", डायमंड पब्लिकेशन, पुणे
2. डॉ. आगलावे प्रदिप – "भारतीय समाज रचना आणि समता", साईनाथ प्रकाशन, नागपूर
3. प्रा. जोशी बी.आर. संपा.– "डायमंड सामाजिक ज्ञानकोश ;खंड–2", डायमंड पब्लिकेशन, पुणे
4. गावंडे देवेंद्र – "नक्षलवादाचे आव्हान दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान", साधना प्रकाशन, पुणे
5. (Source: en-wikipidia.org/w/index.php_letter-maxalite_Maoist_in surgery and action)




Scanned by CamScanner

# शाहू महाराजांच्या दलित अत्याचारप्रतिबंध अधिनियम कायदयाचा प्रभाव

**डॉ.एन.बी. पोहकर** राजनितीविज्ञान विभाग नागनाथ महाविद्यालय, औंढा नागनाथ ता. औंढा नागनाथ, जि परभणी

**प्रस्तावनाः** शाहू महाराजांनीकोल्हापूर संस्थानात बहुजनांचा आदर व सन्मान केला.शाहू पूर्वकालीन समाजात कनिष्ठ-वरिष्ठ, वतनदार, सुवर्ण-दलित अशीश्रेणी रचना अस्तित्वात होती.दलितांना वतनदाराच्या घरीकाम करावे लागत असे.कामाच्या मोबदल्यात दलितांना शिळे अन्न खाण्यासाठी दिले जात असे.कामाचा मोबदला पैशाच्या स्वरुपात दिला जात नसून धान्याच्या रुपात दिला जात असे.वतनदाराच्या शेतात कायमस्वरुपी काम दलितांना करावे लागे.शेतीत मिळणारे उत्पन्न श्रीमंत वतनदाराच्या घरात जात असे.दलितांना उत्पन्नाचा वाटा दिला जात नसे, फारतर अल्पधान्य कसेतरी जीवन जगेल असे दिल्या जात असे.अल्पधान्य यामधून दलिताच्या कुटूंबाचे पोट भरत नसे.दलित (महार) लोकांचे शोषणहोत असे, त्यांच्यावर उपासमारीची वेळ येतहोती.अन्यायाची वाचा कुणाकडेही फोडता येत नव्हती.छत्रपती शाहू महाराजांनी दलितांच्या सर्व अडचणी आणि प्रश्न समजून घेतले आणि दलितांना वेटरवळा (गुलामगीरी) पध्दतीतून मुक्तकेले.शाहू महाराजांनीसंस्थानातील महार वतने नष्टकेले.बहुजनांना वेटरवळा यापुढेकोणीहीसांगणार नाही? जर कुणी सांगितले तर त्याच्यावर कायदयानेगून्हा दाखलकेला जाईल अशीताकीद दिली, आणि प्रत्यक्षात संस्थानात दलितअत्याचार प्रतिबंधक अधिनियम तयार करुन कार्यान्वित केले.

**शाहू महाराजांच्या कायदयाचा उद्देशः**सामाजिक समानता निर्माण करुन दलित वर्गाला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणे.

**गृहितकेः**शाहू महाराजाच्या लोकोपयोगीकायदयांचा प्रभाव भारतीय दंड सहितेवर पडला.

**शाहू महाराजांचे दलित प्रतिबंधक कायदेः** महार लोकांना लोकल फंडाची माफी दिल्याचा शाहू महाराजांचा ९ में १९१६ चा हुकूम. कोल्हापुरसंस्थानातीलकुलकर्णी वतन खालसा करणारा २८ फेब्रु १९१८ जाहिरनामा, ग्रामीणभागातील बलुते पध्दती रद्दकरणारा २८ फेब्रु १९१८ चा जाहिरनामा, अस्पृश्य समाजातील लोकांनाप्रशासनात नेमणुकहुकूम, २९ जाने १९१९, महार वतने खालसा हूकुम २ जुलै १९२१, दलित अत्याचार प्रतिबंधक हुकुम २७ जुलै १९२१.शाहू महाराजांनी दलितांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीमध्येसुधारणा घडवून आणल्या.वरील कायद्यामधून दलितांना मान, प्रतिष्ठा व सन्मान प्राप्त करुन दिला.या कायदद्याच्या निर्मीतीमुळे दलितामध्ये मुलभूत हक्कांची जाणीव निर्माण झाली, या कायद्यामुळे समाजात जात, धर्म, श्रेष्ठ-कनिष्ठ भावनेमध्ये बदल झाले.दलितावरील अन्याय शोषणकमी झाले.राजकारण व प्रशासनात दलितांना प्रतिष्ठा व सहभाग मिळाला.शाहू महाराजांनी त्यावेळी आखलेली धोरणे उदार आणि दूरदृष्टीचेहोते.त्यांच्या उदार धोरणाचा प्रभाव लोकशाही शासन व्यवस्थेवर पडल्याचे दिसून येते.शाहू महाराजांच्या सामाजिक समतावादी कायद्याचा प्रभाव १९५५ चा नागरीसंरक्षणकायदा यावर पडल्याचे दिसून येते.१९८९ चा दलित अत्याचार प्रतिबंधक कायदा शासनाने निर्माण केला.शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात दलितांचेसंरक्षण विविध कायद्यातूनकेले.ह्याच कायद्याचा प्रभाव भारत सरकारच्या कलम १५३ (अ) धर्म, वंश, जन्मस्थान, निवास, भाषा इ.कारणावरून निरनिराळ्यागटामध्ये शत्रुत्व वाढविणे या कायदयावर दिसून येते.तसेचकलम २९५, धर्मासंबंधी अपराधकायदा, सर्वधर्मीय समान या तत्वाची प्रचीती देतो.तसेचअब्रुनुकसान कलम ४९९, ५०० , ५०१, ५०२ या कायद्यावरही दिसून येतो. शाहू महाराजांच्या लोकोपयोगीकायद्याचा प्रभाव आज शासनाच्या उदारवादी, लोककल्याणकारीकायद्यामधून दिसून येतो.या कायद्यातून दलीतावर होणारे अन्याय दूरकरण्याचा मुख्यहेतू असूनहाच विचार शाहू महाराजांनी आपल्या कायद्यातूनसाकारकेला.

शाहू महाराजांच्या २ जुलै १९२१ चा दलीत अत्याचार प्रतिबंधित कायद्याचा प्रभाव वर्तमान भारतीय दंडसंहिताकलम ३०४ (ब) हुंडाबळी कलम ३०६, आत्महत्या शिथावणी, कलम ३०७, खुनाचा प्रयत्न, कलम ४९३, एखादया पुरुषाने कायदेशिर विवाह झाल्याचा समज निर्माण करुन नविन स्त्रीला फसविणे, कलम ४९४, पती किंवा पत्नीहयात असतांना पुन्हा विवाह करणे, कलम ४९७, परगमण, कलम ४९८, पळवुन नेणे, स्त्रीला उपाशी ठेवणे, कलम ४९८ (अ), स्त्रीलाक्रुर वागणूक देणे या कायदयावर आपल्याला शाहु महाराजांच्या कायदयाचा प्रभाव दिसून येतो. कारण सामाजिक प्रतिष्ठा जोपासण्यासाठीस्त्रीलाकोणत्याहीकारणाने विवाह झाल्यापासून ७ वर्षापर्यंत मारत येत नाही.तसेचहुंड्यामुळे त्रास देता येत नाही.या सामाजिक प्रतिष्ठेचा पाया शाहू महाराजांच्या लोकपयोगीकायदयात आपल्याला दिसून येतो.शाहू महाराजांनीकोल्हापूर संस्थानात उच्च जातींच्या विद्यार्थी वसतिगृहता अस्पृश्य जातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबद्दल उच्च जातीचे प्रबोधन केले.कनिष्ठ जातींना शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले. शाहू महाराजांच्या सामाजिक समतावादी विचांरामुळे कर्मवीर भाऊराव पाटील, बापुजी साळुंखे, दादासाहेब चव्हाण, काकासाहेब देसाई, धामोडचेखामकर गुरुजी या कार्यकर्त्यांनी आपल्या वसतिगृहात अस्पृश्य जातींच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देवून सामाजिक समानता निर्माण केली. मं.गांधी, पं.नेहरु, जयप्रकाश नारायण, म.शिंदे यासारख्या वरिष्ठ नेत्यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक समानतेच्या विचारांचा आग्रह धरला.त्यामुळेसमाजातील उच्च जातीवर प्रभाव पडूनकनिष्ठ-वरिष्ठ सामाजिक असमानतेची दरीकमी झाली.शाहू महाराजांच्या पुरोगामी विचार कार्याचा आधुनिक भारताच्या आणि महाराष्ट्राच्या जडण-घडणीत मोठा वाटा असून त्यांच्या विचार कार्यामुळेच देशातील आणि महाराष्ट्रातील बहुजन वर्गाच्या जीवनात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक परिवर्तन घडून आले आहे. मागासलेल्या वर्गांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

## संदर्भग्रंथ

१. चौधरी आर. २०१४, प्रमुख फौजदारीकायदे, चौधरी पब्लिशर्स जळगांव
२. राऊत ए. २००३, भारतीयाचा पवित्र आचारग्रंथ भारताचे संविधान, रचना प्रकाशन, नांदेड
३. जयसिंगराव पवार, २००१, शाहूस्मारक गौरव ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर
४. चावरे वाय, २००९, अनुसुचित जाती जमातीचेकल्याण व संरक्षणकायदे, मनोविकास प्रकाशन, पुणे
५. मंगल के.टी., २००६, समाजशास्त्रज्ञ राजर्षी शाहू महाराज, जनराज ऑफसेट, कोल्हापूर



Scanned by CamScanner

# माहितीचा अधिकार

प्रा. बी. एस. पाटील जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी.

.....................................................................................................................

प्रस्तावना :

**माहितीच्या अधिकाराचा हक्क म्हणजे काय ?** जनता आणि शासन यांचे परस्पर संबंध पूर्णत: वेगवेगळया पातळीवर नेण्याचे सामर्थ्य या कायदयाने नागरीकांना प्राप्त झाले आहे. आजपर्यंत शासन सर्वाधिकारी आहे आणि ज्यामुळे हे शासन चालते ती जनता दुय्यम आहे. अशीच भूमिका घेतली जात होती. शासनाचे अधिकारी आपली कामे व्यवस्थितपणे पार पाडत आहेत किंवा नाही हे आता या कायद्यमुळे जनतेला समजणार आहे. जे कर्मचारी सचोटीने व प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडतील त्यांना या कायद्याचा कुठलाही धाक किंवा भीती राहणार नाही. जी माहिती संसदेला किंवा राज्य विधीमंडळाला नाकारली जाऊ शकत नाही; अशी कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीला संबंधित खात्याच्या माहिती अधिका–याने पुरविले पाहिजे व गोपनीयतेच्या नावाखाली किंवा अन्य कारणाने ती देण्यापासून कोणाला वंचित ठेवता येणार नाही.

जनहित हाच उद्देश असेल तर अनेक प्रकरणांचा शोध घेता येईल. पण केवळ ब्लॅकमेलिंग करून अधिका–याचा किंवा कर्मचा–यांचा छळ करणे हाच उद्देश असेल तर माहितीच्या अधिकाराचा दुरूपयोग होत असल्याचा घटना कायम घडत राहतील व छोटया छोटया प्रकरणावरून, अनियमितेवरून अधिका–यांना किंवा कर्मचा–यांना धाक दाखवून काही दिवस दहशत माजवता येईल, त्यामुळे प्रशासन स्वच्छ व गतिमान करण्याचा उद्देश सफल होणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियमाखाली माहिती मागण्याचे प्रयोजन स्पष्ट केले पाहिजे. ज्या व्यक्तीला माहिती हवी आहे, त्या व्यक्तीचा त्या माहितीशी काहीतरी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असणे अत्यंत जरूरीचे आहे. माहिती मिळवून त्या माहितीचा चांगला उपयोग केला तरच कायद्याचा उद्देश सफल होईल. ज्यांचा संबंध नाही अशा व्यक्तींना माहिती पुरविली जाते, त्यांनी या माहितीचा कोणत्या प्रकारे उपयोग केला याचा जाब देण्याची वेळ या नंतरच्या काळात येईल व येत आहे. विशेषत: काही स्वयंघोषित कार्यकर्ते, ढोंगी पत्राकार व इतर व्यक्तींना आज प्रशासनाला त्रास देण्यासाठी गमत वाटत असेल, पण या कायद्याचे दुधारी हत्यार त्यांच्यावर सुध्दा उलटेल याचे भान त्यांनी ठेवण्याची गरज आहे.

**माहितीचा अधिकार कायदा, २००५ :** भारतीय संसदेने माहितीच्या अधिकाराचा कायदा मे २००५ मध्ये संमत केला. ऑक्टोबर २००५ मध्ये त्यास राष्ट्रपतीची मान्यता मिळाली आणि कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधानातील कलम १९ अनुसार माहिती प्राप्त करण्याचा अधिकार प्रत्येक भारतीय नागरिकास असून त्यासाठीचा माहितीचा अधिकाराचा कायदा २००५ मध्ये अस्तित्वात आला आहे. देशातील प्रत्येक नागरिकास सरकारची कार्यपध्दती माहिती करून घेण्याचा हक्क असतो. या कायद्यानुसार प्रत्येक नागरिकांस शासकीय कामाची तपासणी करण्याचा आणि कामात वापरलेल्या साहित्याचा नमुना घेण्याचा हक्क प्राप्त होतो. केंद्र आणि राज्य सरकार किंवा शासनाच्या अखत्यारीतील सर्व कचे–या, निमशासकीय कचे–या, महानगरपालिका, नगरपालिका आणि शासनाकडून भरीव अनुदान प्राप्त करणा–या अन्य कचे–यांना माहितीचा अधिकार कायदा लागू आहे.

१) माहितीचा अधिकार कायद्यानुसार, ''माहिती म्हणजे माहिती देता येण्यासारखे कोणत्याही स्वरूपात उपलब्ध असणारे साहित्य, त्यात रेकॉर्ड, दस्तऐवज, मेमो, ई–मेल, मत, सल्ला, प्रेस रिलीज, परिपत्रक, आदेश प्रत्रक, लॉगबुक, करार, अहवाल, नमुना, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण केलेली माहिती तसेच प्रचलित कायद्याखाली सार्वजनिक अधिकारीणीने मूल्यमापन केलेली खाजगी संस्थेबाबतची माहिती इत्यादिंचा समावेश होतो.''

२) माहितीचा हक्क म्हणजे, ''कामाच्या दस्तऐवजाची रेकॉर्डची तपासणी करणे; अधिकृतपणे मान्यता दिलेल्या दस्तऐवजाच्या किंवा रेकॉर्डच्या नोंदी घेणे किंवा प्रती घेणे तसेच साहित्याचा अधिकृत नमूना घेणे होय.''

३) नोंदी किंवा रेकॉर्ड म्हणजे –अ) कोणताही दस्तऐवज हस्तलिखित आणि धारिक फाईल.ब) कोणतीही लघुचित्रफित आणि दस्तऐवज हुबेहुब प्रत.क) लघुचित्रफितीतील समाविष्ट अशा आकृतीची पूनर्चित्रित पत्र.ड) संगणक किंवा तत्सम साधनाद्वारे प्राप्त होणारे कोणतेही साहित्य.

**महितीचा अधिकार कायदा– स्वरूप** :भारतात प्रचलित असलेल्या माहितीचा अधिकार कायद्याचे स्वरूप खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट होते.

**१)कायद्याची निर्मिती** :–महिती प्राप्त करण्यासाठी अधिकारी देणारा, केंद्र सरकारने पारित केलेला माहिती स्वातंत्र्य अधिनियम २००२, महाराष्ट्र सरकारने पारित केलेला महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा २००२ यांच्या आधारे केंद्र सरकारने राष्ट्रीय सल्लागार परिषदेशी सल्ला मसलत करून सुरक्षितपणे आणि सुलभपणे प्राप्त व्हावी, यासाठी पूर्वीचा कायदा निरसित करून २००५ मध्ये माहिती अधिकार संमत केला.

**२)माहितीच्या स्त्रोत संस्था** :–महितीचा अधिकार कायदा केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व कचे–या, निमशासकीय कचे–या महानगरपालिका, नगरपालिका आणि शासकीय अनुदान मिळणा–या सर्व संस्थांना लागू आहे. त्यामुळे या संस्थांकडून माहिती या सदरात येणारी सर्व प्रकारची माहिती प्राप्त करता येते.

**३)सामान्य माणूस केंद्रस्थानी** :–सामान्य माणूस हा केंद्रस्थानी मानून त्याला माहिती पुरविणे हे शासकीय कचे–यांचे कर्तव्य आहे. सरकारी कचेरीने त्यास कामात येणारा व्यत्यय या भूमिकेतून न पाहता तो आपणास सेवा पुरविण्याची संधी देत आहे.

**४)कायद्याची अंमलबजावणी** :–माहिती अधिकारी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात राज्य माहिती आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगावर एक माहिती आयुक्त प्रमुख भूमिका बजावत असतो. आयोगास आवश्यक अशा दहा अधिका–यांची आणि कर्मचा–यांची नेमणूक करण्यात येते. अशी माहिती आयोगाची कार्यालये



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

बहुतेक राज्यांतून अस्तित्वात आली आहेत. माहिती कायद्यातील तरतूदीची अंमलबजावणी करण्यासंदर्भात येणा–या तक्रारी आणि अपीलाची हाताळणी या आयोगामार्फत केली जाते.

५)माहितीची उपलब्ध असलेल्या ठिकाणच्या केंद्रात फक्त १० रूपये शुल्क भरून माहिती मागता येते. अशी माहिती मागितल्यानंतर पुढील ३० दिवसांत ती उपलब्ध करून देण्याचे बंधन आहे. किंवा माहिती सकारण नाकारली पाहिजेत या तीस दिवसांत शासकीय अधिका–याने शुल्क भरण्यासाठी पाठविलेले पत्र आणि शुल्क कचेरीस प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीचा समावेश केला जात नाही.

**६)शासकीय यंत्रणेत आमूलाग्र बदल** :—महिती अधिकार कायद्यामुळे सामान्य नागरिकांना मुलभूत असा अत्यंत मोलाचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळे शासकीय यंत्रणा जागी झालेली असून तिच्यात आमूलाग्र बदल झालेला आहे. हा कायदा नागरिकांच्या ज्ञानात भर टाकणारा, सामाजिक जाणीव देणारा आणि स्वत:च्या मुलभूत हक्कासाठी विधायक मार्गाने देण्याची प्रेरणा देणारा आहे.

**७)माहिती न दिल्यास शिक्षा** :—कायद्यानंतर माहिती मागितल्यानंतर ती मुदतीत उपलब्ध करून दिली पाहिजे. माहिती देण्यास विलंब झाल्यास संबंधीत अधिका–यास प्रतिदिनी रूपये २५०/– दंडाची शिक्षा होऊ शकते. तसेच दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करून दिल्यास रूपये २५,०००/– पर्यंतची दंडाची शिक्षा होऊ शकते.

**८)गरिबांना मोफत सुविधा** :—या कायद्यानुसार माहितीची मागणी करणारी व्यक्ती गरीब म्हणजे दारिद्रय रेषेखालील असेल तर त्यास कोणतेही शुल्क किंवा फी न आकारता माहिती उपलब्ध करून देण्याची सोय आहे.

**९)देशहिताची काळजी** :—माहितीच्या अधिकारांचा वापर कांही व्यक्तीद्वारे देशहिताविरूध्द होऊ शकतो. ही शक्यता लक्षात घेता कोणती माहिती द्यावयाची नाही याबाबत केंद्र सरकारने केलेल्या तरतूदीप्रमाणे राज्य सरकारने तरतुदी करावयाच्या आहेत. त्यामुळे देशहिताची पुरेशी काळजी घेतली जाण्याची शक्यता आहे.

**१०)फायली न तपासण्याचा अधिकार** :—कायद्याखाली नागरिकांना योग्य कारणासाठी फायली तपासण्याचा अधिकार आहे. त्यात पहिल्या तासासाठी शुल्क आकारले जात नाही. परंतु नंतरच्या कालावधीसाठी निर्धारीत शुल्क भरावे लागते.

**माहितीचा अधिकार कायदा – व्याप्ती** :ण्महितीचा अधिकार कायद्याची व्याप्ती पुढील मुद्दयांच्या आधारे विशद करता येईल.

**१)राष्ट्रीय पातळीवर हक्क प्रस्थापित** :—या कायद्यामुळे सामान्य लोकांना घटनेने दिलेला मूलभूत हक्क राष्ट्रीय पातळीपर्यंत प्रस्थापित करण्यास मदत झाली आहे. त्यामुळे व्यक्तीला वैयक्तिक प्रश्नांवर किंवा सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवून खोलवर किंवा मुळाशी जाऊन त्याचा सखोल अभ्यास करणे आणि अन्यायाचे निवारण करणे शक्य आहे.

**२)सर्व क्षेत्रांचा समावेश** :—महितीचा अधिकार कायदा समाजातील सर्व क्षेत्रांना व्यापणारा आहे. म्हणजे या कायद्याचे स्वरूप पाहता देशातील शासन यंत्रणा, आर्थिक प्रतिष्ठाने, व्यवसायिक कचे–या, व्यापारी प्रतिष्ठाने, सेवा संस्था, कला, क्रिडा, संवर्धन संस्था, धार्मिक प्रतिष्ठाने इत्यादि क्षेत्रांना व्यापणारा असा हा कायदा आहे. विशेषत: शासकीय कचे–या, स्थानिक सरकारी आणि निमसरकारी संस्थांचा या कायद्याशी जवळचा संबंध येतो. कारण नागरीकांचा संबंध या सर्व संस्थांशी नित्याचा असतो. रोजगार योजना, गरिबी निर्मुलन कार्यक्रम, स्वस्त धान्य पुरवठा, वृध्दांना निवृत्तीवेतन, दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी निवारा योजना, पाणीपुरवठा योजना, जनतेसाठी दिली जाणारी अनुदाने, शैक्षणिक सोई, शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक आहार पुरवठा योजना अशा प्राकरच्या शेकडो योजनांबाबत अधिकारी वर्ग उत्तरदायी असतो. या सर्व योजनांचा समावेश माहितीचा अधिकार विश्वात होतो. तसेच गरीब, श्रीमंत, स्त्री आणि पुरूष इत्यादी वर्गातील सर्व व्यक्ती माहितीचा अधिकार कायदा अंतर्गत न्याय प्राप्तीसाठी आवश्यक माहिती, आकडेवारी, दस्तऐवज इत्यादी मिळवून तपासून त्याबाबत न्यायाची मागणी करू शकतात.

**३)शासकीय दोषी यंत्रणेत दुरूस्ती** :—शासकीय यंत्रणेत दोष आहेत आणि त्यामुळे शासकीय योजना आणि निर्णयाचे लाभ सामान्य लोकांपर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचत नाहीत. जनतेला माहिती अधिकार कायद्याने योजना आणि निर्णयाची माहिती घेणे, शासकीय यंत्रणेतील दोष समोर आणणे, त्यात दुरूस्ती करावयास सांगणे आणि त्याद्वारे शासकीय यंत्रणा अधिक सक्षम आणि क्रियाशील बनण्याच्या दृष्टीने त्यात अमुलाग्र बदल करण्यास लोकशाही मार्गाने भाग पडणे शक्य होणार आहे.

४) **खुले आणि पारदर्शक प्रशासन बनण्याचा राजमार्ग** :—भारतीय प्रचलित माहिती अधिकार कायदा हा एक प्रशासकीय यंत्रणा आणि प्रक्रिया खुली करण्याचा आणि पारदर्शक बनविण्याचा एक मार्ग आहे. कायद्यात जनतेच्या मागणीला श्रेष्ठतम महत्व असून शासकीय कार्यालयात कार्याबद्दल जबाबदारीची भावना वाढविणे अपेक्षित आहे. त्यामुळे प्रत्येक शासकीय विभागास आणि खात्यांना विविध स्वरूपाची माहिती गोळा करून ती योग्य स्वरूपात जनतेला उपलब्ध करून द्यावी लागणार आहे.

**५)जनसेवेसंबंधित कार्यालयाचा अंतर्भाव** :—महितीचा अधिकार कायद्याच्या कक्षेत देशातील केंद्र आणि राज्य सरकारची कार्यालये, निमसरकारी कार्यालये, नगरपालिका, नगरपरिषदा, सरकारी अनुदार घेणारी कार्यालये इत्यादी सर्व कार्यालये आणि माहितीची ठिकाणे अंतर्भूत होतात. सर्व कार्यालयांचा जनतेशी प्रत्यक्ष संबंध येणार आहे. त्यातून वरील सर्व कार्यालयांना, जनतेस चांगल्या प्रकारची सेवा देऊन शासकीय कचे–याची प्रतिमा उजळण्याची संधी मिळणार आहे.

**६)राज्य माहिती आयोगाची स्थापना** :—राज्यातून माहितीच्या अधिकाराच्या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी या कार्यासाठी राज्य माहिती आयोगाची स्थापना करण्याची योजना आहे. महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य माहिती आयोग कार्यरत आहे. या आयोगात आवश्यक अधिका–यांची आणि कर्मचा–यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत. या आयोगाद्वारे कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात येणा–या तक्रारी आणि अपिले हाताळणे शक्य होणार आहे. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद येथील विभागात माहिती अधिकारी नेमण्यात आले आहेत. तसेच आदिवासी विकास



Scanned by CamScanner

विभागासाठी, राज्य अल्पसंख्यांक आयोग आणि राज्य मानवी हक्क आयोगावर माहिती अधिकारी नियुक्त अरण्यात आले आहेत.

**७)माहिती अर्ज प्रयोजन विचारण्यास प्रतिबंध** :—नागरिकाने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती प्राप्तीसाठी कार्यालयाकडे अर्ज केल्यानंतर अर्जाचे प्रयोजन काय असे नागरिकास अधिका—याद्वारे विचारले जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. अधिका—याने संबंधित नागरिकांचा पूर्ण पत्ता जाणून घेणे बंधनकारक आहे.

**८)माहिती अधिकारासाठी वेबसाईट** :—महिती अधिकार कायद्यानुसार कलम ४(१)(ब) मध्ये नमूद करण्यात आलेल्या मुद्द्यांबाबतीत कोणत्याही व्यक्तीस सुलभ पध्दतीने आणि तत्काळ माहिती मिळावी यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन येथे वेबसाईट निर्माण केली आहे. वेबसाईटवरून कोणत्याही नागरिकास माहिती मिळविणे सोपे झाले आहे.

**९)अधिका—यांवर कारवाईची सोय** :—महिती अधिकार कायद्यानुसार नागरिकाने अर्ज करून मागविलेली माहिती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी माहिती अधिका—यांची आहे. त्यासाठी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद या विभागांतून नियुक्त माहिती अधिकारी कार्यशील आहेत. तसेच आदिवासी विकास विभाग, राज्य अल्पसंख्यांक आयोग, संसदीय कार्य विभाग इत्यादी ठिकाणी असे अधिकारी काम करीत आहेत. जनतेला मागणी केल्यानंतर माहिती उपलब्ध करून देण्यात कुचराई केली अगर चालढकल केल्यास आणि निर्धारीत मुदतीत माहिती देण्याचे टाळल्यास रूपये २५०/— प्रत्येक दिवसासाठी आणि जास्तीत जास्त रूपये २५,०००/— पर्यंत दंड आणि खातेनिहाय चौकशी व शिक्षा होऊ शकते.

**१०)तक्रारी हाताळणी यंत्रणा** :—महिती अधिकार कायद्याखाली प्रत्येक राज्यातून स्वतंत्र माहिती आयोग स्थापण्याची तरतूद आहे. अशा आयोगाच्या प्रमुख पदावर आयुक्त आणि त्यास मदत करणारे दहा अधिकारी असणार आहेत. कायद्याखाली ज्येष्ठ जनमाहिती अधिकारी असणार आहे. कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात तक्रार द्विस्तरीय स्वरूपात करता येते. एक तक्रार याचिका आयुक्ताकडे दाखल करता येईल. तसेच दुसरी याचिका किंवा तक्रार राज्य किंवा केंद्रातील ज्येष्ठ जनमाहिती अधिका—याकडे करता येईल. माहिती अधिका—याद्वारे माहिती देण्यास टाळाटाळ केली, विलंब केला, नकार दिला किंवा कसूर केल्यास त्यावर अपील करता येते. माहिती दिली न गेल्यास त्याची जबाबदारी जनमाहिती अधिका—यांवर येते. माहिती संदर्भातील याचिका ही ३० ते ४० दिवसांत कायद्यानुसार निकालात काढावी लागते.

**सारांश** :—महितीचा अधिकार हा अधिनियम सर्वासाठी आहे. एखाद्या व्यक्तीला आल्यावरील अन्यायावरील अन्यायाचे परिमार्जन करून घेण्याचा सरळ मार्ग उपलब्ध नाही. गोपनीयतेच्या नावाखाली सरकारी कागदपत्रे पाहण्याचा त्याला अधिकार नव्हता. या कायद्याने तो अधिकार त्याला मिळाला आहे.माहितीच्या अधिकाराची खरी गरज आहे. ज्यांचा घटनात्मक हक्क बाधित झाला आहे. हा कायदा न्यायालयीन प्रशासनालाही लागू आहे. माहितीच्या कायद्याचा दुरूपयायोग या कायद्याला निष्प्रभावी करणारी बाब ठरेल. आणि सामान्यांच्या दृष्टीने तसे होते. भ्रष्ट अधिका—यांची अरेरावी वाढण्यास व प्रामाणिक अधिका—यांच्या कार्यशक्तीचा —हास करण्यास कारणीभूत ठरू शकते. ते सामाजिक हितास निश्चितच बाधक ठरेल. म्हणून संबंधित व्यक्ती बाधित असणे वा तसा संभव असणे आणि ज्या कारणांमुळे ती व्यक्ती किंवा समाज बाधित झाला ती कारणे दूर करणे हे माहिती देण्याचे प्रयोजन असावे

**संदर्भ सूची** :—

१) सायबर कायदा, माहितीचा अधिकार कायदा, २००५.
२) व्यवसाय नियमनविषयक कायदे — डॉ. जोशी, प्रा. पाटील, फडके प्रकाशन.
३) माहितीचा अधिकार अधिनियमन, २००५, विवेकानंद प्रकाशन, पुणे.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# पर्यावरणीय शाश्वत विकासात वनांचे महत्त्व

दिपक सुभाष कांबळे, संशोधक विद्यार्थी ,अर्थशास्त्र विभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :** अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी पर्यावरणीय घटक अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. देशाला जर शाश्वत विकासाचे उद्दिष्ट प्राप्त करावयाचे असल्यास पर्यावरणीय घटकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पर्यावरणीय घटकांचा विचार करता पर्यावरण घटकामध्ये वनांना अनन्य साधारण असे महत्त्व आहे. सध्या जगात पर्यावरणाच्या असमतोलामुळे प्रदूषणाचा फार मोठा फटका बसत आहे. यावर उपाय म्हणून प्रत्येक देशाने आहे त्या वनांचे संरक्षण करून जंगलांची लागवड करणे क्रमप्राप्त ठरत आहे. प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी वने (जंगले) महत्वाची भूमिका पार पाडतात. पर्यावरणाच्या शाश्वत विकासासाठी झाडांची लागवड करणे व त्यांचे संवर्धन करणे महत्वाचे आहे.

**शाश्वत विकास म्हणजे काय ?**

शाश्वत विकास म्हणजे जो विकास सध्याच्या पिढ्यांच्या सर्व गरजा भागवतो त्याच बरोबर भावी पिढ्यांच्या गरजांची काळजी घेतो. याचाच अर्थ वर्तमानकाळातील गरजांच्या पूर्ततेबरोबरच भविष्यकाळात येणाऱ्या समस्या, गरजा यांची काळजी घेऊन केलेला विकास होय.

सध्याचा विकास हा अशाश्वत स्वरूपाचा आहे कारण हा विकास फक्त वर्तमानकाळातील गरजांचा विचार करतो. परिणामी भविष्यकाळात मर्यादीत नैसर्गिक साधनसंपत्ती, वाढती लोकसंख्या यामुळे गरजांची तीव्रता अधिक वाढणार आहे. यातून वनांची संख्या सातत्याने घटत आहे. प्रदूषण, तापमान वाढ, ओझोनचा क्षय यासारख्या महाभयानक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. यासाठी वनसंपत्तीत वाढ करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणीय शाश्वत विकास महत्त्वाचा आहे.

**दरडोई जंगलाचे / वनांचे प्रमाण**

गेल्या ५० वर्षात जगातील एकूण वनक्षेत्रापैकी जवळजवळ निम्मे वनक्षेत्र घटलेले आहे. तसेच दरवर्षी १६ द.ल. हेक्टर क्षेत्रातील जंगले शेती क्षेत्राच्या वाढीसाठी तोडली जात आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वनक्षेत्र घटलेले आहे. त्यातच गेल्या दहा वर्षात ३ बिलियन हेक्टरहून अधिक जंगले नष्ट झालेली आहेत.

दरडोई जंगलाचा विचार करता जगात १.०८%, एवढे जंगलांचे प्रमाण आहे. यु.एस.ए. मध्ये १.८%, स्वीडन ३.२%, रशिया ३.५%, ऑस्ट्रेलिया ५.१%, ब्राझील ८.६%, कॅनडा २२.१% तर भारत ०.१% एवढे प्रमाण आआहे. इतर देशातील दरडोई जंगलाचा विचार करता भारत खूपच मागे आहे. भारत सरकारने रिमोट रेसिंग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतात अंदाजे एकूण ६९ मिलियन हेक्टर क्षेत्र वनांनी व्यापलेला आहे. ते एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २१% एवढे आहे. पर्यावरणाच्या समतोलासाठी एकूण क्षेत्रफळाच्या दृष्टीकोनातून ३३% वनांचे क्षेत्र असणे आवश्यक आहे. परंतु भारतात २१% एवढेच प्रमाण असल्याने अजून जवळजवळ १२% वनांचे क्षेत्र वाढविणे गरजेचे आहे.

**भारतात वनांनी व्यापलेले एकूण क्षेत्र**

देशाच्या एकूण क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार करता ६९.७ मि. हेक्टर क्षेत्र वनांनी व्यापलेले आहे. खालील आकडेवारीवरून भारतातील वन क्षेत्राची परिस्थिती लक्षात येते.

**भारतात वनांनी व्यापलेले एकूण क्षेत्र**

| अ.क्र. | वर्ष | वनांनी व्यापलेले एकूण क्षेत्र (मि. हेक्टर) | टक्के |
|---|---|---|---|
| १. | १९८७ | ६४.१ | १९.५ |
| २. | १९९१ | ६३.९ | १९.४ |
| ३. | १९९५ | ६३.९ | १९.४ |
| ४. | २००३ | ६७.० | २०.६ |
| ५. | २००७ | ६९.० | २१.० |
| ६. | २०११ | ६९.२ | २१.५ |
| ७. | २०१४ | ६९.७ | २१.७ |

संदर्भ : भारतीय वन सर्वेक्षण अहवाल- २०१४.




भारतीय वन सर्वेक्षण अहवालानुसार असे दिसून आले आहे की, भारतात १९८७ मध्ये १९.५% क्षेत्र वनांनी व्यापलेले आहे. परंतु १९९१ ते १९९५ या काळात मात्र वनांचे क्षेत्र स्थिर राहिलेले आहे. त्यानंतर थोड्या फार प्रमाणात भारतात वनांच्या क्षेत्रात वाढ झालेले दिसते. २०१४ अखेर ६९.१ मी. हेक्टर क्षेत्रामध्ये २१.१% एवढे वनक्षेत्र व्यापलेले दिसते आहे परंतु अद्यापही पर्यावरणाच्या समतोलासाठी आवश्यक ३३% वनक्षेत्र निर्माण झालेले नाही. अजून १२% वनक्षेत्राची वाढ करणे गरजेचे आहे.

**वन संसाधनाचे महत्त्व**

वन संसाधने पर्यावरणीय समतोल राखण्यात तसेच आर्थिक उत्पादनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असतात. त्याचबरोबर रोजगार निर्मितीसाठी, सामाजिक विकासासाठी, स्थानिक व वैश्विक पर्यावरण संवर्धनासाठीही वन संसाधने महत्त्वाचे आहे. देशाच्या GDP मध्ये १९९६-९७ मध्ये वनक्षेत्राचा हिस्सा १% होता (१९८०-८१ च्या किमतीनुसार) तर २०१०-११ मध्ये वन व कृषी क्षेत्राचा हिस्सा ६.६% (२००४-०५ च्या किमतीनुसार), २०११-१२ मध्ये ३.६% तर २०१२-१३ मध्ये १.८ एवढा हिस्सा वन क्षेत्राचा आहे. एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेत वन संसाधनाना महत्त्व प्राप्त झालेले आहे. ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) **जळावू व इमारतीचे लाकूड :**

वन संसाधनाचा महत्त्वाचा उपयोग म्हणजे सध्याच्या काळात जळावु व इमारतीसाठी तसेच इतर व्यावसायीक उपयोगासाठी मोठ्या प्रमाणात जंगलाचा / वनसंपत्तीचा उपयोग केला जातो.

२) **वनापासून मिळणारे उपपदार्थ :**

वन संपत्ती पासून कच्चे रबर, डिंक, मध अशा प्रकारचे अनेक उपपदार्थ मिळवता येतात त्यातून लोकांना जगण्याची नविन संधी प्राप्त होते तसेच रोजगार निर्मितीस चालना मिळते.

३) **जैवविविधता संरक्षण :**

वनसंसाधनामुळे दुर्मीळ असणारी जैवविविधता संवर्धन होण्यास मदत होते. तसेच वेगवेगळ्या प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत त्या नियंत्रणात आणता येतात. तसेच जैवविविधतेचे संरक्षण होवून पर्यावरणाचा विकास होतो.

४) **प्रदूषण नियंत्रण :**

जगात मोठ्या प्रमाणात प्रदुषण होते आहे. हवेमध्ये वाढलेला कार्बनडाय ऑक्साईड शोषून घेवून स्वच्छ ऑक्सीजन पुरवठा करण्याचे कार्य वन संपत्तीमुळे होते. त्यामुळे वन संपत्तीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

५) **जमिनिची धूप कमी होते :**

अलिकडे जमिनिची धूप मोठ्या प्रमाणावर होत आहे. परिणामी जमिनीची क्षारता व गुणवत्ता कमी होत आहे. त्यामुळे वनांची लागवड मोठ्या प्रमाणात झाली तर जमिनीची क्षारता व गुणवत्ता टिकवण्यास मदत होवून जमिनीची उत्पादन शक्ती वाढीला मदत होते. परिणामी वनांना महत्त्व आहे.

६) **पावसाच्या प्रमाणात वाढ :**

वनांमध्ये वाढ केल्यास पावसाच्या प्रमाणात वाढ होण्यास मदत होते. अलिकडे पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागते किंबहुणा दुष्काळाला सामोरे जावे लागते. त्यामुळे दुष्काळावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी वनाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. म्हणून वन क्षेत्रात वाढ करणे गरजेचे आहे.

**वनसंवर्धन आणि सरकारी धोरण**

देशाच्या अर्थव्यवस्थेत वनांचे (जंगलाचे) महत्त्व ओळखून वन क्षेत्राचा विकास तसेच संवर्धन करण्यासाठी सरकारी पातळीवर विविध कायद्यात्मक तरतूदी करण्यात आलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे.

१) **इंडियन फॉरेस्ट ॲक्ट (१९२७) :**

भारतीय वन अधिनियम १९२७ या कायद्यानुसार नैसर्गिक जंगलाचे रक्षण करणे क्रमप्राप्त असून बेकायदा वृक्षतोडीवर आळा बसावा अशा तरतूदी करण्यात आल्या.

२) **वनधोरण (१९५२) :**

देशाच्या विकासात वनांना अनन्य साधारण असे महत्त्व असल्याने भारत सरकारने १९५२ मध्ये वनधोरण जाहीर केले. या धोरणानुसार देशात वनक्षेत्राची वाढ करून वनक्षेत्राचे प्रमाण ३३% करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला या धोरणात पुढील महत्त्वपूर्ण घटकांचा समावेश करण्यात आला.

१. वनापासून मिळणाऱ्या उत्पादनात वाढ करणे.
२. वनावर आधारित क्षेत्राचा विकास करणे.
३. वनक्षेत्राचा विकास करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे.

३) **सामाजिक वनीकरण :**

राष्ट्रीय कृषी आयोगाच्या शिफारशीनुसार भारत सरकारने १९७६ मध्ये बिगर वनाखालील क्षेत्र व सरकारी पडीक जमिनीमध्ये सामाजिक वनीकरण करण्याचा प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पाअंतर्गत खालील घटकांना प्राधान्य देण्यात आले.

१. एकूण क्षेत्रफळावरील हरीत अच्छादन वाढविण्याचा प्रयत्न करणे.
२. ग्रामीण भागातील युवकांना तसेच सीमांत व अल्प भूधारकांना रोजगार प्राप्त करून देणे.
३. ग्रामीण भागातील युवकांचा सामाजिक दर्जा उंचावणे.
४. आगपेटी उद्योग, कागद उद्योग इ. साठी कच्चा माल निर्माण करणे.
५. ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास करणे.

४) **वनसंवर्धन कायदा (१९८०)**

देशाचा आर्थिक विकास पर्यावरणावर अवलंबून आहे यासाठी पर्यावरण संरक्षणाची गरज आहे. ही गरज ओळखून वनांच्या संरक्षणासाठी तसेच



Scanned by CamScanner

संवर्धनासाठी १९८० मध्ये वन संरक्षण कायदा मंजुर करण्यात आला. या कायद्याअंतर्गत वनसंवर्धनावर अधिक भर देण्यात आला. यामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

१. कोणत्याही आरक्षित वन अथवा त्याचा कोणताही भाग अविरतपणे आरक्षित केला असला पाहिजे.

२. हा कायदा राज्यशासनाच्या वनांचे जतन करणे किंवा वनजमिनीचा वनेतर उद्देशासाठी उपयोग करणे म्हणजे चहा, कॉफी, मसाला पिके, रबर, फल झाडे इ. वनजमिनीवर लागवड करणे या अधिकारावर मर्यादा आणतो.

३. केंद्र शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय राज्य शासन कोणत्याही प्रकारे विनारक्षित वन अथवा वनजमिनीचा वनेत्तर उद्देशासाठी वापर करू शकत नाही.

**५) पर्यावरण मंत्रालय (१९८५)**

मानवी जीवनात पर्यावरणाचे महत्त्व ओळखून भारत सरकारने १९८५ साली पर्यावरण मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. या मंत्रालयाच्या माध्यमातून वृक्ष तोडीवर आळा, सामाजिक वनीकरणात वाढ, वणवे, मातीची धुप, जंगलाचे संवर्धन, वन्यप्राण्यांचे संरक्षण व व संवर्धन इ. बाबतीत धोरणे ठरविण्याचा अधिकार मंत्रालयावर सोपविण्यात आला.

**६) राष्ट्रीय संरक्षण धोरण (१९८८)**

१९८८ मध्ये भारतात राष्ट्रीय वनसंरक्षण धोरण निश्चित करण्यात आले. तसेच राष्ट्रीय वनसंवर्धन कार्यक्रम, नॅशनल फॉरेस्ट ॲक्शन प्रोग्राम (NFAP) तयार करण्यात आला. वणव्यांपासून देशातील जंगलाचे संरक्षण व्हावे या हेतूने १९८४ पासून (UNO) संयुक्त राष्ट्रसंघाच्या मदतीने वणवे प्रतिबंधक प्रकल्प राबविण्यात आला.

**७) वनविकास महामंडळे**

वनक्षेत्राचा सर्वांगिण विकास करण्यासाठी १७ स्वायत वन विकास महामंडळे वेगवेगळ्या राज्यात तसेच केंद्रशाशित प्रदेशात स्थापन करण्यात आली. वृक्षांची लागवड, वनउपजांना योग्य बाजारपेठा मिळविण्यासाठी प्रयत्न करणे, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, रोजगार इ. कामे महामंडळाच्या मार्फत सुरू करण्यात आले.

**वनसंवर्धनासाठी उपाययोजना**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखून वनसंवर्धनासाठी सर्वतोपरी योगदान देणे गरजेचे आहे. तरच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबेल व वनसंवर्धन होऊन पर्यावरणाचा समतोल अबादीत राहील. यासाठी पुढील उपाययोजना करता येवू शकतील.

१. व्यक्ती, वेगवेगळ्या सामाजिक संस्था इ. वृक्ष लागवडीचे कार्यक्रम हाती घ्यावे.
२. वृक्षांचे संरक्षण व त्याची योग्य जोपासना करावी.
३. वृक्ष तोडीवर नियंत्रण आणण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करावी.
४. वनामध्ये / जंगलामध्ये लागणारे वणवे थांबविण्यासाठी उपाययोजना करणे.
५. वनांचे महत्त्व ओळखून समाजजागृती करावी.
६. प्रत्येक व्यक्तीने किमान एक झाड लावावे व त्याचे संवर्धन करावे.
७. ग्रामीण भागात वनांचे महत्त्व ओळखून वृक्षतोडीवर आळा घालावा.
८. देशातील प्रत्येक ग्रामपंचायतीमार्फत दरवर्षी गावामध्ये वृक्षारोपन करावे.
९. विकासाच्या नावाखाली होणारी वृक्षतोड थांबवावी.
१०. शाळेत, महाविद्यालयात विद्यार्थ्यांना वनांचे महत्त्व पटवून देवून वृक्षलागवडीवर लक्ष्य केंद्रीत करावे.
११. ज्या भागात / जंगलात खनिज संपत्तीसाठी खोदलेल्या खाणीमध्ये वृक्षारोपन करून त्यांचे संवर्धन करावे.
१२. वनसंवर्धनासाठी शासनस्तरावर कायद्यात्मक तरतूदी अधिक व्यापक कराव्यात.

थोडक्यात वने ही देशाची संपत्ती आहे. ती पुनर्निर्माण होणारी नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. कोणत्याही विकास कार्यासाठी वने महत्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे लोकांच्या आजच्या व देशाच्या भविष्यातील कल्याणासाठी वनांचे संरक्षण आणि संवर्धन करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१. Jadhav H., Bhosale V.M. (1995). Environmental Protection and Laws, Himalaya Publication House, Delhi.
२. पर्यावरण शास्त्र परिचय - जयकुमार मगर, विद्या प्रकाशन, नागपूर.
३. भारतीय अर्थव्यवस्था, रूद्रदत्त, के.पी. सुंदरम.
४. पर्यावरण अभ्यास - डॉ. प्रकाश सामंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
५. भारतीय वनसंरक्षण अहवाल - २०१३-१४.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# स्वच्छ भारत अभियान आणि हागणदारी मुक्तता

अरूण भावसिंग चव्हाण, अर्थशास्त्र विभाग,
एस. एन. मोर कला, वाणिज्य आणि श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा

**प्रस्तावना :** अलीकडेच संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे (UNDP) २०१५ या वर्षाचा मानव विकास निर्देशांक (HDI) जाहिर झाला. यामध्ये भारताचा क्रमांक (१८८ देशांच्या यादीत) १३० वा आला, जो २०१४ मध्ये १३५ होता. या प्रगतीचे क्षय उच्च आर्यूमान आणि सकल राष्ट्रीय उत्पन्नाला द्यायला हवे. या मानव विकास निर्देशांकामध्ये उच्च क्रमांक प्राप्त करणा-या देशांचा उल्लेख करायचा झाल्यास यामध्ये नॉर्वे, आस्ट्रेलिया, स्विझरलँड, डेन्मार्क, नेदरलँड यांचा समावेश होतो, या देशांचा उच्च मानवी विकासाचे वेगवेगळे कारक असले तरी त्यामध्ये मुख्य कारक (घटक) हा स्वच्छता आहे. म्हणूनच स्वच्छतेला देशांच्या विकासामध्ये महत्वपूर्ण स्थान आहे.

भारताच्या विकासाच्या प्रवाहामध्ये स्वच्छतेला खूप महत्व आहे, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत या नावाने उपक्रम (Initiative) ०२ ऑक्टोंबर २०१४ पासून सुरू केले. या उपक्रमाला संपूर्ण भारतामध्ये खूप मोठया प्रमाणात राबविण्याचे काम सुरू आहे. या उपक्रमाला निधिचा पूरवठा म्हणून सेवा करासोबत अतीरिक्त ०.५ टक्के उपकर गोळा केला जातो आहे.

❖ **उघडयावर शौच : (OPEN DEFECATION)**

जगातील दहा देशांमध्ये राहणा-या १ अब्ज लोकांपैकी ८२ टक्के लोक हे उघडयावर शौच करतात. यांच्यामध्ये भारत वर आहे, भारतामध्ये ५६७ मिलीयन लोक उघडयावर शौच करतात अशी माहिती जागतीक आरोग्य संघटना आणि युनीसेफ यांच्या अहवालाद्वारे स्पष्ट केल्या गेली आहे.

स्वच्छ भारत अभियानाचा उद्देश नागरी भागासोबत ग्रामीण भागातील वेगवेगळे क्षेत्र स्वच्छ करण्याचा आहे. या क्षेत्रांपैकी एक क्षेत्र उघडयावर हागणदारी मुक्तता करण्यासंबंधीत आहे. यामुळे मोठया प्रमाणात रोगराईची वाढ होवून उत्पन्नाचे नुकसान होते. आजही भारतातील काही राज्यामध्ये ग्रामीण भागात उघडयावर शौच करणा-याचे प्रमाण खूप जास्त आहे. यांचे वेगवेगळे सामाजिक आणि आर्थिक कारणे आहेत, ते काहिही असो, काही राज्यामध्ये आर्थिक विकासाचा दर वाढत असतांना शौचालयाच्या सोईचा वापर करणा-यांचे प्रमाण वाढले नाही. खालील तक्त्यामध्ये काही राज्यामधील ग्रामीण भागात उघडयावर शौच करणा-यांची माहिती दिलेली आहे.

महाराष्ट्रामध्ये हे अभियान सुरू झाल्यापासून ८ लाख वैयक्तीक स्वच्छता गृहाची उभारणी झाली. परंतू अजुनही ४०.७१ टक्के कुटूंबाकडे शौचालये नसल्याचे चित्र आहे. चालू वर्षात आतापर्यंत ३ लाख ६८ हजार शौचालये दारिद्र रेषेखालील कुटूंबासाठी बांधण्यात आली. पण तरीही अजूनपर्यंत १६ लाख ५६ हजार ६८२ कुटूंबाकडे शौचालयाचा अभाव आहे. नवीन आकडेवारीनुसार राज्यात ग्रामीण भागात ७४ लाख ३५ हजार ३७७ कुटूंबाकडे (५६.२६ टक्के) व्यक्तीक शौचालये आहेत. उरलेल्यांसाठी येत्या चार वर्षात शौचालये उभारणीचे लक्ष ठेवण्यात आले आहे. २०१२-१३ या वर्षात ग्रामीण भागात १ लाख ८६ हजार, तर २०१३-१४ मध्ये ५ लाख १५ हजार शौचालय बांधण्यात आली तर २०१४-१५ मध्ये ४ लाख ६५ हजारापर्यंत पोहचली.

| अनुक्रमांक | राज्याची नावे | उघडयावर शौच करणा-या कुटुंबाचे प्रमाण (आकडेवारी टक्क्याध्ये) |
|---|---|---|
| १ | झारखंड | ६१.६७ |
| २ | मध्यप्रदेश | ८६.४२ |
| ३ | छत्तीसगढ | ८५.१५ |
| ४ | ओरीसा | ८४.६८ |
| ५ | बिहार | ८१.३६ |
| ६ | राजस्थान | ७६.८७ |
| ७ | उत्तर प्रदेश | ७७.१३ |
| ८ | तामीळनाडु | ७३.२७ |
| ९ | कर्नाटक | ६८.११ |
| १० | गुजरात | ६५.७६ |

Source :- The Economic Times, Dated 03/10/2014

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, झारखंडमध्ये ग्रामीण भागात उघडयावर सौच करणा-याचे प्रमाण ६१.६७ टक्के आहे. तर त्यामागे मध्यप्रदेश ८६.४२ टक्के, छत्तीसगढ ८५.१५ टक्के, ओरीसा ८४.६८ टक्के, बिहार ८१.३६ टक्के, राजस्थान ७६.८७ टक्के, उत्तर प्रदेश ७७.१३ टक्के, तामिळनाडू ७३.२७ टक्के, कर्नाटक ६८.११ टक्के, गुजरात ६५.७६ टक्के दिसून येते. या वेगवेगळया राज्यामध्ये ग्रामीण भागातील उघडयावर शौच करणा-याच्या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, या राज्यामध्ये स्वच्छतेचे स्थिती किती भयावह असेल.

❖ **आर्थिक विकास आणि हागणदारी मुक्तता :**

उघडयावर शौच करणे हे फक्त व्यक्तीगत सन्मानालाच कमी करत नाही तर रोग आणि गरीबीच्या दृष्टचक्रालासुद्धा निरंतर सुरू ठेवतो, यामुळे विषाणू आणि अमीबा (Amoeba) यांचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात वाढते, डायरिया (Diarrhoea) सारखे आजार वाढतात हे पूढे वेगवेगळया रोगांना तसेच कुपोषणाला वाढविते. असे देश ज्यामध्ये उघडयावर सौच करणा-याचे प्रमाण जास्त आहे. त्या देशामध्ये लहान मुलामध्ये मृत्युचे प्रमाण (पाच वर्षाखालील) जास्त आढळते. संरक्षित आणि खाजगी शौचालयाची अपर्याप्तता ही स्त्रियांना धोक्याप्रती अधिक संवेदनशिल बनवितात.

भारताच्या G. D. P. चा १: भाग हा सार्वजनिक अरोग्यावर खर्च केला जातो. जरी हा खर्च इतर देशांच्या मुलनेने कमी असला तरी (अमेरिका ८.४:, ब्राजील ४.१:, चिन ३:) यामुळे इतर महत्वपूर्ण क्षेत्रावर केल्या जाणा-या व्ययावर मर्यादा येते. याचा परिणाम इतर क्षेत्राच्या विकासावर होतो. उघडयावर शौचांचे



Scanned by CamScanner

आरोग्यावर होणारे वेगवेगळे परिणाम आहेत. त्या सर्वाचा परिणाम व्यक्तीच्या उत्पादकतेवर होतो. याचा सरळ परिणाम उत्पादन कमी होऊन आर्थिक विकासाला घटविण्यावर होतो.

❖ **काय करायला हवे :**

स्वातंत्र दिनाला लाल किल्ल्यावरून जनतेला संबोधतांना पंतप्रधानांनी म्हटले, 'शौचालय हे मुलींचे चांगले मित्र असतात.' त्यांनी शाळांमध्ये मुलींकरीता वेगळया शौचालय असण्याला प्राधान्य दिले. ज्यामुळे मुलींचे शाळा सोडण्याचे प्रमाण कमी होईल. देशामध्ये शौचालय निर्मितीला प्रोत्साहन म्हणून गरजू व्यक्तींना रु. १२,००० शौचालय बांधकामास मदत म्हणून दिल्या जात आहे.

जगामधील एक तृतीयांश लोकांकडे शौचालयाची सुविधा नाही. भारतासारख्या देशामध्ये शौचालयाचे निर्माण करणे ही मोठी समस्या आहे. परंतु तंत्रज्ञानाचा वापरामुळे काही पर्याय उपलब्ध आहे. त्यामध्ये -

१) शुन्य विसर्जन संडास (Zero Discharge Toilet) काही वर्षापूर्वी कानपूर आय. आय. टी. (IIT) मध्ये विकसीत केल्या गेले. रेल्वेमध्येयांचा वापर सुरु आहे. अश्या प्रकारच्या शौचालयाला विद्यूत किंवा घाण वाहून नेणा-या नाल्यांची सूद्धा गरज लागत नाही. त्यामुळे यांचा वापराला प्राधान्य देण्यात यावे. आधुनिक संडासाच्या वापराला प्रोत्साहन दिल्या जावे. जसे बायोग्रेगाडेबलस् बॅगस् (Biogegradeble Bags) पिट् लॅटरिन ॲन्ड सेटरीक टॅंकाचा वापर जो कमी पाण्याची उपलब्धता असणा-या क्षेत्रामध्ये वापरल्या जाऊ शकते.

२) सामाजिक विकासाच्या योजना, जसे वेगवेगळया आवास योजना, स्वस्त धन्य योजना यांचा ताळा घेणा-यांसाठी संडासाच्या निर्माणाची सक्ती असणा-यासाठीसुद्धा शौचालय (व्येयक्तीक) अनिवार्य केल्या जावे.

३) काही आरोग्य सेवक आणि सेवीकांची नेमणूक जे (स्वयंसेवक) म्हणुन कार्य करेल. त्यांना काही प्रेरणा आणि प्रलोभने देवून त्यांच्याकडून घरोघरी जावून संडासाच्या वापराच्या संबंधीत बाबींचा उद्‌बोधन करून द्यावे.

४) सामाजिक जागृतीच्या कार्यक्रमामध्ये वाढ केल्या जावी, जसे शिक्षक आणि विद्यार्थ्यांद्वारे महिन्यातून जर शक्य असेल तर एक वेळा स्थानिक पातळीवर लोकांना शौचालयाच्या वापरापासुन होणा-या लाभाचे महत्व पटवून द्यावे.

५) शासनाद्वारे खाजगी क्षेत्राची मदत घेऊन देशामध्ये मोठया प्रमाणावर शौचालयाच्या निर्माणास सुरूवात करावी यामुळे सरकारवर आर्थिक बोजा कमी होईल.

६) देशामध्ये गरीबांच्या राहणीमानाचा दर्जा वाढविण्यावर भर द्यायला हवे. जसे शिक्षणाचा विस्तार करणे, समाजामध्ये चांगल्या वाईट या गोष्टींची लोकांना जान होऊन उघडयावर सौच करण्यावर नियंत्रण मिळवण्यास मदत होईल.

❖ **निष्कर्ष :**

स्वच्छता ही व्यक्तीच्या जीवनाचा अभिन्न घटक आहे. स्वच्छतेवर आरोग्य अवलंबून असते आणि आरोग्यावर देशाचा आर्थिक विकास, म्हणून जर आर्थिक विकास साधायचा असेल तर स्वच्छता ठेवणे आवश्यक आहे. स्वच्छतेसाठी उघडयावर सौच करणे थांबवावे लागेल. त्यासाठी मोठया प्रमाणावर शौचालयाची निर्मिती करावी लागेल. तरच २०१६ पर्यंत भारत हागणदारी मुक्त होईल.

❖ **संदर्भ सूची**

१ भारतीय अर्थव्यवस्था - गौरव दत्त एवं अश्विनी महाजन - एस. चंद पब्लीकेशन, नवी दिल्ली.

2 The Economic Times, Dated : October 03, 2014

3 The Economic Times, Dated : December 15, 2015

4 Article 'Does 'Shit Shock You' by Patralekha Chatterjee – The Economic Times, Dated : September 03, 2014

5 Article 'India Needs a Booster does for Health for All' by Kiran Mazumdar – Shaw - The Economic Times, Dated : March 06, 2015

६ ''दैनिक लोकसत्ता'', दि. ०८ जानेवारी २०१६.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# काळानुरुप बदलते पालक बालक संबंध

**प्रा.कु.लीना शरदराव गावंडे**, गृहअर्थशास्त्र विभाग स्व. पंचफुलाबाई पावडे कला, वाणिज्य महिला महा.वरुड, जि. अमरावती

**प्रस्तावना :** आजच्या २० व्या शतकांत जे क्रांतीकारी बदल होत चालले आहे अशा बदलांतील एक क्षेत्र म्हणजे कुटूंब. कुटूंब संस्थेचे स्वरुप बदलत चालले आहे कुटूंबातील सभासदांची संख्या कमी होऊन एकत्र कुटूंब पध्दतीकडून विभक्त कुटूंब पध्दतीकडे संक्रमण होत चालले आहे. एकत्र कुटूंबामधून होणाऱ्या आंतरक्रियांमधून व परस्पर संबंधातून बालकांचे वेगळे व्यक्तीत्व तयार होत असते. काही प्रमाणात शॉक ॲबसॉरबर म्हणून एकत्र कुटूंबाचा उपयोग हात असे परंतू आताच्या विभक्त कुटूंबामुळे तसेच एकेरी पालक कुटूंबामुळे बालकांच्या समस्याचे स्वरुप बदलत चालले आहे. अशावेळीच पालक-बालक यांच्यातील परस्पर आंतरक्रियेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. कारण रोज बदलत जाणारी परिस्थिती, त्याने निर्माण झालेली असुरक्षितता, याने गांजलेले पालक, त्यातून मुलांच्या भविष्याविषयी वाटणारी भिती या गोष्टींचा पालक आणि मुल या नात्यावर ताण निर्माण झालेला असतो. खरं तर आज साहीत्याद्वारे वडिलधाऱ्यांच्या अनुभवाद्वारे मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध आहे. परंतु या माहितीद्वारे आपल्या समस्या सोडविल्या जातीलच असे नाही कारण प्रत्येक घराघरामधील नतोसंबंधांमध्ये असलेली भिन्नता होय.

रिब्बल ह्यांनी जीवनाच्या प्रारंभीक वर्षात मातापिता व बालकांचे संबंध प्रतिकूल असल्यास होणारे दुष्परिणाम स्पष्ट केले आहे. शिशूचे मातापित्याशी असलेले संबंध प्रतिकूल असल्यास शिशूत अशा प्रतिक्रया उत्पन्न होतात की, ज्यामुळे प्रौढावस्थेत व्यतित्वासंबंधी विकृती उत्पन्न होऊ शकते. त्याशिवाय जीवनात अनुकूल अनुभव आल्यास त्याचा प्रतिकार होऊ शकतो. जेव्हा बालक मातापित्याच्या घनिष्ठ संपर्कापासून वंचित राहतो तेव्हा त्याचा सर्वांगिण विकास मंद गतीने होतो. बालकाला मातापित्याच्या प्रेमापासून काही काळ वंचित राहावे लागले तरी नंतर मिळणारा आनंद त्याची हानी भरुन काढु शकतो आणि एक स्वस्थ व्यक्तिमत्व निर्माण होऊ शकते. याउलट बालकाला सुरुवातीपासून प्रेम मिळत नाही. आनंददायक अनुभव मिळत नाही तेव्हा मोठेपणी देखील त्याचा प्रभाव राहतो. लहानपणीच बालकांच्या अभिवृत्ती, वर्तन प्रकार आणि व्यक्तिमत्वाचा पाया घातला जातो. म्हणून पालक-बालक संबंधाला अतिशय महत्वाचे स्थान आहे.बऱ्याच घरातून आई वडिल नोकरी करतात. त्यामुळे मुलांकडे पूर्णवेळ लक्ष द्यायला त्यांना वेळ नसतो विशेषत: आईच्या मनात याबद्दलची अपराधी भावना फार तीव्र असते त्याची भरपाई म्हणून असे आईवडील मुलांचे हट्ट पुरवित राहतात, मात्र मुलाच्या भावनिक गरजा ते ओळखू शकत नाहीत आपण मुलाबरोबर वेळ घालवावा, संवाद साधावा या सगळ्या गोष्टी हळुहळू दुय्यम होवू लागतात ऑफीसमधून दमून आल्यावर मुलांनी काही प्रश्न विचारले तर तु टि. व्ही. बघ मी फार दमले किवा दमलो. मला स्वयंपाक करावचाय तुझ तु का नाही बघू शकत, अशी अनेक वाक्ये आपण मुलांवर फेकत राहतो अशाने दुरावा वाढत जाता असा दुरावा जेव्हा एक अक्राळविक्राळ रुप घेतो त्यावेळेला जाग येतो की, काही तरी बिनसले आहे, काही मुले नैराश्यांनी ग्रासली जातात. काही मुलांच्या मनावर खोलवर परिणाम होतो तर काही मुले बेफिकिरपणे वागु लागतात त्यांचे अभ्यासातले लक्षही उडते ते कधी फॅशनच्या तर कधी वाईट सवयीच्या आहारी जातात.

मुलांना सगळे स्वातंत्र्य देवून आपण त्याना मानसिक दृष्ट्या सुदृढ बनविणार आहोत असे आईवडिलांना वाटते पूर्वीप्रमाणे आईवडिलांचा धाक आता मुलांना राहिलेला नाही. अनेक मुले आपल्या वडिलांना एकेरी नावाने हाक मारतात 'ए बाबा' असे वडिलांना म्हणता म्हणता दोघांमधील आदाराची रेषा कधी पुसली जाते कळत नाही. जेव्हा मुल बाबालाच आव्हान द्यायला लागतात तेव्हा बाबाच्या लक्षात येते की,हा मुलगा आपल्याला मित्रासारखे वागवित आहे, वडिलासारखे नाही. परंतू तोपर्यंत फार उशिर झालेला असतो. आईवडील आणि मुले एका सिमित मर्यादेपर्यंतच मित्रत्वाच्या नात्याने राहु शकतात. परंतु वयाचा अनुभवाचा मान मुलांनी सर्वच जेष्ठांबद्दल बाळगला पाहिजे.

**उद्दिष्ट :**

१) काळानूसार पालक- बालक संबंधातील झालेले बदल अभ्यासने.

२) झालेल्या बदलाची दिशा सकारात्मक किंवा नकारात्मक याचा अभ्यास करणे.

३) बदलत्या पालक-बालक संबंधामध्ये बालकाचा प्रतिसाद अभ्यासणे.

४) पालक व बालकामध्ये सुदृढ संबंधाविषयी आवश्यक ती जाणीव निर्माण करणे.

**पालक बालक संबंध बदलण्याची कारणे :**

**१) कुटूंबाचा प्रकार :** आजच्या विभक्त कुटूंब पध्दतीमुळे मुलांना वाढविण्याची सर्वस्वी जबाबदारी पालकावर आली. या जबाबदारीचे ओझे घेवून काही पालक अतिशय संवेदनशिलपणे पाल्याचे संगोपन करतात. अति लक्ष देणे, अति लाड करणे, यासारख्या नकळत केल्या जाणाऱ्या कृत्यामधून मुलामधला आत्मविशवस कमी होतो, तर अतिशय दुर्लक्ष केल्याने मुलामधील बिनधास्तपणा वाढतो, शिस्त राहत नाही. या दोन्ही गोष्टीचा सुवर्णमध्य आजच्या पालक वर्गाला साघता येणे गरजेचे आहे.

**२) शिक्षीत स्त्रीया :** आज स्त्री शिक्षणामुळे तीच्यामध्ये सजगता वाढली आणि स्त्रियाचे पाऊल रोजगारांच्या दृष्टिकोनातून घराबाहेर पडायला लागले त्यामुळे साहजिकच घरी राहण्याच्या वेळेमध्ये कपात होवू लागली या सर्व गोष्टीचा परिणाम पालक बालक संबंधावर होवू लागला.

**३) काळाजी गरज :** पालक बालक संबंधामध्ये बदल होणे ही काळाची गरज देखील आहे. पूर्वी आपला मुलगा कोणत्या वर्गात आहे हे देखील पालकाना ठावूक नसे. पण आज असे असणे शक्य नाही कारण आजच्या स्पर्धात्मक युगात मुलाकडे लक्ष देणे अपरिहार्य आहे.



Scanned by CamScanner

**४) मनोरंजन क्षेत्र :** मनोरंजन क्षेत्राच्या वाढत्या व्यापामुळे पालक बालक संबंधामध्ये बदल झाला. पुर्वी मनोरंजनाचे क्षेत्र अतिशय संकुचीत असल्यामुळे फावल्या वेळात पालक बालकांमध्ये सुसंवाद साधला जायचा. मात्र आज आवश्यक त्या गोष्टी टाळून देखील मनोरंजन क्षेत्रावर वेळ आणि खर्च केला जातो. परिणामत: पालक बालकामध्ये सुसंवाद साधल्या जात नाही. संवाद हा संबंधाचा आत्मा आहे. मात्र आज टी. व्हि. समोरच जेवण होतात.

**५) व्यस्त जीवनमान :** आजचे जीवनमान अतिशय धकाधकीचे आहे. प्रत्येकजन आपल्यात व्यस्त आहे. स्वत:च्या मुलाकडे लक्ष द्यायला पुरेसा वेळ नाही. मुलांना घेवून बसने, त्यांच्याशी संवाद साधने, त्यांच्या अडचणी जाणून घेणे त्यावर उपाय या सर्व बाबी दुरापास्त झाल्या आणि परिणामत: पालक-बालक संबंधामध्ये बदल झाला.

पालक आणि बालक ह्यांच्या संबंधामध्ये निर्माण होणारा हा दुरावा आजच्या वर्तमान युगात कमी होत असला तरी आज मुलांच्या बाबतीत चिंताग्रस्त असणारे पालकांची संख्या जास्त प्रमाणात दिसून येते. आज आपण दररोज पेपरला वाचतो की, मुलांना कुठल्याही कारणाने नकार मिळाल्यास ते तो नकार सहन करू शकत नाही, व अशावेळी कोणत्याही वाममार्गाचा ते अवलंब करतात. उदा आत्महत्या करणे, घरातून निघून जाणे, दुसऱ्यांना नुकसान पोहचविणे इ. या सर्व घटनांचा विचार केला असता असे लक्षात येते की, पालकांनाच आपल्या पालनपोषणाच्या पध्दतीमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे. कारण पालक म्हणजे पा-पालन करणारे, ल- लक्ष देणारे व क- करुणा करणारे होय.अशा परिस्थितीत पालकांना जास्तीत जास्त वेळ मुलांसोबत घालविणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे आपल्या मुलांच्या सर्व मित्र मंडळीची माहितीदेखील त्यांच्याजवळ असणे आवश्यक आहे. आपली मुले कोणासोबत राहतात, काय करता? त्यांच्या समस्या काय? हे जाणून घेवून त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक असते. आज मुलांना सतत सुचना नको असतात अशावेळी त्यांच्या भावना कुठेही दुखावल्या जाणार नाही व ते चुकीच्या किंवा वाईट मार्गाला जावून त्यांची प्रगती थांबणार नाही असाच प्रयत्न आज पालकांना करावा लागतो. पुर्वीच्या तुलनेत आजचे पालकत्व ही जबाबदारी फार कठीण आहे. आजच्या आईवडिलांना मुलाचा जन्म झाल्यापासूनच चिंता वाटते की या स्पर्धेच्या युगात माझा मुलगा टिकुन रहावा या करिता मी काय करु शकतो. अशावेळी मग ते त्याला सर्व सोयी उपलब्ध करुन देतात व त्याचप्रमाणात त्यांच्याकडुन अपेक्षाकरतात, पण हे सर्व करीत असतांना ते विसरुन जातात की आपल्या मुलांची क्षमता, त्यांच्या भावना, त्यांची आवड इ. आणि मग सुरु होतो समस्यांचा प्रवास.

आजच्या बदलत्या काळानुसार पालकांनाही बदलावे लागते. मानसशास्त्र म्हणतात मुलांना अनुभव दानात देवू नका. म्हणजेच मुलांना त्यांच्या जीवनात स्वत: अनुभव घेवू द्या त्यांच्या या अनुभवामध्ये योग्य मार्गदर्शक म्हणून तुम्ही तुमची भुमिका ठेवा, मुलांचे मित्र बना अधिकारी नाही. त्यामुळे मुलांमध्ये विश्वास निर्माण होवून ते तुमच्याशी मनमोकळे बोलतील व जीवनात येणाऱ्या समस्या किंवा अडथळे तुमच्याशी बोलुन सोडविण्याचा प्रयत्न करतील. स्पर्धेमध्ये यश मिळण्याकरिता तयार करा परंतू प्रत्येकवेळी यश मिळालेच पाहिजे हा हेका धरु नका, अपयश आले तर त्याची कारणेशोधून पुन्हा स्पर्धेत नव्या जोमाने उतरविण्याची शक्ती मुलांना पालकांनी द्यायला हवी. अशावेळी मुलांचे पण काही कर्तव्य असतात की झगमगत्या जगात हुरळून न जाता आईवडिलांच्या दाखविलेल्या मार्गावर त्याने आपला यशाचा प्रवास करण्याचा प्रयत्न करावा कारण प्रत्येक आईवडिलांची इच्छा असते की आपला मुलगा यशस्वी व्हावा म्हणूनच ते म्हणतात, बाळा, झेप अशी घे की, पाहणाऱ्यांच्या माना दुखाव्यात, आकाशाला अशी गवसणी घाल की पक्ष्यांना प्रश्न पडावा, ज्ञान इतके मिळवं कि सागर अचंबित व्हावा, इतकी प्रगती कर की काळही पहात रहावा. परंतू मागे वळून पहायला विसरु नको कारण हे सर्व होण्यामध्ये तुझ्यावर चांगले संस्कारकरणारे तुझे कुटूंबिय तुझी वाटबघत आहेत. प्रगतीच्या या पायऱ्या चढत असतांना शेवटच्या पायरीवर गेल्यावर पहिल्या पायरीला विसरुन चालणार नाही कारण तीच तुम्हाला वर चढण्यास कारणीभूत असते. जीवनात कुठेही अडलांस तरी मागे वळुन पहा तुला मार्ग दाखविण्यास तुझे पालक सदैव तयार आहेत असा विश्वास मुलांमध्ये निर्माण झाला पाहीजे ही आज काळाची गरज आहे.

**निष्कर्ष :** मुलांना जेव्हा आपली गरज असते त्यावेळेला आपण त्यांना दुसऱ्या करवी मदत पोहोचवली तर त्याचे काम होते मात्र आपल्या सहवासात त्यांना वाटणारा विश्वास दुसरा कोणीही देवू शकत नाही. आपण एकदा दिलेला आधार मुलांना जन्मभर साथ करित राहतो त्यांना संकटाशी मुकाबला करायला धिरी देत राहतो. प्रेमाच्या या अदृष्य आधाराचे सामर्थ्य आपण ओळखले पाहिजे. एकमेकाबरोबरचे क्षण निसटून जाता काम नयेत याची दक्षता आपण घ्यायला हवी. आज अगदी दीड दोन वर्षापासून प्रत्येकाला आपले मत असते आणि प्रत्येकाला मतस्वातंत्र्यही आहे. अगोदर फार दडपले गेल्यामुळे आताचे आईवडिल मुलांना मोकळे सोडतात. त्याच्या इच्छा आकांक्षांना महत्व देतात.

**संदर्भ ग्रंथ सुची**

१) सत्यनारायण निल २०१५, 'शिक्षण संक्रमण 'आई बाबाची शाळा', जानेवारी २०१५ पृष्ठ क्र. १०,११,१२.
२) भागवत शोभा २०१५, लोकसत्ता 'पालक-बालक' शनिवार २६ सप्टेंबर २०१५.
३) घोगरे मंगेश भगवान २०११, शिक्षण संक्रमण 'असा घ्यावा पालकांनी मुलांच्या शिक्षणात सहभाग' सप्टेंबर २०११, पृष्ठ क्र. ३३,३४.
४) काळे पी. १९८६ बालमानसशास्त्र, दामोधर दि. कुळकर्णी, श्रीविद्या प्रकाशन २५०, शनिवार अष्टभुजा रोड पुणे-३०.
५) वऱ्हाडपांडे नलिनी २०१०, बालविकास प्रकाशन, पिंपळापूरे ॲन्ड क. पब्लिशर्स, महाल नागपूर, पृष्ठ क्र. ३९७
६) फरकाळे, गोंगे (२००७), 'बालविकासाची मुलतत्वे', प्रकाशक पिंपळापुरे ॲन्ड. क. पब्लिशर्स महाल नागपूर, पृष्ठ क्र. ९७, ४०६, ४०६, ४०७, ४०८.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# बालहक्क संहिता व बालहक्कांची वास्तविक स्थिती

डॉ. निलेश यु. देशमुख समाजकार्य सहयोगी प्राध्यापक, रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिम

**प्रस्तावना**

मानव अधिकार' ह्या संकल्पनेत अधिकार ह्या शब्दांची व्याख्या संपूर्णपणे समाविष्ट होते. न्याय अधिकार तसेच जे अधिकार प्राप्त केल्याने प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व परिपूर्ण बनेल असे सर्व अधिकार मानवअधिकार ह्या संकल्पनेत समाविष्ट झालेले आहेत. सर्व व्यक्ती मानव असल्यामुळे त्यांना जे अधिकार जन्मत:च प्राप्त झालेले आहेत त्यांना मानव अधिकार असे संबोधण्यात आले आहे. भारताने बालकांप्रती आपले वचन पाळत ११ डिसेंबर १९९२ मध्ये बालअधिकारासंबंधी संयुक्त राष्ट्रसंघाच्या दोन विकल्पावर सप्टेंबर २००४ मध्ये स्वाक्षरी केली.

महासत्तेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भारतात सर्वसाधारण आयुमर्यादा वाढली. अन्नाची उपलब्धता वाढली. विज्ञानात आम्ही मानाचा तुरा रोवला परंतु दुसरी बाजू पाहता भारतात बालकांच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. भारतीय लोकशाही प्रथमपासूनच मानव अधिकारांनी प्रेरीत झालेली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव अधिकाराच्या जाहीरनाम्यामुळे स्फुर्ती घेऊन भारतीय राज्यघटनेने मानव अधिकारांना विषेश प्राधान्य दिले आहे. घटनेतून बहाल केलेले मुलभूत अधिकार, राज्यांची मार्गदर्शक तत्वे, घटनेची प्रस्तावना व्यक्तीच्या मानव अधिकारांच्या संरक्षणाची हमी देतात. तरी सन २००४ मध्ये १४,४२३ तर २००५ मध्ये १४,९७५ बालअत्याचाराची प्रकरणे होती. बालकांना जगण्याचा अधिकार असतांना महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षात साडेचार लाखाहून अधिक मुलीचा जीव गर्भातच घोटून टाकण्यात आले आहे. विचार स्वातंत्र्याचा अधिकार, मनोरजनाचा अधिकार व शिक्षणाचा अधिकार असतांना १० हजार कोटी मुलांना शाळेचा लाभ मिळत नाही जगातील एकूण बालमजुरांपैकी ३२ ते ३३ टक्के बालमजुर भारतात असून वयाला व ताकदीला न झेपणाऱ्या कामाला पिचत आहेत आहेत. पोषक व पोटभर अन्न मिळण्याचा अधिकार, निरोगी राहण्याकरीता चांगल्या आरोग्यविषयक सुविधा मिळण्याचा अधिकार असतांना भारतात ६१.४ दक्षलक्ष बालक कुपोषीत व २ कोटी ७० लाख ६५ हजार बालके कमी वजनाची आहेत. कपडे व रहायला निवारा या संदर्भातील अधिकार असतांना ५ लाखापेक्षा जास्त मुले फुटपाथवर आपले जीवन जगतात असे किती तरी अधिकार संयुक्त राष्ट्रसंघाच्या संहीतेत व भारतीय राज्यघटना, विविध योजना व कायदयांनी जरी बहाल करुन दिले असले तरी मात्र देशातील कित्येक मुले नानातऱ्हेच्या संकटाना तोंड देत आहेत.

**बालकाची व्याख्या :-'**

'अठरा वर्षाखालील कोणत्याही व्यक्तीला मुल म्हटल्या जाते." (बालहक्क संहिता)

**अध्ययनाचे उद्देश :-**

१) बालकांचे हक्क व बालहक्का संदर्भातील घटनात्मक तरतुदी अभ्यासणे.

२) बालकांच्या हक्कांची स्थिती व समस्या अभ्यासणे.

**पध्दतीशास्त्र :-**

प्रस्तुत अध्ययनाच्या उद्देशपूर्तीकरिता दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आला असून पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे व संकेत स्थळे इ. चा उपयोगातून तथ्य संकलन केले आहे.

**राष्ट्रसंघाच्या संहीतेतील बालकांचे हक्क :-**

लहान मुलांच्या हक्कावरील युनोची १९८९ मधील परिषद ही जगातील सर्व मुलांच्या दृष्टीने एक ऐतिहासिक महत्वाची घटना आहे. भारतानेही या परिषदेला मान्यता दिली आहे. लहान मुलांच्या हक्कावरील युनोच्या परिषदेमुळे मुलांना नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवर शिक्कामोर्तब केले आहे. शिक्षण आणि संरक्षण यासंदर्भात बालहक्क परिषदेने खालिल प्रस्ताव मंजूर केले आहे.

**कलम ६ नुसार** :- प्रत्यक मुलाला जगण्याचा मुलभूत अधिकार आहे हे सर्व राष्ट्रांना मान्य आहे म्हणून सर्व राष्ट्रे मुले जगतील व त्यांचा विकास होईल ही काळजी घेतील.

**कलम १९ नुसार** :- शारीरिक दुखापत , निष्काळजीपणे हाताळणे, वाईट वागणूक, शोषण, लैंगीक अत्याचार अशा तऱ्हेच्या कोठल्याही शारीरिक अगर मानसिक अत्याचारापासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी योग्य ते शासकीय, सामाजिक व शैक्षणीक उपाय सर्व राष्ट्रांनी योजावे.

**कलम २३ नुसार** :- सर्व राष्ट्रांना हे मान्य आहे की, शारीरिक अथवा मानसिकदृष्टया अपंग मुलांनाही स्वावलबी व मानाचे आयुष्य जगता यावे व समाजात मिसळता यावे.

**कलम २४ नुसार** :- जातीत जास्त निरागी आयुष्य जगण्याचा आणि आजारीपणात वैद्यकीय मदत मिळण्याचा मुलांचा हक्क सर्व राष्ट्रांनी मान्य केला आहे. तेव्हा कोणत्याही मुलांना आरोग्यसेवा मिळाली नाही असे होणार नाही याची काळजी सर्व राष्ट्रे घेतील.

**कलम २८ नुसार** :- सर्व राष्ट्रांना मुलांच्या शिक्षणाचा हक्क मान्य आहे. सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळावी आणि हक्कांची जास्तीत जास्त पुर्तता करता यावी म्हणून राष्ट्रे काळजी घेतील.

**कलम ३१ नुसार** :- मुलांना विश्रांती घेण्याचा, खेळण्याचा, योग्य अशा करमणुकीत रमण्याचा, मोकळा वेळ असण्याचा, सास्कृतीक जीवन व कला ह्यात भाग घेण्याचा हक्क सर्व राष्ट्रे मान्य करतील.

**कलम ३२ नुसार** :- आर्थिक शोषणापासून आणि कोठल्याही धोकादायक, शिक्षणाच्या शारीरिक व मानसिक प्रगतीच्या आड येणाऱ्या कामापासून संरक्षण मिळण्याचा मुलांचा हक्क सर्व राष्ट्रांना मान्य आहे.

**कलम ३५ नुसार** :- कोणत्याही कारणाकरीता व कोणत्याही स्वरूपात मुले पळविणे, विकणे, त्यांची वाहतूक करणे ह्या सर्व गोष्टीना सर्व राष्ट्रे आपआपल्या राष्ट्रात व इतर राष्ट्रांशी करार करून बंदी घालतील.

**भारतीय राज्यघटना आणि बालकांचे हक्क :-**

राज्यघटनेने मूलभूत हक्क आणि राज्याची मार्गदर्शक तत्वे ह्यातून बालकांच्या हक्कांना कायदेशीर पाठींबा मिळालेला आहे. या राज्यघटनेतील तत्वे सर्व नागरिकांना तसेच व्यक्तीना लागू असल्यामुळे सर्व मुलांनाही ती लागु आहेत असे मानले पाहीजे. घटनेने कलम १५ नुसार स्त्रीया व लहान मुलांसाठी विशेष तरतुदी करण्यासाठी संघराज्याला परवानगी दिलेली आहे. लहान मुलांना योग्य न्याय मिळण्यासाठी संघराज्याला विशेष कार्यक्रम आणि योजना आखता येतात.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

**बालहक्काची स्थिती व समस्या :-**

बालकांसाठीच्या शिखरपरीषदेमधे (१९९०) भारताने जाहिरनामा कृतीत उतरविण्याचे आश्वासन दिले होते त्यामधे प्रमुख ध्येय अर्भकांच्या मृत्युचे प्रमाण १ हजार जिवंत जन्मलेल्या मुलांमागे ६० याउनही कमी करणे हे होते. १९९० साली असलेले मातांच्या मृत्युंचे प्रमाण निम्म्याने कमी व्हावे. ५ वर्षाखालील मुलांच्या कुपोषणाचे प्रमाण निम्याने कमी व्हावे. ८० टक्के मुलांचे तरी प्राथमीक शिक्षण पुरे व्हावे. बालकांचे हक्क (युनिसेफ) कलम ३६ नुसार मुलाच्या स्वास्थ्याच्या कोणत्याही तऱ्हेने आड येणाऱ्या इतर सर्व प्रकारच्या शोषणापासुन सर्व राष्ट्रे मुलांचे रक्षण करतील. कलम २४ नुसार अर्भक मृत्यु कमी करणे मुलांना वैद्यकीय मदत देणे, प्रदुषण, रोगराई व कुपोषण याविरुध्द लढा उभारणे. असे असतांना सुध्दा दररोज जगातील ४०,००० मुलं कुपोषण व रोगराईने मरतात. १९५० मध्ये संविधान स्वीकारून राज्यघटनेच्या अनुच्छेद ४५ नुसार १४ वर्षाखालील प्रत्येक मुलाला राज्याने मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे असे नमूद केले आहे. स्वातंत्र्याच्या ६७ वर्षानंतरही भारतामध्ये कोटयवधी मुले शिक्षणापासून वंचित राहिले आहेत ही वस्तुस्थिती आहे. २००९ मध्ये प्राथमिक सक्तीचे शिक्षण कायदा  निर्माण झाला असतांना सुध्दा गेल्या २०१०-२०११ मध्ये तब्बल ३८ हजार ३८४ मुले  शालाबाहय होती १० हजार कोटी मुलांना शाळेचा लाभ मिळत नाही. संविधानातील अनुच्छेद २४ नुसार १४ वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या बालकांना कारखाने, खाण आणि धोकादायक व्यवसायात लावण्यात प्रतिबंध असून सुध्दा २००१ च्या जनगणनेनुसार भारतात बालमजुरीची संख्या १२. ६ दशलक्ष आहे. जगातील एकूण बालमजुरांपैकी ३२ ते ३३ टक्के बालमजुर भारतात आहेत तसेच एकूण बालकामगारांच्या १ टक्के बालकामगार धोकादायक व्यवसायात गुंतलेले आहेत. आणि लाखो निरनिराळया आपत्तीना तोंड देत आहेत. डॉ. अभय बंग यांच्या २००५ च्या अहवालानुसार महाराष्ट्रात बालमृत्यु व मृतजन्म असे मिळून अंदाजे दोन लाख जीव दरवर्षी मरतात. तसचे ८ लाख मुले तीव्र कुपोषीत व २१ टक्के म्हणजेच बत्तीस लाख मुले मध्यम कुपोषीत आहेत. यावरून ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्याचा दर्जा सुधारणे, मुलांचा योग्य मानसिक, शारीरिक व सामाजिक विकास साधणे, तसेच बालमृत्यु, बालरोगाचे कुपोषणाचे प्रमाण कमी करणे हे उद्दिष्ट सरकारला साध्य करता आले नसल्याचे दिसून येते. एन.सी.आर.बी. च्या अहवालानुसार २००७ मध्ये ३४,५२७ बालगुन्हेगार होते ज्यामध्ये ३२,६७१ मुले तर १,८५६ मुली बालगुन्हेगार होत्या. बालअत्याचाराचा विचार करता सन २००४ मध्ये १४,४२३ तर २००५ मध्ये १४,९७५ बालअत्याचाराची प्रकरणे होती. ज्यामध्ये ३.८ टक्केने वाढ झाली. २००४ मध्ये ३,५४२ बालकांवर बलात्कार झालेत तर २००५ मध्ये ४०२६ बलात्काराची प्रकरणे झालीत. ज्यामध्ये १३.७ टक्केनी वाढ झाली. २००४ मध्ये १३०४ मुलांची हत्या झाली तर २००५ मध्ये १३२७ मुलांची हत्या झाली. ज्यामध्ये १.८ ने वाढ झाली. २००४ मध्ये ३१९६ बालकांचे अपहरण झाले. बालकांवरील दिवसेंदिवस वाढत अत्याचाराची स्थिती पाहता बालकांच्या हक्कासंरक्षणाच्या कलमाची एक प्रकारे पायमल्लीच होत असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

भारतीय लोकशाही प्रथमपासूनच मानव अधिकारांनी प्रेरीत झालेली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव अधिकाराच्या जाहीरनाम्यामुळे स्फुर्ती घेऊन भारतीय राज्यघटनेने मानव अधिकारांना विषेश प्राधान्य दिले आहे. घटनेतून बहाल केलेले मुलभूत अधिकार ,राज्यांची मार्गदर्शक तत्वे, घटनेची प्रस्तावना व्यक्तीच्या मानव अधिकारांच्या संरक्षणाची हमी देतात. बालकांना जगण्याचा अधिकार, विचार स्वातंत्र्याचा अधिकार, मनोरजनाचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, पोषक व पोटभर अन्न मिळण्याचा अधिकार, निरोगी राहण्याकरीता चांगल्या आरोग्यविषयक सुविधा मिळण्याचा अधिकार असतांना भारतात ६१.४ दक्षलक्ष बालक कुपोषीत व २ कोटी ७० लाख ६५ हजार बालके कमी वजनाची आहेत. कपडे व रहायला निवारा या संदर्भातील अधिकार असतांना ५ लाखापेक्षा जास्त मुले फुटपाथवर आपले जीवन जगतात असे किती तरी अधिकार संयुक्त राष्ट्रसंघाच्या संहीतेत व भारतीय राज्यघटना, विविध योजना व कायदयांनी जरी बहाल करुन दिले असले तरी मात्र देशातील कित्येक मुले नानातऱ्हेच्या संकटाना तोंड देत आहेत.

बालकांच्या अधिकारासंदर्भात फक्त कायदे किंवा त्यांच्या विकासाकरीता योजना करुन चालणार नाही तर कायदे व योजनांची जोपर्यंत योग्य अंमलबजावणी होणार नाही व समाजामध्ये बालकांच्या अधिकारांबाबत संवेदना जागृत होणार नाही तोपर्यंत बालकांना खऱ्या अर्थाने त्यांचे अधिकार प्राप्त होणार नाही.

**सारांश :-**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव अधिकाराच्या जाहीरनाम्यामुळे स्फुर्ती घेऊन भारतीय राज्यघटनेने मानव अधिकारांना विषेश प्राधान्य दिले आहे. घटनेतून बहाल केलेले मुलभूत अधिकार, राज्यांची मार्गदर्शक तत्वे, घटनेची प्रस्तावना व्यक्तीच्या मानव अधिकारांच्या संरक्षणाची हमी देतात. महासत्तेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भारतात सर्वसाधारण आयुमर्यादा वाढली. अन्नाची उपलब्धता वाढली. विज्ञानात आम्ही मानाचा तुरा रोवला परंतु दुसरी बाजू पाहता भारतात बालकांच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. भारतीय लोकशाही प्रथमपासूनच मानव अधिकारांनी प्रेरीत झालेली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव अधिकाराच्या जाहीरनाम्यामुळे स्फुर्ती घेऊन भारतीय राज्यघटनेने मानव अधिकारांना विषेश प्राधान्य दिले आहे. घटनेतून बहाल केलेले मुलभूत अधिकार, राज्यांची मार्गदर्शक तत्वे, घटनेची प्रस्तावना व्यक्तीच्या मानव अधिकारांच्या संरक्षणाची हमी देतात. तरी सन २००४ मध्ये १४,४२३ तर २००५ मध्ये १४,९७५ बालअत्याचाराची प्रकरणे होती. बालकांना जगण्याचा अधिकार असतांना महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षात साडेचार लाखाहून अधिक मुलीचा जीव गर्भातच घोटून टाकण्यात आले आहे. विचार स्वातंत्र्याचा अधिकार, मनोरजनाचा अधिकार व शिक्षणाचा अधिकार असतांना १० हजार कोटी मुलांना शाळेचा लाभ मिळत नाही जगातील एकूण बालमजुरांपैकी ३२ ते ३३ टक्के बालमजुर भारतात असून वयाला व ताकदीला न झेपणाऱ्या कामाल पिचत आहेत आहेत. पोषक व पोटभर अन्न मिळण्याचा अधिकार, निरोगी राहण्याकरीता चांगल्या आरोग्यविषयक सुविधा मिळण्याचा अधिकार असतांना भारतात ६१.४ दक्षलक्ष बालक कुपोषीत व २ कोटी ७० लाख ६५ हजार बालके कमी वजनाची आहेत. कपडे व रहायला निवारा या संदर्भातील अधिकार असतांना ५ लाखापेक्षा जास्त मुले फुटपाथवर आपले जीवन जगतात

**संदर्भ :-**

निंभाळकर, संजीव के. (२००५). समाजकल्याण. चंद्रपूर: केशव प्रकाशन.
बालकांचे हक्क,  युनिसेफ.
एकात्मीक बालविकास सेवा योजना अहवाल बुधवार दि. २५ डिसेंबर २०१३ 'महाराष्ट्रात पावणेसात लाख बालके कमी वजनाची, सकाळ २५ डिसेंबर २०१३ पृष्ठ क. ५
यशमंथन एप्रिल -जून २००५ यशदा.
http//www.azadindia.org/social i`ssues/status of children.html



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# मराठा आरमाराचे जनक छ.शिवाजी महाराज

डॉ.म्हाळूंगेकर अर्जून डी, इतिहास विभाग प्रमुख, डी.के.ए.एस.सी कॉलेज, इंचलकरजी

**प्रस्तावना**

मराठा राज्य निर्मितीचे जनक छ.शिवाजी महाराज यांनी सतराव्या शतकाच्या मध्यावर महाराष्ट्राच्या पश्चिम किना-याचे महत्व ओळखून मराठा आरमाराची स्थापना केली आणि भारताच्या पश्चिम किना-यावर आरमारी सत्ता निर्माण करणारे ते पहिले राजे होते.यावरून त्यांची दूरदृष्टि दिसून येते त्या सुमारास येथे अनेक पराकमी सत्ताधिश होते. पण सागरावर आरमार सूरू करण्याचे धाडस कोणी केले नव्हते. ते धाडस छ. शिवाजी महाराजांनी केले. त्या अगोदर त्यांनी काही वर्षापूर्वी अश्वबळाच्या व मराठा मावळयांच्या जोरावर किल्ले व भूमि जिंकून स्वतंत्र मराठा राज्य उभारण्यास सुरवात केली होती. त्याचवेळी परकीय सत्ताधिशांनी जमिनीबरोबर सागरावर आपले वर्चस्व केले होते आणि ते स्वतःला समुद्राचे धनी मानत होते. आपण ही परकियांच्या प्रमाणे समुद्रावर वर्चस्व निर्माण करावे. याची महाराजांना कल्पना सुचली आणि तसा प्रयत्नही सूरू केले. त्यामुळेच भारतातील राष्ट्रपुरूषांच्यामध्ये शिवाजी राजे यांचा समावेश होतो.

**इतिहासकारांच्या मते ः**

सर यदुनाथ सरकारनी शिवजी महाराजांविषयी पूढील उद्‌गार काढले " शिवजी राजे यांची राजकीय कल्पना म्हणजे त्यांनी प्रजेला शांतता, सर्वाप्रत सहिष्णू भाव, सर्व जाती जमातीनां प्रशासनात काम करण्याची संधी, कार्यक्षमता व शुध्द राज्यकारभार पध्दती ,वृध्दिसाठी आरमार बांधणी, मायदेशाच्या रक्षणासाठी लढाऊ लष्कर अशी ध्येय त्यांच्या समोर होती, ते राष्ट्रीय प्रगती साधणारे कियाशील नेता होता, तसेच ते मराठा राज्याचे शक्ती स्थानही होते आणि त्यांच्या सरकारची कार्यपध्दती ही सर्व क्षेत्रात स्पर्श करणारी होती.त्यांनी सागरी कीना-याच्या संरक्षणाकडेही दूर्लक्ष केले नाही. त्यामुळेच आरमाराचे जनक असे त्यांना यर्थार्थतेने म्हटले जाते.[1]

सुप्रसिध्द शिवचरित्रकार डॉ.बाळकृष्ण यांच्या मते ,

"The father of the marath Navy and creator of the Indian Mercantile Marine "

रामचंद्रपंत अमात्य यांनी शिवछत्रपतींच्या आरमाराचे स्वरूप पुढील प्रमाणे स्पष्ट केले आहे. " आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच, जसे ज्यास अश्वबल तशी त्यांची वृध्दीप्रथा आहे. तऊतच ज्याच्याजवळ आरमार त्याचाच समुद्र याकरिता आरमार अवश्यमेव करावे" [2]

इतिहासकार सुरेंद्रनाथ सेन यांनी छ.शिवाजी महाराज मराठा नाविक दलाचे संस्थापक होते असे त्यांनी आपल्या ग्रथांत सांगीतलेले आहे.महाराजांची नाविक दलाची माहिति देणारा पहिला ग्रंथ पारसणीस यांनी १९०४ मध्ये प्रसिध्द केला. डॉ. सेन यंनी मिलटरी सिस्टीम ऑफ द मराठाज हा ग्रंथ तसेच डॉ बी. खे.आपटे यांनी लिहलेला "द हिस्टी ऑफ दि मराठा नेव्ही ॲण्ड मर्चण्डशिप्स" हा ग्रंथ लिहाल . या ग्रंथात त्यांनी शिवाजी महाराजांनी आरमाराची स्थापना केल्याचे माहिति दिली आहे.[3]

**मराठा आरमाराची स्थापना ः**

भारतात त्या सुमारास मोगल साम्राज्य बलाढय होते. ते भारतातील सर्व सत्ताधिशांच्याप्रमाणे मोगल बादशाहाने देखील मान्य केले होते की, ते केवळ भातात नव्हे आशिया खंडातही मोठे साम्राज्य म्हणून प्रसिध्द पावले होते. असे असले तरी त्यांनी सागरावर आपली सत्ता निर्माण केली नव्हती. केवळ परकिय सत्ताधिशानींच आपल्या आरमारी सामर्थ्याच्या जोरावर समुद्रावर आपले वचर्स्व निर्माण केले होते. त्या परकीय सत्ताधिशां पैकी पोर्तुगीज, इंग्रज , डच व सिध्दी यांची सत्ता प्रबळ होती. एवढेच नव्हे तर पोतुडगीजांच्या लेखी अनुविझविना त्यातील संपूर्ण अटी मान्य केल्या विना भारतातील कोणत्याही आरमाराला समुद्रात संचार करण्याची परवानगी नव्हती.परंतु, महाराष्ट्राच्या दक्षिण प्रदेशातील शिवाजी राजे यांनी आरमाराचे महत्व ओळखले होते. त्यानुसार त्यांनी सन २७ जानेवारी १६५६ ला जावळीचा प्रदेश चंद्रराव मोरे यांच्याकडून जिंकूण घेतला.[4] आणि आरमार बांधणी सूरू केली. त्यामुळे पोर्तुगीज किंवा इतर परकीयांनमध्ये दहशत निर्माण होईल दुसरे म्हणजे समुद्र किनारी प्रदेशातील प्रजेचे संरक्षण होईल असा महाराजांचा दृष्ट्रिकोन होता, त्यासाठी कल्याण भिवंडी व कल्याणच्या खाडीत आरमाराची सुरवात केली.

**समुद्रकिनारी किल्ल्यांची बांधणी**

जेधे करिण्यातील माहितीनुसार शिवाजी महाराजांनी सन १६५६ व १६५७ मध्ये जावळी जिंकूण आरमार बांधणीस सुरवात केली आणि आदिलशाही ताब्यातील कोकणाच्या प्रदेशापैकी कल्याणचा प्रांत जिकूण घेतला.[5] जिंजीचा सिध्दी त्याची आरमारावर सत्ता होती, त्याच्या विरोधात लढण्यासाठी आपल्या पदरी असलेल्या लोकांच्या देखरेखाखाली २० लढाऊ जहाज बांधणी, त्याचबरोबर पद्मदुर्ग, विजदुर्ग,सुवर्णदुर्ग व सिंधुदुर्ग इ. ठिकाणी समुद्राच्या काठावर प्रजेच्या संरक्षणासाठी किल्ल्यांची बांधणी केली. याचा महत्वाचा परिणाम म्हणजे समुद्रावर व्यापारी परकीय सत्ताधिशांवर लक्ष ठेवता आले. तसेच दहशत बसवण्यासाठी त्याचा उपयोग झाला आणि दोनच वर्षात मराठयांनी सिध्दीच्या किनारपट्टीवरील अनेक स्थळे ताब्यात घेतली. ६ ऑगस्ट १६५९ च्या पोर्तुगीज पत्रावरून स्पष्ट होते



Scanned by CamScanner

की. "शहाजीच्या एका मुलाने आदिलशाह विरूध्द बंड केले असून त्याने वसई आणि चौल जवळचा प्रदेश जिंकूण घेऊन तो प्रबळ झाला आहे. वसई पांतातील भिवंडी कल्याण व पनवेल बंदरात काही लढाऊ जहाजे संरक्षणासाठी ठेवली आहेत. तेव्हा शिवाजी राजे यांच्या पासून आम्हाला सावध राहणे आवश्यक आहे." सारांश म्हणजे मराठयांचा आरमार वचक पोर्तुगीज सत्ताधीशांच्यामध्ये निर्माण झाल होता. महाराजांनी प्रदेशाची प्राप्ती व आरामारची स्थापना केली. यातूनच त्या युगपुरूषाचे शौर्य व पराकम दिसून येते.[५]

**मराठा व सिध्दी युध्द :**

शिवाजी महाराजांनी कोकणाच्या प्रदेशाचे महत्व ओळखून आरमाराची स्थापना केली. त्यावेळी तेथील कोकण प्रदेश हा अहमदनगरच्या निजामशाही राज्यामध्ये मोडत होता आणि त्यांच्या वतीने तेथे सिध्दी कामगिरी पार पाडत होता. पुढील काळात अदीलशहाने सिध्दीला वजीरी दिल्याने तो नागठोण्यापासून बानकोठ पर्यंतच्या प्रदेशावर अदिलशाहीच्या वतीने काम करत होता. मराठे व अदिलशाही यांच्या सरहद्दी एकमेकास मिळाल्याने त्यांच्यात संबध व संघर्षाला सूरवात झाली. तो संघर्ष शिवाजी महाराजंच्या अखेरपर्यंत चालूच राहिला. सन १६७४ ल सिध्दी व मराठे यांच्यात एक लढाई झाली. या लढाईत मराठयांनी सिध्दीला जेरीस आणले, तेव्हा सिध्दीने माघार घेतली.[७] इंग्रजांची मदत घेवून त्यांच्या मध्यस्थिने शिवाजी महाराजांबरोबर तह घडवून अशी विनंती केली परंतू, इंग्रजांनी सिध्दीच्या विनंतीकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे पुढे लगेच मार्च १६७४ मध्ये सिध्दी संबळ आणि दर्या वर्दी दौलतखान यांच्यामध्ये रत्नागिरी तालुक्यातील खाडीमध्य युध्द झाले. या युध्दात सिध्दीचा पराभव होऊन तो हरेश्वराच्या बंदरात पळून गेला. मराठा सत्ताधीश व सिध्दी यांच्यामध्ये शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या अगोदर काही दिवसापूर्वी लढाई घडून आली. या आणिबाणिच्या प्रसंगी मराठयांना दंडराजापुरी ताब्यात घेण्यात आले नसेले तरी त्यांनी शत्रूवर जोराचे हल्ले करून त्यांच्या मनामध्ये दहशत निर्माण केली आणि दक्षिण कोकणातील राजापूरी पासून ते बोर्डेसपर्यंतची सर्व ठीकाणे शत्रूच्या ताब्यातून घेतली.[८] त्यांचे नावीक दल सतत सज्ज होते आणि भारतातील युरोपीय शत्रूनां तोड देण्यास ते समर्थ असत असा कयास काढता येईल.

**महाराजांचे जहाजांचे प्रकारः**

शिवजी महाराजांच्या नाविक दलाची रचना युरोपातून आलेल्या पाश्चात्या सागरी सत्ताधिशांच्या प्रमाणे मोठया आकाराची जहाजे त्यांच्या कडे नव्हती. तसेच, जहाजबांधणीसाठी असणारे कुशल कारागीरही त्यांच्याकडे नव्हते. त्यांनी स्वतःच्या तंत्राने जहाज बांधणी उदयोग सूरू केला. त्याच्याकडे पुढील प्रमाणे लहान मोठी जहाजे असल्याची माहीती मिळते. ती जहाजे म्हणजे गुराबा, तरांडी, गलबते, ढुबारे, शिंबाडे, पगार, मचवे, तिरकाटी व पाल अशी एकून पाचशे लहान मोठी जहाजे महाराजांच्याकडे होती आणि त्यांचे सरदार दर्यासारंगी व मायनायक भंडारी यांना सुभेदारी देऊन नेमले होते.[९] पुढील काळात छत्रपती संभाजीराजे यांनी या आरमाराच्या मदतीने अनेक मोठे मोठे विजय संपादन केले आणि सागरी मोहीम पार पाडाव्यात याची संभाजी महाराजांना जाणीव झाली.

**सारांश :**

छ. शिवाजी महाराजांच्या लष्करी सेवेत सर्व जाती धर्माच्या लोकांना आरमारात नोकरी मिळत. त्यांना जंजी-याच्या सिध्दीला मराठा आरमाराचे अधिपत्यपद देवू केले होते. त्यासाठी त्यांची एकच अट होती ती म्हणजे सिध्दी याने राष्ट्रीय धारेमध्ये येऊन मिळावे. फोंडयाचा किल्ला जिंकणारा इब्राहिम आणि मराठा आरमाराचा अधिकार दौलतखान असे कितीतरी मुसलमान महाराजांच्या सेवेत होते. कोकण पटटीवरील कोळी, भंडारी, मुसलमान, खिश्चन अशा अनेक जाती जमातीच्या व धर्माच्या लोकांना महाराजांच्या आरमारात नोकरी मिळाल्याने त्यांच्या ठिकाणचा दयावर्दीपणा वाढीस लागला आणि तो मराठा राज्य उभारणीच्या कार्यास उपयोगी पडला. शिवाजी महाराजांचे मुख्य बळ हे अश्वदल आणि किल्ले यांमध्ये होते. या जोरावर त्यांनी सिध्दीच्या ताब्यातील जंजीरा घेण्यासाठी कित्येक वर्ष त्यांच्याशी लढा दिला. जरी त्यांच्या ताब्यात जंजीरा आला नसला तरी त्या लढयाने त्यांच्या ठिकाणचे स्वराज्य प्रेम वाढीस लागले. म्हणूनच त्यांना दर्यावर्दी आणि आरमारी क्षेत्रातील नवनिर्मितीचे प्रवर्तक म्हणणेच योग्य ठरेल.

**संदर्भ :**

१. पवार जयसिंगराव "शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे" सुमेरू प्रकाशन, डोंबिवली २००५ पृ २३.
२. हरदास, बालशास्त्री "पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी" खंड ४ दाते प्रकाशन, पुणे १९६२ पृ ६४
३. नलवडे, म. दा ह्यलोकशाही दंडक, छत्रपती शिवाजी महाराज खास विशेषांक० कोल्हापूर १९८९ पृ ५
४. पगडी, सेतू माधवराव "छत्रपती शिवाजी" नॅशनल बुक ट्रस्ट इंडीया, नवी दिल्ली २००४ पृ १९
५. कुलकर्णी, अ. रा " जेधे शकावली करिना" डायमंड पब्लीकेशन्स, ऑगस्ट २००६ पुणे पृ २०
६. पगडी, सेतू माधवराव ह्यउपरोक्त पृ २४
७. सर यदुनाथ सरकार कृत शिवाजी व शिवकाळ अनुवाद वि. स. वाकसकर , भारत गोरव ग्रंथ माला मुंबई १९३० पृ ९१
८. सर यदुनाथ सरकार कृत ह्य शिवाजी व शिवकाळ उपरोक्त पृ २४
९. स्वदेसाई गो. स मराठी रियासत खंड १ संपादक स. मा. गर्गे पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृ ३६८ ३८७



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम, 'ग्रामसभा'

कु. मंगला मा. कनाटे सहा. प्राध्यापक भूगोल विभाग प्रमुख स्वं. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय वरूड

**प्रस्तावना** भारतात सुमारे ७२ टक्के लोक ग्रामीण विभागात राहतात. देशाच्या खेड्यात ही लोकसंख्या आढळते. म्हणूनच भारताच्या विकास हा तेथील खेडी व लोक यांच्या विकास होय. असे म्हटले जाते. सध्दा जागतिकरणाच्या कालावधीत ग्रामीण विकास योजना व त्याची प्रभावी अमंलबजावणी महत्वाची आहे. कारण देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया शेती हा आहे. ग्रामीण भागातून शेती प्रधान उद्योगांना कच्चा माल तसेच औद्योगिक क्षेत्राला मजूर प्राप्त होतात. अशा या ग्रामीण भागाच्या विकासाकरीता ग्रामसभा ही महत्वाची आहे.

७३ व्या घटनादुरूस्तीने त्यांचे पंचायत राज व्यवस्थेतील रास्त स्थान दिले आहे. ही घटना दुरूस्ती होण्याचे पुर्वकाळात ग्रामसभा ठळकपणे पुढे आल्याच नव्हत्या ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्याच्या निरूत्साह आणि जनतेची अनास्था यामुळे ग्रामसभाचे कामकाज समाधनकारकपणे चालू शकत नाही असे अशोक मेहता समितीने आपल्या अहवालात नमुद केले आहे.केंद्र व राज्यसरकारच्या आदेशानुसार प्रत्येक गावात ग्रामसभा घेतली जाते या सभेमध्ये ग्रामसेवक, तलाठी आणि ग्रामस्थ यांच्या सहभाग असतो. ग्रामीण भागात आज अनेक लोंकाना योजनाची माहिती नाही म्हणजेच सरकारी यंत्रणा बऱ्याचदा प्रभावी कार्य करीत नाही. त्यासाठी गावातील लोकांनी एकत्र येवून योजना हाती घ्यावयाची व ती लोकानीच सरकारच्या मदतीने गावकऱ्यांना हवे ते कार्य किंवा मालमत्ता उभी करून द्यावी मा. थोर समाजसेवक अण्ण हजारे यांनी ग्रामसभेला सर्वात महत्वाचे स्थान दिले आहे. त्यासंबंधी त्यांनी सरकारी यंत्रणेला प्रत्येक महिन्यात गावात ग्रामसभा घेतली पाहिजे व तिचे महत्व पटवून दिले पाहिजे.

**उदिष्टे :–** १) ग्रामच्या तळपातळीवर लोकशही शक्तीना क्रियाशिल कारणे.

२) सामुदायिक भावना बळकट करणे

३) राजकिय जाणिवा प्रगल्भ करणे

४) दुर्बल घटकाना त्याची भूमिका आग्रहपूर्वक मांडण्यास तयार करणे

५) ग्राममधील लघूउद्योगांना कुटीरोद्योग चालना देणे

६) स्वयसेवी संस्थाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाच्या कामास गती देणे.

ग्रामसभा ही पंचायत राज व्यवस्थेची आधारशिला आहे. ७३ व्या घटनादुरूस्ती नंतर घटक राज्य सरकारांनी ग्रामपंचायती सोबतच ग्रामसभेला ही कायदेशिर मान्यता दिली आहे लोक जागृतीच्या दृष्टीने ग्रामसभेचे महत्व नाकारता येत नाही.ग्रामसभेच्या माध्यमातून गावपातळीवर जी कामे केली जातात त्याचा प्रभावी पाठपुरवठा केला जात नाही कारण योजनेचे काम खाजगी कंत्राटदारावर सोपविले जाते या योजनेपासुन फायदा किंवा तोटा झाला तर सरकारचा होईल अशी प्रवृत्ती लोकांची झालेली आहे. हि प्रवृत्ती सरकारी अधिकाऱ्यांनी आमसभेत जावून बदलेली पाहीजे त्या दृष्टीने महाराष्ट्रातील काही जिल्हामध्ये सरपंचाच्या पुढाकाराने सर्व सामग्री स्वत: विकत घेवून फक्त मजुर करार देण्यात आला आहे.

ग्रामसभेच्या माध्यमातून बऱ्याच प्रमाणात भारतातील बेरोजगारी आणि दारिद्रियाची समस्या सोडविण्यासाठी शासनामार्फत सतत प्रयत्न केले जात आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेरोजगाराना रोजगार मिळाल्यास त्यांचे उत्पन्न वाढेल परिणामी त्यांच्यात त्यांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी क्षमता निर्माण होईल व त्यांचे दारिद्र्य नाहीसे होवू शकते कारण ग्रामसभेत विविध ग्रामस्थांना सभेत गावात उत्पादन कामे सुरू करतांना गावातील मूलभूत अशा कच्च्या मालाचा विचार करूनच ग्रामसभेने उत्पादक कामाना मंजुरी दिली पाहीजे व तसे निर्णय आज काही प्रमाणात घेतले जातात या संदर्भात चालू असलेल्या दहाव्या पंचवार्षिक योजनेत ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर भर देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने योजनेत ग्रामीण भागात शिक्षण, प्रशिक्षण, उद्योगजाकता विकास करणे, लघूउद्योग व कुटीर उद्योगांना निर्बंध लादणे अशाप्रकारे विविध योजनाचा अवलंब करून रोजगार वाढविण्याचा प्रयत्न राज्य सरकार केंद्र सरकारच्या मदतीने करीत आहे. त्यासाठी ग्रामसभा प्रभावी कार्य करीत असली पाहीजे.

आज ग्रामसभा एक प्रभावी माध्यम आहे. परंतु त्यासाठी सरकारचे ग्रामीण भगातील दोन प्रतिनीधी आहे. उदा. तलाठी, ग्रामसेवक यांच्या १०० टक्के सहभाग असला पाहीजे योजना लोकांना समजून सागितल्या पाहीजे व ज्याना खरोखर योजनाची गरज आहे. त्याच्या लाभार्थीचे निवड करून वैयक्तिक न करता ग्रामसभेवर विषयपत्रिकेवर विषय घेवून ग्रामसभेची मंजूरी घेतली पाहीजे कारण ग्रामसभेमुळे ज्या ग्रामस्थाना लिहता वाचता येत नाही त्यामुळे ते ग्रामसभेला प्रतिसाद देतात शिवाय सरकारचा नवनविन योजना किंवा कार्यक्रम समजून घेण्यासाठी ग्रामसेवकांनी आयोजन करावे कारण त्यांच्या अधिक प्रभाव पडतो आज ग्रामीण भागात गावागावात अनेक पक्षाचे लोक आहेत त्यामुळे राजकारण आज तरी तळ भागापर्यत पोहचलेले आहे. परंतु जेव्हा जेव्हा सरकारी योजना किंवा कार्यक्रम असतो तेव्हा लोकांची कार्यक्रम समजून घेण्याची व त्याच्या लाभ देण्याची जिज्ञासा लोकामध्ये अधिक असते अशा वेळेस राजकारण बाजूला ठेवून ग्रामस्थ ग्रामसभेसाठ एकत्र येतात व कार्यक्रमाचा लाभ घेतात त्यामुळे आज तरी ग्रामसभा हे अतिशय प्रभावी साधन आहे.

**निष्कर्ष –**ग्रामीण भागात सरकारी योजना यशस्वीरित्या पोहोचवायाच्या असतील तसेच त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावयाची असल्यास प्रत्येक गावामध्ये पंधरा दिवसानी किंवा जास्तीत जास्त ग्रामसभा घेतल्या गेल्या तर सर्व योजनाची सविस्तर माहिती खेड्यातील लोकांना कळू शकतील व प्रभावीरित्या अमलात आणून ग्रामिण भागातील लोक आपला जीवनस्तर उंचावू शकतील स्त्रियांना स्थळ व वेळ याची पुरेशी माहिती मिळल्यास स्त्रियांचा सहभाग वाढेल व ग्रामसभा जास्त सक्षम होईल व पंचायत राज बळकट होईल.

**संदर्भ –**


१) ग्रामीण नागरी समाजशास्त्र – रा. ज. लोटे

२) योजना – फेबुवारी २००६

३) भारतीय समाज आणि सामाजिक समस्या – डॉ भा. कि. खडसे

४) भारतीय समाज मुद्दे एवं समस्याएँ – डॉ. धर्मवीर महाजन, डॉ. कमलेश महाजन




Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम,'ग्रामसभा'

कु. मंगला मा. कनाटे सहा. प्राध्यापक भूगोल विभाग प्रमुख स्वं. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय वरूड

**प्रस्तावना** भारतात सुमारे ७२ टक्के लोक ग्रामीण विभागात राहतात. देशाच्या खेड्यात ही लोकसंख्या आढळते. म्हणूनच भारताच्या विकास हा तेथील खेडी व लोक यांच्या विकास होय. असे म्हटले जाते. सध्दा जागतिकरणाच्या कालावधीत ग्रामीण विकास योजना व त्याची प्रभावी अमंलबजावणी महत्वाची आहे. कारण देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया शेती हा आहे. ग्रामीण भागातून शेती प्रधान उद्योगांना कच्चा माल तसेच औद्योगिक क्षेत्राला मजूर प्राप्त होतात. अशा या ग्रामीण भागाच्या विकासाकरीता ग्रामसभा ही महत्वाची आहे.

७३ व्या घटनादुरूस्तीने त्यांचे पंचायत राज व्यवस्थेतील रास्त स्थान दिले आहे. ही घटना दुरूस्ती होण्याचे पुर्वकाळात ग्रामसभा ठळकपणे पुढे आल्याच नव्हत्या ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्याच्या निरूत्साह आणि जनतेची अनास्था यामुळे ग्रामसभाचे कामकाज समाधनकारकपणे चालू शकत नाही असे अशोक मेहता समितीने आपल्या अहवालात नमुद केले आहे.केंद्र व राज्यसरकारच्या आदेशानुसार प्रत्येक गावात ग्रामसभा घेतली जाते या सभेमध्ये ग्रामसेवक, तलाठी आणि ग्रामस्थ यांच्या सहभाग असतो. ग्रामीण भागात आज अनेक लोंकाना योजनाची माहिती नाही म्हणजेच सरकारी यंत्रणा बऱ्याचदा प्रभावी कार्य करीत नाही. त्यासाठी गावातील लोकांनी एकत्र येवून योजना हाती घ्यावयाची व ती लोकानीच सरकारच्या मदतीने गावकऱ्यांना हवे ते कार्य किंवा मालमत्ता उभी करून द्यावी मा. थोर समाजसेवक अण्ण हजारे यांनी ग्रामसभेला सर्वात महत्वाचे स्थान दिले आहे. त्यासंबंधी त्यांनी सरकारी यंत्रणेला प्रत्येक महिन्यात गावात ग्रामसभा घेतली पाहिजे व तिचे महत्व पटवून दिले पाहिजे.

**उदिष्टे** :– १) ग्रामच्या तळपातळीवर लोकशही शक्तीना क्रियाशिल कारणे.

२) सामुदायिक भावना बळकट करणे

३) राजकिय जाणिवा प्रगल्भ करणे

४) दुर्बल घटकाना त्याची भूमिका आग्रहपूर्वक मांडण्यास तयार करणे

५) ग्राममधील लघूउद्योगांना कुटीरोद्योग चालना देणे

६) स्वयसेवी संस्थाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाच्या कामास गती देणे.

ग्रामसभा ही पंचायत राज व्यवस्थेची आधारशिला आहे. ७३ व्या घटनादुरूस्ती नंतर घटक राज्य सरकारांनी ग्रामपंचायती सोबतच ग्रामसभेला ही कायदेशिर मान्यता दिली आहे लोक जागृतीच्या दृष्टीने ग्रामसभेचे महत्व नाकारता येत नाही.ग्रामसभेच्या माध्यमातून गावपातळीवर जी कामे केली जातात त्याचा प्रभावी पाठपुरवठा केला जात नाही कारण योजनेचे काम खाजगी कंत्राटदारावर सोपविले जाते या योजनेपासुन फायदा किंवा तोटा झाला तर सरकारचा होईल अशी प्रवृत्ती लोकांची झालेली आहे. हि प्रवृत्ती सरकारी अधिकाऱ्यांनी आमसभेत जावून बदलेली पाहीजे त्या दृष्टीने महाराष्ट्रातील काही जिल्हामध्ये सरपंचाच्या पुढाकाराने सर्व सामग्री स्वत: विकत घेवून फक्त मजुर करार देण्यात आला आहे.

ग्रामसभेच्या माध्यमातून बऱ्याच प्रमाणात भारतातील बेरोजगारी आणि दारिद्रियाची समस्या सोडविण्यासाठी शासनामार्फत सतत प्रयत्न केले जात आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेरोजगाराना रोजगार मिळाल्यास त्यांचे उत्पन्न वाढेल परिणामी त्यांच्यात त्यांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी क्षमता निर्माण होईल व त्यांचे दारिद्रय नाहीसे होवू शकते कारण ग्रामसभेत विविध ग्रामस्थांना सभेत गावात उत्पादन कामे सुरू करतांना गावातील मूलभूत अशा कच्च्या मालाचा विचार करूनच ग्रामसभेने उत्पादक कामाना मंजुरी दिली पाहीजे व तसे निर्णय आज काही प्रमाणात घेतले जातात या संदर्भात चालू असलेल्या दहाव्या पंचवार्षिक योजनेत ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर भर देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने योजनेत ग्रामीण भागात शिक्षण, प्रशिक्षण, उद्योगजाकता विकास करणे, लघूउद्योग व कुटीर उद्योगांना निर्बंध लादणे अशाप्रकारे विविध योजनाचा अवलंब करून रोजगार वाढविण्याचा प्रयत्न राज्य सरकार केंद्र सरकारच्या मदतीने करीत आहे. त्यासाठी ग्रामसभा प्रभावी कार्य करीत असली पाहीजे.

आज ग्रामसभा एक प्रभावी माध्यम आहे. परंतु त्यासाठी सरकारचे ग्रामीण भगातील दोन प्रतिनीधी आहे. उदा. तलाठी, ग्रामसेवक यांच्या १०० टक्के सहभाग असला पाहीजे योजना लोकांना समजून सागितल्या पाहीजे व ज्याना खरोखर योजनाची गरज आहे. त्याच्या लाभार्थीचे निवड करून वैयक्तिक न करता ग्रामसभेवर विषयपत्रिकेवर विषय घेवून ग्रामसभेची मंजूरी घेतली पाहीजे कारण ग्रामसभेमुळे ज्या ग्रामस्थाना लिहता वाचता येत नाही त्यामुळे ते ग्रामसभेला प्रतिसाद देतात शिवाय सरकारचा नवनविन योजना किंवा कार्यक्रम समजून घेण्यासाठी ग्रामसेवकांनी आयोजन करावे कारण त्यांच्या अधिक प्रभाव पडतो आज ग्रामीण भागात गावागावात अनेक पक्षाचे लोक आहेत त्यामुळे राजकारण आज तरी तळ भागापर्यत पोहचलेले आहे. परंतु जेव्हा जेव्हा सरकारी योजना किंवा कार्यक्रम असतो तेव्हा लोकांची कार्यक्रम समजून घेण्याची व त्याच्या लाभ देण्याची जिज्ञासा लोकामध्ये अधिक असते अशा वेळेस राजकारण बाजूला ठेवून ग्रामस्थ ग्रामसभेसाठ एकत्र येतात व कार्यक्रमाचा लाभ घेतात त्यामुळे आज तरी ग्रामसभा हे अतिशय प्रभावी साधन आहे.

**निष्कर्ष** –ग्रामीण भागात सरकारी योजना यशस्वीरित्या पोहोचवायाच्या असतील तसेच त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावयाची असल्यास प्रत्येक गावामध्ये पंधरा दिवसानी किंवा जास्तीत जास्त ग्रामसभा घेतल्या गेल्या तर सर्व योजनाची सविस्तर माहिती खेड्यातील लोकांना कळू शकतील व प्रभावीरित्या अमलात आणून ग्रामिण भागातील लोक आपला जीवनस्तर उंचावू शकतील स्त्रियांना स्थळ व वेळ याची पुरेशी माहिती मिळल्यास स्त्रियांचा सहभाग वाढेल व ग्रामसभा जास्त सक्षम होईल व पंचायत राज बळकट होईल.

**संदर्भ –**

१) ग्रामीण नागरी समाजशास्त्र – रा. ज. लोटे

२) योजना – फेबुवारी २००६

३) भारतीय समाज आणि सामाजिक समस्या – डॉ भा. कि. खडसे

४) भारतीय समाज मुद्दे एवं समस्याएँ – डॉ. धर्मवीर महाजन, डॉ. कमलेश महाजन



Scanned by CamScanner

# वेदातील धनपति

सौ. केतकी खोले १९८३, 'मोरया-विलास' माडिवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०. मोबा.- ०८५५४८८७०९७, ०९४२०८६४४९६.

**शोधनिबंधाचा सारांश**

'धनपति' म्हणजे संपतीचा देव (Lord of wealth) अशी सामान्यपणे व्याख्या करता येते. 'धनपति' हा शब्द एखाद्या विशिष्ट देवतेचे गुणविशेषण म्हणूनही वापरला जातो. सर मोनियर विल्यम्स यांच्या शब्दकोशामध्ये तसेच आपटे यांच्या शब्दकोशामध्ये 'धनपति' म्हणजे संपतीचा देव (Lord of wealth) असा अर्थ दिलेला आहे.

वैदिक साहित्यामध्ये प्रामुख्याने अथर्ववेद (शौनक आणि पैप्पलाद) तसेच कृष्ण यजुर्वेदाच्या काठक संहितेमध्ये 'धनपति' या देवतेचे मंत्र आलेले आहेत. विशेषतः अथर्ववेदामध्ये 'धनपति' ही एक वैशिष्ट्यपूर्ण देवता असल्याचे आढळते.

अथर्ववेद (शौनक) संहितेमध्ये 'धनपति' हे देवताविषयक चार मंत्र आलेले आहेत.

सायणाचार्यांचे भाष्य आणि मंत्रांमधील उल्लेख यांचा अभ्यास केला असता असे दिसते की धनपति ही एक देवता आहे. वैदिक साहित्यामध्ये धनपति देवतेचे स्वरूप, गुणवैशिष्ट्ये यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधामध्ये केलेला आहे.

<u>प्रस्तावना</u>- धनपति म्हणजे 'संपत्तीची देवता' अशी सामान्यपणे व्याख्या करता येते. धन म्हणजे संपती आणि पति म्हणजे स्वामी; म्हणजेच सर्व प्रकारचे धन, ऐश्वर्य यांचा स्वामी म्हणजे धनपति ! पा (रक्षणे) या धातूपासून 'पति' या शब्दाची व्युत्पत्ती सांगता येते.

सर मोनिअर विल्यम्सच्या शब्दकोशामध्ये 'धनपति' या शब्दाचा अर्थ संपतीचा देव (Lord of wealth) असा दिलेला आहे. तसेच आपट्यांच्या शब्दकोशामध्ये 'धनपति' चा अर्थ 'कुबेर' असा दिलेला आहे.

वैदिक साहित्यामध्ये 'धनपति' या देवतेचे वर्णन करणारे मन्त्र आढळतात. धनपति संदर्भातील मन्त्र हे अथर्ववेद (शौनक आणि पैप्पलाद) तसेच कृष्ण यजुर्वेदाच्या काठक संहितेमध्ये आलेले आहेत. वैदिक साहित्यामध्ये वसुपति, राधस्पति, रयिपति, मघवन् असे 'धनपति' या शब्दाचे पर्यायवाचक शब्दही आढळतात. परंतु त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे अधिक उपयुक्त ठरेल.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'धनपति' या देवतेविषयीच्या वैदिक साहित्यातील संदर्भांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

<u>अथर्ववेदातील धनपति</u>- अथर्ववेदाच्या शौनक आणि पैप्पलाद अशा दोन्ही संहितांमध्ये धनपतिविषयक मन्त्र आढळतात.

i) 2.36.6- आ क्रन्दय धनपते वरमामनसं कृणु ।
सर्वं प्रदक्षिणं कृणु यो वरः प्रतिकाम्यः ।।

अथर्ववेद (शौ.) संहितेमधील 2.36 हे 'पतिवेदन सूक्त' आहे. या सूक्तामधील ६ व्या मन्त्रामध्ये कन्येला अनुरूप वर प्राप्त व्हावा म्हणून 'धनपति' देवतेची प्रार्थना केलेली आहे. कौशिक सूत्राने 'स्त्रीकर्माणि' (34-12-16) या अंतर्गत या मन्त्राचा विनियोग सांगितलेला आहे. या मन्त्राच्या भाष्यामध्ये सायणाचार्य धनपति चा अर्थ वैश्रवण असा देतात. तसेच एन. जे. शेंडे यांनी आपल्या Foundations of Atharvanic Religion या ग्रंथामध्ये 'धनपति' चा समावेश 'गौण देवता' मध्ये केलेला आहे; धनपति म्हणजे वैश्रवण असल्याचे म्हटले आहे.[1]

अथर्ववेदाचे भाषांतरकार डब्ल्यू. डी. व्हिटनी तसेच ब्लूमफील्ड यांनी 'धनपति' चे भाषांतर Lord of riches असे केलेले आहे. अथर्ववेदीय सर्वानुक्रमणिका (1.24)[2] मध्ये पतिवेदन सूक्तामधील (2.36) देवतांची यादी दिलेली आहे. यामध्ये अग्नि, सोम, अग्निषोम, इंद्र, सूर्य, धनपति, भग आणि ओषधि या देवता आहेत. बृहत्सर्वानुक्रमणिकाकाराने पतिवेदन सूक्तामधील इतर देवतांबरोबर तुलना न करता 'धनपति' या देवतेचा उल्लेख स्वतंत्रपणे केलेला आहे. त्यामुळे धनपति ही एक स्वतंत्र देवता असावी असे वाटते. 2.36.6 या मन्त्राच्या भाष्यामध्ये सायणाचार्य धनपति चा अर्थ वैश्रवण असा देतात;[3] परंतु मन्त्रामध्ये प्रत्यक्षपणे वैश्रवण देवतेचा उल्लेख आढळत नाही. त्यामुळे 'धनपति' ही स्वतंत्र देवता असावी असे वाटते.

ii) 4.22.3-अयमस्तु धनपतिर्धनानामयं विशां विश्पतिरस्तु राजा ।
अस्मिन्निन्द्र महि वर्चांसि धेह्यवर्चसं कृणुहि शत्रुमस्य ।।



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

अथर्ववेद (शौ.) संहितेमध्ये ला मन्त्र आला आहे. या मन्त्रामध्ये राजाला 'धनपति' असे म्हटलेले आहे. सायण भाष्यामध्ये अयं राजा धनानां सुवर्ण रजत मणि मुक्ताप्रवालादीनां धनपतिः स्वामी अस्तु भवतु । असे म्हटलेले आहे. राजा हा सर्व प्रकारच्या धनाचा स्वामी असतो: त्यामुळे राजा हा धनपति होवो अशी प्रार्थना केलेली आहे.

iii) 5.23.2-अस्येन्द्रं कुमारस्य क्रिमीन् धनपते जहि ।

हता विश्वा अरातय उग्रेण वचसा मम ।।

अथर्ववेद (शौ.) संहितेमधील 5.23 या कृमिनाशन सूक्तामधील हा मन्त्र आहे. या मन्त्राची देवता 'इन्द्र' असून अनिष्ट शक्तींचा नाश करून बालकाला कृमींपासून मुक्त करण्यासाठी इन्द्र देवतेची प्रार्थना केली आहे. या मन्त्रामधील 'धनपति' हा इन्द्र आहे.

iv) 10.10.11-यत् ते क्रुद्धो धनपतिरा क्षीरमहरद् वशे ।

इदं तदद्य नाकस्त्रिषु पात्रेषु रक्षति ।।

अथर्ववेद (शौ.) संहितेमध्ये 10.10 हे धेनुची स्तुती करणारे सूक्त आहे; त्यामध्ये अकराव्या मन्त्रामध्ये इंद्र देवतेला 'धनपति' असे म्हटले आहे. धनपति इंद्र जर रागावला तर तो दुभत्या गायींना दुग्धरहित (वशा) करतो असे वर्णन यामध्ये आलेले आहे.

v) 1.96.3 ईशानं त्वा शुश्रुमा वयं पुरो (हि)त धनानां धनपते ।

गोमद् अग्ने अश्वद् भूरि पुष्टं हिरण्यवद् अन्नवद् धेहि मह्यम् ।।

अथर्ववेद (पै.) संहितेमध्ये हा मन्त्र आढळतो. यामध्ये 'अग्नी' ला धनपति असे म्हटलेले आहे.

* काठक संहिता- काठक संहितेमध्ये धनपति संदर्भात दोन मन्त्र आढळतात.

i) 21.14 - इन्द्रं वयं श्रुनासीरमस्मिन्यज्ञे हवामहे ।

इह देवं सुराधसम् ।

इन्द्रं वयं धनपतिं सूनुमन्वारभामहे ।

स नः पितेव पुत्रेभ्य ईशानश्शर्म यच्छतु ।।

या मन्त्रामध्ये इंद्राला धनपति असे म्हटलेले आहे.

ii) 40.5 - दधाम यज्ञं सुनवाम सोमं यज्ञेन त्वामुपशिक्षेम शक्र ।

ईशानं त्वा शुश्रुमा वयं धनानां धनपते ।।

या मन्त्रामध्ये ईशान आणि शक्र यांना धनपति असे म्हटले आहे.

वैदिक संहितांमधील मन्त्रांचा विनियोग श्रौत आणि गृह्यसूत्रांमध्ये सांगितलेला असतो. श्रौतसूत्रं ही प्रामुख्याने श्रौतयागांशी संबंधित असतात. धनपति विषयक उल्लेख आपस्तम्ब श्रौतसूत्र, वैखानस श्रौतसूत्र आणि हिरण्यकेशि श्रौतसूत्र यांत आलेला आहे.

आपस्तम्ब श्रौतसूत्र 16.34.4 मध्ये,

'रायस्पोषं नो धेहि जातवेद उर्जो भागं मधुमत्सूनृतावत् ।

दधाम यज्ञं सुनवाम सोमं यज्ञेन त्वामुपशिक्षेम शक्र ।

ईशानं त्वा शुश्रुमो वयं धनानां धनपते गोमदअग्ने ।।'

अग्निचयनाचा विधिमध्ये सयुजचितिची रचना सांगताना हे वर्णन आलेले आहे. यामध्ये अग्निला धनपति असे म्हटले आहे. हिरण्यकेशि श्रौतसूत्र तसेच वैखानस श्रौतसूत्रामध्ये देखील असेच वर्णन आलेले आहे.[4]

गृह्यसूत्रांमध्ये गृह्यकर्मांचे विवेचन केलेले असते. यामध्ये प्रामुख्याने उपनयनादि संस्कार, तसेच नित्यकर्मांचा समावेश होतो. शांखायन गृह्यसूत्र (2.14) मध्ये वैश्वदेव कर्मामध्ये बली देताना,

'अविज्ञाताभ्यो देवताभ्यो उत्तरतो धनपतये च ।।' असा उल्लेख आहे. (शां.गृ.2.14.17) या ठिकाणी धनपतिची उत्तर दिशा असे traits प्राप्त होतात.

अविज्ञात (अपरिचित) अशा देवता आणि धनपति यांच्याकरिता उत्तर दिशेला बली द्यावा असे वर्णन आहे. तसेच यानंतर 'वैश्वदेवमिमं ये तु सायंप्रातः प्रकुर्वते । ते अर्थेरायुषा कीर्त्या प्रजाभिश्च समृध्नुयुरिति ।।' अर्थात जे सकाळ-संध्याकाळ हे वैश्वदेव कर्म करतील त्यांना संपती, आयुष्य, प्रजा लाभेल, असे वर्णन केलेले आहे. सर मोनियर विल्यम्सच्या मते, या मन्त्रामधील धनपति म्हणजे कुबेर आहे.

* निरीक्षणे-

१) वैदिक साहित्यातील धनपति विषयक संदर्भांचा अभ्यास केला असता असे दिसते की, सर्व प्रकारचे धन; त्याचा अधिपति म्हणजे धनपति होय.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

२) काही ठिकाणी 'धनपति' हे विशेषण म्हणून वापरल्याचे आढळते. अथर्ववेद (शौ.) संहितेतील ५.३२.२ अग्नि
१०.१०.११ तसेच काठक संहितेतील २१.१४ या मन्त्रांमध्ये इंद्राला धनपति असे म्हटले आहे.

3) अथर्ववेद (पै.) १.९६.3 काठक संहिता ४०.५ तसेच आपस्तम्ब श्रौतसूत्र १६.३४.४, हिरण्यकेशि श्रौतसूत्र ११.८.१५
वैखानस श्रौतसूत्र(१८.२१.३५) मध्ये 'धनपति' असे अग्नीला उद्देशून म्हटलेले आहे.

४) अथर्ववेद (शौ.) संहितेमध्ये पतिवेदन सूक्तामध्ये ६ व्या मन्त्रातील 'धनपति' ही स्वतंत्र देवता असावी असे
वाटते. अथर्ववेदीय बृहत्सर्वानुक्रमणिकेतही 'धनपति' चा उल्लेख स्वतंत्रपणे केलेला आहे.

मात्र या मन्त्रावरील भाष्यामध्ये सायणाचार्य धनपति चा अर्थ वैश्रवण असा देतात. शांखायन गृह्यसूत्रामध्ये देखील
'धनपति' हा वैश्रवण-कुबेर असावा असे वर्णन तज्ज्ञांनी केलेले आहे. गृह्यसूत्रांनी धनपति म्हणजे वैश्रवण-कुबेर अशी जी कल्पना
मांडली; त्यावरूनच कदाचित अथर्ववेद भाष्यामध्ये धनपति म्हणजे वैश्रवण असा उल्लेख केला असावा असे वाटते.

* End Notes-

1. N. J.. Shende, The Foundations of the Atharvanic Religion, P. 328.
2. 'आ नो अग्ने' (२,३६) इत्यष्टर्चमग्नीषोमीयं त्रैष्टुभम् । पतिवेदनः प्रथमया (१) अग्निमस्तौत् । द्वितीयया (२) सोमादीन् देवान् । परया (३) अग्नीषोमौ । परया (४) तु इन्द्रम् । परया (५) सूर्यम् । परया (६) धनपतिम् । अथर्ववेदीय बृहत्सर्वानुक्रमणिका १.२४
3. हे धनपते वैश्रवण वरम् वरयितारं पतिम् आ क्रन्दय एषा कन्या मे जाया भूयाद् इति संततम् उद्घोषय ।
4. हिरण्यकेशि श्रौ.सू. (११.८.१५), वैखानस श्रौ.सू. (१८.२१.३५)

* Refrence Books-

1) अथर्ववेद (शौनक), संपा. विश्वबंधु (सायण भाष्यासह), होशियारपूरः VVRI, 1960-64.

2) अथर्ववेद (पैप्पलाद), संपा. रघुवीर, दिल्ली, 1979.

3) अथर्ववेद संहिता ( भाग १,२), Tr. W. D. Whitney, मोतीलाल बनारसीदास पब्लिकेशन्स; दिल्ली, 1996.

4) अथर्ववेदीय बृहत्सर्वानुक्रमणिका, संपा. विश्वबंधु, होशियारपूरः VVRI,1996.

5) Hymns of the Atharvaveda, tr. by Bloomfield, SBE Series, Vol. 42. Reprint, Delhi, 1964.

6) काठक संहिता, संपा. एल.बी.श्रोडर(Schroeder, L.U.), Leipzig, 1900-1922, संपा. श्रीपादशर्मन्, औंध.

7) The Kaushika Sutra of Aharvaveda, Ed. by M. Bloomfield, Reprint Delhi : 1972.

8) Shankhayana Grihya sutra, Ed. by S. R. Sehgal. Delhi: Munshiram Manoharlal, 1960, Tr. by H. Oldenberg SBE, Vol. 29, Reprint Delhi, 1964.



Scanned by CamScanner

# उद्धव शेळक्यांच्या वऱ्हाडी कथा

**डॉ. आर. एम. केदार**, डॉ. गो. खे. महाविद्यालय, गाडेगाव (तेल्हारा) जि. अकोला

प्रस्तावना :- उद्धव शेळके ग्रामीण कथाकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी कथालेखनासाठी वऱ्हाडी बोलीचा वापर केला आहे. वऱ्हाडातील ग्रामीण माणसाच्या मनाचे, दुःखाचे, दारिद्र्याचे चित्रण त्यांच्या कथेमधून येते. दलित व कष्टकरी वर्गावर होणारा अन्याय त्यातूनच मग निर्माण होणाऱ्या व्यथा, वेदना त्यांच्या कथांमधून येतात. व्यक्ती आणि परिस्थिती हया दोहोंच्या समन्वयातून निर्माण झालेल्या कथा आपल्याला ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवतात. ते आपल्या कथेतील व्यक्तिचित्रण मोठ्या सहानुभूतीने करतात. त्यामुळे वाचक त्यांच्या कथा वाचतांना अस्वस्थ होऊन जातो. त्यांनी कथांसाठी वापरलेली वऱ्हाडी बोली कथेला वजन प्राप्त करून देते.

शेळके यांचे 'शिळान अधिक आठ कथा', 'वानगी', 'घुसळण' इत्यादी कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांनी वऱ्हाडातील ग्रामीण भागात राहणाऱ्या माणसाची विविध रूपे आपल्या कथांमधून वाचकांसमोर मांडली आहेत. वऱ्हाडातील जीवनाचे वास्तव चित्रण पहावयाचे झाल्यास ते उध्दव शेळके यांच्या कथेत पहावयास मिळते. वऱ्हाडातील कष्टकरी समाज कसा जगतो, त्याच्या व्यथा, वेदना ते नेमक्या शब्दात मांडतात.

'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहामध्ये दारिद्र्याने ग्रस्त झालेल्या संसारी माणसाच्या कथा आहेत. दुःख, दारिद्र्य व संकटात खितपत पडलेल्या या माणसांबद्दल वाचकांच्या मनात सहानुभूती निर्माण करण्यात शेळके कमालीचे यशस्वी झाले आहेत. या कथासंग्रहातील 'लेकुरवाळी' या कथेत आपल्या मुलाबाळांच्या काळजीने त्रस्त असलेली स्त्री दाखविली आहे. ग्रामीण भागात पुरेसा रोजगार उपलब्ध नसल्यामुळे खेडयातील कारागीर शहराकडे धाव घेतात. 'लेकुरवाळी' मधला भगवंता असाच रोजगारानिमित्त शहरात आलेला असतो. सलूनवर लोकांच्या दाढ्या, कटींग करून आलेल्या पैशातून आपला संसार रेटीत असतो. 'दिवायी' कथेतील जानकीही दुसऱ्याकडे कामधंदा करून पैसा मिळवीत असते. पावसाळा हा शेतकऱ्यांना आनंद देणारा ऋतू, पण त्या पावसाळ्यात कारागिरांचे कसे हाल होतात त्याचे वर्णन 'पावसाळा' या कथेत आले आहे. या कथेतील बापूरावच्या मशीनवर तात्या काम करीत असतो. पण पावसाळा असल्यामुळे गिऱ्हाईक फिरकत नाही. त्यामुळे मग कुटुंबाला उपास घडण्याची वेळ येते.

खेड्यात लग्नकार्याला एक विशेष सामाजिक महत्व आहे. एकदा लग्न झाले म्हणजे तो नवरा आपला साता जन्माचा सोबती असा स्त्रियांचा समज असतो. त्यामुळेच तो रंगा, रूपाने कसाही असो, रोज मारझोड करणारा असो किंवा बाहेरख्याली असो ती स्त्री नवऱ्याला घडस्फोट द्यायला तयार होत नाही. नेमकी हीच अवस्था शेळक्यांनी 'घालमेल' या कथेतील शेवंतीची दाखविली आहे. तिचा काहीच दोष नसतांना तिला नवऱ्यापासून वेगळे केले जाते. त्यावेळेसची तिची घालमेल आपल्याला अस्वस्थ करून सोडते.

'ताटातूट' या कथेत नवऱ्याच्या बाहेरख्यालीपणामुळे माय–लेकरांची होणारी ताटातूट आपल्या मनाला चटका लावून जाते. या कथेतील पारबतीचा नवरा तिला पोरापासून दूर करतो. तिला वाऱ्यावर सोडतो. ती मात्र मजुरी करून जगत असते. अधुनमधून नजरेस पडणाऱ्या मुलावर माया करते. त्याला आपल्या घरी नेते, आंघोळ घालते, कपडे धुवून देते. जमेल तेव्हढे चांगले चुंगले त्याला खायला देते. पोराने खायचे नाही म्हटल्यावर ती म्हणते ''नाई नोको म्हनू सांग तू काय खातं?'' आणि डोळ्याला पदर लावते.

ग्रामीण भागात चालणारे तंटे–बखेटे गावातच सोडविण्यासाठी पाटलाकडे न्याय मागण्याची सोय असते. परंतु आपल्या अधिकाराचा दुरूपयोग करणारे पाटील गावोगाव दिसून येतात. अशा प्रकारची कथा 'वानगी' या कथासंग्रहातील 'दाद' होय. पावसाळ्यात महारवाड्यातील नागीची नात बसंतीचा विनयभंग होतो. तेव्हा यासंबंधीची दाद मागण्यासाठी नागी बसंतीला घेऊन भिमराव पाटलाकडे जाते. सर्व घटनाक्रम ऐकून झाल्यावर तो पाटील तिला न्याय देण्याऐवजी तिचे उघडे शरीर पाहण्याचा प्रयत्न करतो. नागी बिचारी साधीभोळी असल्यामुळे ती बसंतीला म्हणते गावचा पाटील मायबाप तेव्हा त्याची कायची सरम आली. परंतु बसंतीला मात्र मेल्याहून मेल्यासारखे होते. पाटील मात्र चौकशी करतांना आपल्या तरूण मित्रालाही सामील करून घेतो. म्हणजे येथे रक्षकच भक्षक झाल्याचा प्रत्यय येतो. यावरून ग्रामीण भागातील गरीब स्त्रियांची अब्रुही सुरक्षीत नाही असे दिसून येते. याशिवाय ज्यांच्याकडे सत्तेची ताकद आहे ते त्याचा कसा दुरूपयोग करतात तेही या कथेतून लक्षात येते. त्यांच्या कथांबद्दल प्रा. चंद्रकुमार नलगे म्हणतात, ''वऱ्हाडातील ग्रामीण माणसांची विविधांगी रूपे त्यांनी कथांतून उभी केली आहेत. तिथले दैन्य, तिथल्या माणसांची पीळ पाडणारी दुःखे, भुकेने काळंजून जाणारी कष्टकरी माणसांची मने, पोट भरण्यासाठी शहरी मृगजळाला बळी पडलेले हताश जीव यांचे अत्यंत आत्मीयतेने घडविलेले दर्शन हे त्यांच्या कथेचे विशेष आहेत''[१] शेळक्यांच्या कथेतील ग्रामीण स्त्रिया अत्यंत सोशिक, कष्टकरी, कुटुंबासाठी राबणाऱ्या आहेत. या दृष्टीने त्यांची 'अर्धांगी' ही कथा लक्षणीय आहे. या कथेतील सखुच्या नवऱ्याला म्हणजे विठोबाला महारोग झालेला असतो. दारिद्र्यात खितपत पडलेल्या विठोबाजवळ रोगावर इलाज करण्यासाठी पैसे नसतात. बायको मुलाला सोडून रहावे लागेल असे समजल्यावर तो दुःखी होतो. तेव्हा त्याची बायको सखू त्याला सावरते व मुलाबाळांची काळजी करू नका असे सांगते. कुटुंबाचा भार एकटी उचलायला ती तयार होते.



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

'माय' या कथेतून त्यांनी ग्रामीण स्त्रियांच्या दुःखावर प्रकाश टाकला आहे. या कथेतील पुरूष हा कामचुकार, कुटुंबाविषयी उदासीन असा दाखविला आहे. तर त्याची बायको कुटुंबासाठी कष्ट उपसणारी आहे. त्यामुळे स्वाभाविकच दोघांमध्ये भांडणे होतात. तरीही दोघे एकत्र नांदतात''गावगाडा आणि या गावगाड्याशी बध्द असे ग्रामांतर्गत जीवन याची उध्दव शेळक्यांना चांगली जाण आहे''[२] असे मत डॉ. वासुदेव मुलाटे यांनी शेळक्यांबद्दल व्यक्त केले आहे. शेळक्यांच्या कथा वाचल्यानंतर ही गोष्ट पटते.माणसाच्या जीवावर बेतले म्हणजे मग तो कसा वागतो ते शेळक्यांच्या 'लंगडा म्हादू' या कथेतून पहायला मिळते. जेव्हा या म्हादूला साप चावतो आणि हे जेव्हा त्याच्या लक्षात येते तेव्हा त्याचे बोल लक्षात घेण्यासारखे आहेत. तो म्हणतो, ''माणसाले जीवापरस बोटं प्यारे नाई बोटं नाई तोडत मन्लं तं जीव जात होता. मून केला हिय्या एक्का घावात केले पाचई बोटं अल्लग.'' असा हा म्हादू खरोखरच धैर्यवान म्हटला पाहिजे. कारण साप म्हटला की भल्याभल्याची पाचावर धारण बसते. पण हा म्हादू न घाबरता वासल्याने एका घावात पाचही बोटे तोडतो.

शेळक्यांनी आपल्या ग्रामीण कथा रंगविण्यासाठी वऱ्हाडी बोलीचा वापर केला. त्यामुळे वाचक वऱ्हाडी बोलीशी परिचीत होतात. त्यांनी कथा निवेदन नागर भाषेतून केले परंतु कथेतील संवाद मात्र वऱ्हाडी बोलीतून लिहिले आहेत. त्यामुळे त्यांची कथा अधिक परिणामकारक झाली आहे. त्यांच्या ग्रामीण कथेद्दल अंबादास माडगूळकर व सूर्यकांत खांडेकर म्हणतात ''वऱ्हाडी बोली व वऱ्हाडातील संकेत हे या कथांद्वारे पुढे आले.''[३] त्यांनी मांडलेले मत अगदी योग्य आहे.त्यांनी ग्रामीण माणसाच्या लकबी हेरून त्यांना आपल्या कथेत स्थान दिले. त्यामुळे त्यांच्या कथेतील संवाद अधिक परिणामकारक वाटतात. वऱ्हाडातील लोकांना त्यांच्या कथा अधिक जवळच्या व वास्तवपूर्ण वाटतात. त्यांच्या कथेतून येणाऱ्या म्हणी व वाक्प्रचार अस्सल ग्रामीण आहेत. उदा. नावानं बोट मोडणे (माय), पांग फेडणे (ताटातूट), मायबयनी जुव्यात मांडणे (त्याच गावच्या बाभळी), म्हशीचे शिंग म्हशीले काई भारी नसणे (दिवायी), दात ओठ चावणे (अगतिकता) इत्यादी.

उद्धव शेळके यांच्या 'शिळान अधिक आठ कथा', 'घुसळण', 'वानगी' या कथासंग्रहातील ग्रामीण कथांबद्दल डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''शिळान अधिक आठ कथा', 'घुसळण', 'वानगी' या त्यांच्या कथा संग्रहातील कथांनी ग्रामीण कथेच्या प्रवाहाला अधिक परिपुष्ट केले आहेच पण एकूण मराठी कथेच्या क्षेत्रातही मोलाची भर पडली आहे यात शंका नाही''[४] मुलाटेंचे हे मत अगदी योग्य आहे. कारण शेळक्यांनी ग्रामीण कथा अस्सल वऱ्हाडी बोलीत सादर केली. त्यांची वऱ्हाडी कथा लोकप्रिय झाली आणि वाचकांनीही ती पसंत केली यातच त्यांचे फार मोठे यश आहे. त्यांची ग्रामीण कथा खेड्यातील लोकांचे दर्शन घडविण्यात यशस्वी ठरली आहे. म्हणूनच डॉ. श्रीराम गुंदेकर ग्रामीण साहित्याबद्दल आपले मत व्यक्त करतांना म्हणतात, ''ग्रामीण साहित्य हे समाजातील ऐंशी टक्के लोकांचे जीवन दर्शन घडविते''[५] शेळक्यांची कथा या कसोटीवर पूरेपूर उतरते. एकंदरीत शेळक्यांचा कथांचा विचार केला तर त्यांच्या ग्रामीण कथा रंग, रूप, गंधाने अस्सल ग्रामीण आहेत. वऱ्हाडी बोलीचा वापर केल्यामुळे त्या आणखी गोड झाल्या आहेत. त्यांच्या कथेतून वऱ्हाडातील दारिद्र्याचे दर्शन वाचकांना घडते. तसेच निसर्गाचे, तेथील पिकपाण्याचे, सण–उत्सवांचे वर्णन, माणसांचे पेहराव ह्या सर्वच बाबी ग्रामीण कथेला साजेशाच आहेत. त्यामुळेच मग त्यांची ग्रामीण कथा अधिक परिणामकारक होते. भाषेचा योग्य प्रभावही त्यांच्या कथेत जाणवतो. ग्रामीण भागातील वाक्प्रचार व म्हणी तसेच शिव्या सुध्दा अगदी सहजपणे त्यांच्या ग्रामीण कथेत येतात.

**निष्कर्ष :**

- वऱ्हाडातील ग्रामीण माणसांची विविधांगी रूपे त्यांच्या ग्रामीण कथेतून पहायला मिळतात.
- त्यांनी आपल्या कथांमधून ग्रामीण स्त्रियांच्या दुःखावर प्रकाश टाकला आहे.
- त्यांच्या कथेतून वऱ्हाडातील दारिद्र्याचे दर्शन घडते.
- त्यांच्या कथेतील संवाद नाट्यपूर्ण व खटकेबाज आहेत.
- त्यांच्या कथेतून येणाऱ्या म्हणी व वाक्प्रचार अस्सल ग्रामीण आहेत.
- त्यांनी कथेसाठी वापरलेली वऱ्हाडी बोली कथेला वजन प्राप्त करून देते.

**संदर्भ :–**

१) प्रा. चंद्रकुमार नलगे (संपादक) – ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, सुरेश एजन्सी, पुणे, १९९६, पृ. ९९.
२) डॉ. वासुदेव मुलाटे –ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५,पृ. ८१.
३) अंबादास माडगूळकर, सूर्यकांत खांडेकर (संपादक) – मराठी ग्रामीण कथा, प्रस्तावना, ठोकळ प्रकाशन,पुणे, १९७९.
४) डॉ. वासुदेव मुलाटे – ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा, उध्दव शेळके यांची कथा, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९४, पृ. १२७.
५) डॉ. श्रीराम गुंदेकर – ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९९,



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

# डॉ. सुभाष महाले के कहानीयों में नारी विमर्श

डॉ. लावणे विजय भास्कर शोधमार्गदर्शक महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर ता.अहमदपूर जि.लातूर

**प्रस्तावना :-** कहानी विधा का विकास हम प्रेमचन्द से मानते है पर उसके पूर्व भी कहानीया लिखि गयी है । वर्तमान में कई नये कहानिकार सामने आने लगे है, और वह वर्तमान से जुडी कहानीयों का लेखन भी कर रहे है । इसमें से एक महाराष्ट्र के खान्देश निवासी डॉ. सुभाष महाले जी है । इन्होंने दहेज का दर्द (१९९४) जहां जिन्दगी कैद कैद है (२००५) अन्नदाता की आत्महत्या (२०१५) इन कहानी संग्रहों का सृजन किया है । इन कहानी संग्रहों में डॉ. महाले जी ने वर्तमान समस्या के साथ नारी के विविध रूपों का चित्रण भी किया है । इनकी नारी विमर्श सलग्न कहानीया हैं – दहेज का दर्द, साजिश, मातृत्व का अपहरण, परित्यक्ता, दस्तूर, मैं वापस आऊँगी, जानकी बुआ, गाठीया, रिश्ता ।

**दहेज का दर्द :-** इस कहानी में प्रतिभा पढी लिखि लडकी है वह पदवी उत्तीर्ण होती है तो, कपडे के दुकान पर काम करने वाला पिता लडकी को देखने आने वाले है इस कारण कर्ज निकालता है । लडकी पसन्द आति है, पर दहेज के कारण रिश्ता बनता नहीं, लोग खा – पिकर चले गये कर्ज बढता गया उम्र बढती गयी । दहेज के दर्द के कारण पिताजी चलबसे माँ पागल हुई, अचानक वह भी चलबसी लडकी काम की तलाश में कपडे के सेठ के दुकानपर जाने लगी, क्योंकि कमाने वाला कोई नहीं था छोटे भाई बहन थे घर में, पर सेठ के लडके ने हवस का शिकार बनाया जब सेठ से शिकायत की तब सेठने नेभी शारीरिक शोषण ही किया । परिस्थितिवश व वेश्या बन गयी जब एक पीएच.डी करनेवाला प्रोफेसर उसका साक्षात्कार लेने जाता है तब वह सारी कहानी बताती है और कहती है "छोटा भाई - बहन, रोती हूँ अब भी उनकी याद में पता नहीं भगवान उन्हें कहा ले गया ? वे है भी या नहीं"।,

दहेज समस्या के कारण माता पिता नहीं रहते तब छोटे भाई बहन के खातिर एक लडकी कुछ काम करती है तब हवस का शिकार होती है और समाज उसे वेश्या बना देता है। नारी की व्यथा के साथ उसका अपने भाई और बहन के लिए रोना, यहा उसकी ममता भी दिखाई देती है। और समाज के प्रति किसतरह की तिरस्कार की भावना थी इस बात को भी इस कहानी में उजागर किया गया है।

**साजिश :-** डॉ. शिवकुमार प्राध्यापक थे उनकी पत्नी पार्वती और बेटा गुरूदत्ता छोटासा परिवार था पर बेटे की खाई में गिरनेसे मौत होती है । तब पार्वती ने बेटे के लिए शिवकुमार की एक गरिब की लडकी से शादी करवायी, कुछ दिन अच्छे गये रंजना को बेटा भी हुआ पर पार्वती ही उस बेटे को हमेशा संभाले रहती रंजना के पासतक जाने नहीं देती थी । बच्चा रंजना से ज्यादा पार्वती को पहचानने लगा, बुढा पती और जवान पत्नी परिणाम स्वरूप रंजना का मेहमानों को चाय देना बंद हुआ, बहार घुमना बंद कर दिया गया, बेचारी रंजना कहातक सहती गरिब की लडकी थी। पार्वती और रंजना में झगडे होने लगे । डॉ. शिवकुमार ने पार्वती को समझया तब पार्वती कहती है "हमे बच्चा चाहिये था मिल गया, अब उसकी उपयोगिता खत्म हो गयी है हमारे लिए।"₂ बेचारी रंजना को जिवन नर्क लगने लगा । एक दिन रंजना आत्महत्या करती है।

एक नारी ही दुसरी नारी का शोषण करती है। पार्वती को बच्चे की चाहत थी। इसके लिए किसतरहसे गरिब की बेटी रंजना को घर में लाया जाता है और जब उससे बेटा मिलता है तो रंजना सेही पार्वती उसके माता का हक्क, पत्नी का हक्क छिन लेती है उसे सिर्फ नोकरानी के तौर पर इस्तेमाल करती है, एक नारी ही दूसरी नारीका खुद का स्वार्थ पूरा होने पर किसतरहसे शोषण करती है और आखिर एक मरती है और एक जिती है। नारी का नारी भी शोषण करती है इसका चित्रण इस कहानी में दिखाई देता है।

**मातृत्व का अपहरण :-** एम.ए. होने पर चन्दर को कोई नौकरी नहीं थी पर सपने अमिरों के और ऐश चैन की जिन्दगी चाहिए थी। तब उसने महाविद्यालय के चेरमन की लडकी से शादि की। लडकी दिखने में अच्छी नहीं थी । पर चन्दर को गाडी बंगला और नौकरी मिली कुछ दिनों में उसे महाविद्यालय की लडकीया अच्छी लगने लगी वह लडकीयों के पिछे भागने लगा । उसने तलाक देने के लिए डॉक्टर से मिलकर पत्नी का गर्भाषय ही निकाल दिया । पत्नी को रोते हुए बताया तुम्हें बच्चा नहीं होगा । पत्नी सुमन ने तलाक दे दिया और चन्दर ने दूसरी शादि की, बाद में सारी करतूत सुमन को मालूम पडी तब वह चन्दर से कहती है तुमने मेरे मातृत्व का अपहरण किया है । बेचारी कुछ भी नहीं करसकती थी ।

इस काहनी में पुरूष अपनी हवस, अपनी अय्याशी जीन्दगी पुरी करने के लिए किसतरह नारी जीवन के साथ खिलवाड करता है नारी कितनी बडी साजिस का शिकार होती है, उसका गर्भाषय ही निकाला जाता है। नारी आखिर ममता भरी होती है। तलाक के लिए राजी होती है। पुरूष कितना स्वार्थि है। सुमन बेचारी अत्याचार के कारण किसतरहसे मातृत्व से दूर होती है य भी इस कहानी में दिखाया है।

**परित्यक्ता :-** पुष्पा एक बी.ए.तक पढी लडकी भी सूशिल थी पर सुंदर नहीं थी। अशोक के साथ पुष्पा का विवाह हुआ । अशोक को पुष्पा पसंद नहीं थी पिता थे तब तक संसार की गाडी चली। पिता की मृत्यु होते ही अशोकने शराब पिना शुरू किया, पुष्पा को रोज मारपिट करना शुरू किया बेचारी सहती रही एक दिन घरमेही अशोक और दोस्त रणजित रातभर शराब पिते रहे तब रणजित पुष्पापर नजर लगाये बैठा था । वह डर के मारे भाग कर हमेशा के लिए पिता के घर आई। पिता कहते रहे शादि के बाद तुम्हारा ससूराल ही घर है, वापस लौट जाओ। वह सिर्फ रोती रही, पिता के मृत्यु के बाद भाई से कहती है मेरी दूसरी शादि करवादो नहीं तो कहा तो नौकरी देखो । भाई बोला अपने खानदान में लडकी की दूसरी शादि नहीं होती । वह तो सिर्फ भाभी की नौकरानी बनकर रही। उसने एक दिन परेशान होकर मिट्टी का तेल छीडकर आत्महत्या कर डाली।

परित्यक्ता कहानी में पुष्पा का शराबी पति कितने जुल्म ढोता है पर वह सहती रहती है आज नहीं तो कल पति सुधरंगा यह उम्मीद थी। पर रणजित उसे हवस का शिकार बनाना चाहता है और परिस्थिति वश उसे घर छोडकर जाना पडता है। पुष्पा मायके में नौकरानी बनकर रहती है। समाज में लडकी की दूसरी शादी को मान्यता नहीं, यहा पुरूष प्रधान समाज का वर्चस्व दिखाई देता है, क्योंकि पुरूष को दूसरे विवाह की मान्यता है। कुरूपता एक शाप है साथ ही नारी का अबला असाय रूप इस कहानी में दिखाया है।

**दस्तूर :-** अमावस मागने वाली महिला हर द्वार पर जाकर नमक, मीर्च, उडद, उनाज कुछ कपडे भी मांगती थी उसके साथ उसका लडका मंगू और लडकी गंगी भी रहती थी । जो अनाज मिलताथा उससे महिने भरका खाने का बदोबस्त होता था । मागू के पिता की अमावस के दिन ज्यादा शराब पिने के कारण मृत्यु हुई। परिणाम स्वरूप मंगू की माँ अमावस माँगने लगी, जो कपडे मिलतेथे उसे वह धोती थी और इस्त्री बनाकर बाजार में बेचती थी। जीससे उसे कुछ आथिक सहायता मिलती थी।

जीस नारी का पति इस दूनिया मे नहीं रहता उसका दर्दनाक चित्रण दस्तूर में है। मंगू की माँ का अमावस मांगने जाना उससे बेटे बेटी का पेट भरना, उसके पास कुछ दूसरा सहारा भी नहीं था। सिर्फ पेट भरने से प्रश्न नहीं मीटता अन्यचिजों के लिए पैसों की जरूरत हाती है, तब वह मिले हुए कपडे बेचती है । एक नारी पति के पिछे बच्चों को बडा करने के लिए कितने कष्ट सहती है । नारी का यातना और संघर्ष भरा चित्रण इस कहानी में है ।

**मैं वापस आऊँगी :-** सुधाकर और वसुधा की शादी को दो साल हुए पर बच्चा नही हुआ । वसुधा हमेशा तनाव में रहने लगी सुधाकर उसे बाँझ समझने लगा वसुधा तनाव में बडबडाने के कारण उसने उसे पागल कहकर पागलों के अस्पताल में भर्ती कर दिया । उसका दूसरी शादी का रास्ता खूल गया । वसुधा पागलखाने से भाग आयी । रेल्वे में तीकट नहोने के कारण उतार दियागया तब उसपर बलात्कार हुआ । उसके ठिक नौ महिने बाद उसने रस्तेपरही



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

एक बच्चे को जन्म दिया और चिल्ला चिल्लाकर कहने लगी “ हाँ,हाँ, मैं पागल हूँ, जरूर पागल हूँ पर बाँझ नहीं हूँ यकीन नहीं है मेरा बेटा, यह उल्हास है”।३ और उस बच्चे के रक्षा के खातीर रास्तेपर खडे लोगोंपर वसुधा पत्थर मारने लगी।

इस कहानी में नारी की मनोव्यथा उजागर की है। इस पुरूष प्रधान संस्कृति में कोई भी दोष नारी को दियाजाता है। परिणाम स्वरूप नारी को वसुधा जैसी गंभीर यातना भी सहनी पडती है। जीसकी वह गुन्हेगार नहीं होती उसकी भी सजा उसे ही भुगतनी पडती है। बच्चा होने के कारण वसुधा का मातृत्व जागृत होता है और उसे लगता है मेरे बेटे को कोई उठालेगा इसी कारण वह उसके तरफ देखने वाले लोगों पर पत्थर मारती है, तब समाज उसे फीरसे पागल कहता है। उसका मातृहदय इस पुरूष प्रधान समाज में किसी को भी नहीं दिखाई देता।

**जानकी बुआ :-** जानकी बुआ गॉव में बर्तन मॉंजने का काम करती थी और कपडे भी धोती थी । साथ “बाल बच्चों मॉं बहनों और बहूबेटियों के पेट का दर्द - मरोड तो उसके हाथ से मले बिना मिटता ही नहीं था”।४ बस्ती से दूर नदी किनारे घर था उसका। नदी पर कपडे धोते समय एक बच्चे को भी बचाया था उसने । एक दिन गॉव में आग लगने वाली थी तब उसने गाँव में जाकर आग की सूचना दी और गॉव आगसे बच गया । गॉव के मुखियासे उसने नदी के पानी के डर की वजहसे कई बार घर के लिए जमीन माँगी पर नहीं मिली । और पुरे गॉव की सहायता करने वाली जानकी बुआ का परिवार रात के बाढ में वह गया।

जानकी बुआ इस कहानी में जो स्त्री गॉव के हर घर की सहायता के लिए तत्पर रहती है वही स्त्री हाथ पसारकर जब घर के लिए थोडी जमीन मॉंगती है तो उसे नही मिलती, गॉव के किसी नेभी कोइभी काम बताने पर बेचारी करती थी। बाढ खत्म होने पर जब जानकी बुआ का झोपडा, परिवार नहीं दिखा तब सब धूंडते है। धुंडते है इसलिए की उनके घरके काम अब कौन करेगा उनके दर्द की दवा कौन देगा । लेखकने इस कहानी में यही दिखाया है कि एक नारी जो हमेशा गॉव वालो की एक पुकार पर दौडी जाती थी उस नारी की एक छोटी सी बीनती समाज ने मान्य नहीं की और वह बाढ में बह गयी । एक नारी का समाज के प्रति कितना योगदान रहा है यह भी इस कहानी में दिखाया है ।

**गाठिया :-** पटला मृत सुहागन की नथनी का जो सोना था वह जलने के बाद जो गोले में परिवर्तित हो जाता था वह नदी में गोते लगाकर धुंडने के कारण उसके हाथों और पावों में जख्म होने लगे परिणाम स्वरूप उससे कुछ भी काम नहीं होता था तब उसकी पत्नी पटली गॉव में ज्यादा काम करने लगी । बर्तन धोना कपडे धोना और कुछ काम हो तो वह भी करने लगी । एक दिन बिमार पडी पैसे न होने के कारण मर ही गयी ।

इस कहानी में एक पत्नी अपने पति और परिवार के लिए कितना संघर्ष करती है इस बात को इस कहानी में दिखाया है । पति से जब गोता लगाना नहीं होता तब वह शराबी होता है । तब वह ज्यादा काम करती है और परिवार को चलाती है । भारतीय नारी की यही सबसे बडी विशेषता है कि वह अपना पति कैसा भी हो पर पारिवारिक जीम्मेदारीसे वह कभी मुह नहीं मोडती भलेही जीम्मेदारी निभाते समय मर ही क्यों न जाये यही बात इस कहनी में दिखायी है ।

**रिश्ता :-** इस कहानी में सुगन्धा एक सुंदर लडकी है वह अपने ऑफिसके सहकारी से बोलते समय हमेशा भाईसहाब कहती है। यह उसे पसंद नहीं आता । वह कभी भी उसे सिर्फ सुगन्धा ही कहता है । सुगन्धा कहती है कल रक्षाबंधन है मैंने तुम्हारे लिए एक राखि खरिदि है तब वह बडा उदास होता है ।

रिश्ता कहानी में सहकारी लड्डा हमेशा सुगन्धा को बुरी नजरों से देखता है। एक पुरूष हमेशा एक सुंदर स्त्री को बहन कहना पसन्द नहीं करता और नहीं उसका भाईसहाब कहना उसे पसन्द आता है । पुरूष का एक सुन्दर स्त्री के प्रति किसतरह आज व्यवहार होता है और स्त्री बेचारी किस भावनासे उसके तरफ देखती है इसका चित्रण इस कहानी में किया गया है।

नारी आज परिस्थिति वंश अगर अर्थ प्राप्ति के लिए कुछ काम करना चाहती है तो समाज उसके बेसहारा होने का लाभ उठाता है और उसका शारिक शोषण करता है और एक दिन उसे वेश्या बना देता है । कई बार हम देखते है एक नारी ही दूसरी नारी का शोषण करती है। रंजना से बेटा मिलने के बाद उसका प्रयोग नौकरानी के तौरपर होता है। सारि सच्चाई सामने आनेपर वह आत्महत्या करती है । आज भी समाज में गरिब के बेटियों के साथ इसतरह की वारदात होती रहती है। पुरूष अपनी हवस पुरी करने हेतु अच्छी पत्नी का मातृत्व डॉक्टर द्वारा समाप्त करता है तब नारी मातृत्व से दूर होकर पति के विरूध्द । कुछ भी नहीं करती।कई शराबी पति अपनी पत्नी के साथ किसतरह बर्ताव करते है तब नारी बेचारी किसतरह उस जूल्म को सहती है, पत्नी धर्म निभाती है। मैंके में आने के उपरांत नारी को समाज दूसरी शादि की मान्यता नाही देता न वह घर से बहार जा सकती थी। सुंदर न होना भी नारी के लिए शाप होता है । पती जब दूनिया में नहीं रहता तब पत्नी छोटे बच्चों के पालन पोषण के लिए कितने कष्ट सहती है। माँगकर जो मिला उससे गुजार करती है । पुरूष प्रधान संस्कृति में हर दोष नारी को दया जाता है। परिणाम स्वरूप आज वसुधा जैसी कई महिला त्रासदी में यातना भरा जीवन जी रही है। जो नारी समाज गॉव के हर काम में हरतरहसे सहायता प्रदान करती है उसकी छोटीसी माँग गॉव पूरी नहीं कर सकता, भारतीय नारी पति से जब काम नहीं होता तब खुद परिवार चलाने के लिए कडी मेहनत मजदूरी करते करते खुद को समाप्त करती है पर परिवार पति को नहीं छोडती। समाज में नारी का सुंदरता होना भी और न होना भी इस समाज में शाप किसतरह है यह भी इन काहनी यों में दिखाया गया है ।

‘दहेज का दर्द’ इस कहानी में नारी की असायता का लाभ पुरूष किसतरहसे उठाते है यह दिखाया है । ‘साजिस’ कहानी में एक नारी ही दूसरी नारी का शोषण किसतरह करती है, काम होनेपर उसे किसतरह यातना दिजाती है इसका चित्रण है। ‘मातृत्व का अपहरण’ इस कथा में पुरूष अपनी अय्याशी पुरी करने के लिए किसतरह उसके मातृत्व का अपहरण करता है यह दिखाया है। नारीका पारिवारिक रूप भी इन कथाओंमें है। ‘परित्यक्ता’ की पुष्पा कई दिनों तक पती के अन्याय अत्याचार को सहती है। ‘गाढीया’ की पटली पति से कुछ काम न होने कारण ज्यादा काम करते – करते समाप्त होती है। ‘दस्तुर’ कहानी में नारी का बच्चों के प्रति लगाव पति न होते हुए भी परिवार के प्रति जो फर्ज है उसे पूरीतरहसे नीभाती है। ‘मै वापरस आऊगी’ की वसुधा में कोई दोष न होकर पुरूष अपनी सत्ता अस्तित्व दिखाने के लिए नारी को यातनाभरा जीवन किसतरह देता है यह दिखाया है । ‘जानकी बुआ’ में जानकी बुआ समाज के लिए उपयुक्त थी पर उसके मृत्यु के उपरोक्त उसका मूल्य गॉव वालों को समझता है। ‘गाठीया’ में पटली अपना पत्नी धर्म निभाते –निभाते मृत्यु तक चली जाति है। आज भारत में कई नारीया है जो पत्नी धर्म निभाते निभाते स्वर्गलोक चली जाती है । ‘रिश्ता’ कहानी में वर्तमान हर पुरूष सुन्दर नारी उसे भाईसहाब कहकर पूकारे यह उसे अच्छा नहीं लगता । इन कथाओं मे नारी का सुदर होना और न होना भी पाप दिखाया हैं । नारीका पारंपारिकरूप भी कहानी में झलकता है । साथ ही साथ आदमी अपनी हवस पूरी करने के लिए लाचार बेसहारा नारीका शोषण किसतरह करता है यह भी दिखाया है। नारी की मातृत्व की जीम्मेदारी और मातृत्व का अपहरण भी इन कहानीयों में डॉ.सुभाष महाले जी ने दिखाया है।

**संदर्भ :-**

१) दहेज का दर्द / डॉ. सुभाष महाले/ चन्द्रलोक प्रकाशन १९९४/पुष्ठ १३
२) दहेज का दर्द / डॉ. सुभाष महाले/ चन्द्रलोक प्रकाशन १९९४/पुष्ठ ६५
३) जहा जिन्दगी कैद है / डॉ. सुभाष महाले/ चन्द्रलोक प्रकाशन २००५/पुष्ठ ९६
४) अन्नदाता की आत्महत्या / डॉ. सुभाष महाले/ साहित्य निलय २०१५/पुष्ठ ५६



Scanned by CamScanner

# संशोधनातील वाङ्मयचौर्य (Plagiarism)

प्रा. वसंत बजरंग भागवत, ग्रंथपाल, जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी.

प्रस्तावना :- कोणत्याही प्रकारच्या कामामध्ये समाज हा घटक मुलभूत मानला जातो. त्या दृष्टीने कोणत्याही प्रकारच्या कामाकाजामध्ये समाजाधिष्ठित असणे अभिप्रत मानले जाते. ग्रंथालय हा घटक ही समाज या घटकाला मुलभूत मानून कार्य करीत असतो. समाजामध्ये विविध प्रकारच्या ग्रंथालयांचा समावेश असतो. त्यामध्ये प्रामुख्याने सावर्जनिक, शैक्षणिक आणि विशेष ग्रंथालये यांचा समावेश केला जातो. सर्व प्रकारच्या ग्रंथालयांचा उद्देश हाच असतो की आपण समाजाच, समाजातील व्यक्तिंच देण लागतो. त्यामुळे समाज तसेच त्यातील व्यक्तिंच ज्ञान वाढविण्याच्या दृष्टीने कार्यरत राहणे हा मुलभूत उद्देश मानला पाहिजे व कामकाज केले पाहिजे. व्यक्तिंनी मिळविलेल्या ज्ञानाचा स्वतःसाठी, स्वतःच्या विकासासाठी तसेच समाजाच्या विकासासाठी उपयोग करावा यासाठी ग्रंथालये कार्य करीत असताना दिसतात.

सार्वजनिक, शैक्षणिक तसेच विशेष प्रकारची ग्रंथालये ही आपापल्या परीने ग्रंथालयाच्या संग्रहात वाढ करण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्नशील असतात व त्या ज्ञानसाधनांचा वापर वाचकांना व्हावा या दृष्टीने कामकाज करीत असतात. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. माहिती व तंत्रज्ञानाचा स्फोट झाल्याने प्रत्येक क्षेत्रांमध्ये या दृष्टीने बदल होताना दिसून येत आहेत. पूर्ण जगामध्ये यामुळे बदल झालेला दिसत आहे.माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी जीवन व समाजामध्ये आमुलाग्र बदल झाले आहेत. सर्व समाज व समाजातील घटक यांना विज्ञान, माहिती व तांत्रिक बदलाने व्यापलेले आहे.

माहिती तंत्रज्ञानाच प्रभावामुळे संशोधकांनी कार्यक्षमता वाढीस लागली व त्यामुळे कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक तसेच मानवी विकासाला चालना मिळाली व त्यामुळे राष्ट्रीय विकासाचा वेग झपाट्याने वाढला आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे शिक्षण समाजाभिमुख होऊन तंत्रज्ञान व व्यावसायिक शिक्षण वाढीस लागून त्यास महत्व प्राप्त झाले आहे. मानवी जीवनातील बदल, राहणीमान, वेळेचा सदुपयोग हे सामाजिक बदल माहिती-तंत्रज्ञानामुळे घडून आले आहेत.माहिती तंत्रज्ञानाच स्फोटामुळे ग्रंथालयातूनही आमुलाग्र बदलांना स्थान मिळाले आहे व प्रत्येक प्रकारची ग्रंथालये ह्या बदलास सामोरी जात आहेत व नवीन आव्हाने तितक्याच ताकतीने पेलत आहेत. नवीन, आत्याधुनिक तंत्रज्ञान अवगत करून वाचकांना योग्य माहिती योग्य वेळेत मिळण्याच्या दृष्टीने ग्रंथालयीन कामकाज केले जात आहे. त्यामुळेच समाजामध्ये ग्रंथालयाचे स्थान भक्कम झाले आहे व समाजही ग्रंथालयाकडे ज्ञानाचे कोठार जे कधीही न संपणारे यादृष्टीने पाहात आहे.

ग्रंथालये, आत्याधुनिक उपकरणे, साधने, तंत्रज्ञान यांचा वापर प्रामुख्याने माहितीचा शोध घेण्याच्या दृष्टीने होत असतो. 'इंटरनेट' हे माहितीचे साधन तर इतके लोकप्रिय झालेले आहे की, काही-काही विद्यार्थी, संशोधक वा इतर वाचकांना एखाद्या दिवशी त्याचा वापर नाही केला तरी काहीतरी विसरल्यासारखे वाटते. इतका वाढता प्रभाव या इंटरनेटचा झाला आहे.संशोधन करीत असताना 'इंटरनेट' या माध्यमांच्याद्वारे इतंभूत माहिती अगदी कमीत कमी वेळेत मिळत असल्याने संशोधकास त्याचा वापर आपल्या संशोधन कार्यात करण्यासाठी होतो. साहजिकच वेळ व पैसा यांची बचत होऊन पुढील संशोधन कार्यास चालना मिळते. कोणत्याही विषयावरील माहिती अगदी ती ऐतिहासिक, भौगोलिक, आर्थिक पार्श्वभूमीसह मिळत असल्याने संशोधक आपल्या संशोधन कार्यासाठी माहितीचा आढावा घेण्यासाठी किंवा सांख्यिकीय माहिती तयार करण्यासाठी त्याचा उपयोग करीत असतो.संशोधन कार्य करीत असताना ते मूलतः आपले संशोधन असावे असे जरी असले तरी आजच्या या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संशोधन कार्यात अगोदर झालेल्या संशोधनाचा वापर करून त्याचा संदर्भ न देता सर्रास चोरी केली जात आहे. या वाङ्मयीन चौर्याच्या प्रकारामुळे संशोधनाचा मूळ उद्देश बाजूला पडून नुसत्या भानगडीचे संशोधन असा पायंडा पडत चालल्याचे दिसून आले आहे. या वाङ्मयीन चौर्याला इंग्रजीमध्ये 'Plagarism' असे म्हटले जाते.

Plagiarism- वाङ्मय चौर्य म्हणजे काय ?

व्याख्या :-ग्रंथालयातील साधनांतून अथवा विविध प्रसार माध्यमातून किंवा माहितीच्या अन्य साधनांतून माहिती घेणे व ती आपल्या नावाने प्रसिध्द करणे, ती आपलीच आहे म्हणणे व घेतलेल्या माहितीचा, मूळ माहिती संदर्भाचा उल्लेख न करणे यालाच वाङ्मय चौर्य किंवा इंग्रजीमध्ये 'Plagiarism' असे म्हणतात.

शब्दकोशानुसार व्याख्या :-एखाद्या लेखकाच्या लेखातील, संशोधकाच्या लेखातील भाषा, विचार, कल्पना, शब्द व शब्दसमुह यांचा विनियोग गैरप्रकाराने करणे अथवा चोरून घेणे व अनुकरण, नक्कल करणे व ते आपलेच मूळ लेखन आहे असे म्हणणे म्हणजे वाङ्मय चौर्य होय.

पहिल्या शतकात लॅटिन शब्द 'Plagiarism' याला literallykidnapper असा शब्द वापरला गेला.रोमन कवि मार्शल याने आपली कविता, कवितेच्या ओळी दुस-या कविने किडनॅप केल्या आहेत अशी तक्रार केली होती.आधुनिक काळात वाङ्मय चौर्याची संकल्पना अनीतीची, दुर्व्यसनी अशी मानली जाते.

Plagiarism is defined in dictionaries as the 'Wrongful appropriation', 'close imitation' or 'purloining and publication' of another author's, language, thoughts, ideas or expressions and the representation of them as one's own original work.

वाङ्मय चौर्य कोणाकडून होते ?

शैक्षणिक क्षेत्र :-शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, संशोधक यांच्याकडून घडले जाऊ शकते. मूळ लेखकाच्या अथवा संशोधकाच्या संशोधनातील, लेखातील उतारे घेणे, वाक्य घेणे किंबहूना जसेच्या तसे हुबेहुब लेखाची नक्कल करणे व आपले संशोधन कार्य अथवा माहिती पूर्ण करणे इ. प्रकारांनी चौर्य केले जाते. याला वाङ्मयीन चौर्य म्हटले जाते. मूळ लेखकाच्या लेखनाचा उल्लेखही केला जात नाही.उदा. एखाद्या संशोधकास एम्. फिल. वा पीएच्. डी. करण्याकरीता संदर्भाकरीता निवडलेल्या साधनात त्याच्या विषयाशी साम्य असणारी माहिती मिळाली की ती जशीच्या तशी आपल्या संशोधनासाठी घेणे व त्याचा उल्लेख सायटेशनमध्ये न करणे.

विद्यार्थी :-लहानपणापासून काही विद्यार्थी मुख्यतः परीक्षेच्या कालावधीत एकमेकांच्या उत्तरपत्रिकेत डोकावून पाहतात व आपली उत्तरे लिहित असतात. याकरिता एखादा मुद्दा जरी मिळाला तरी त्यावरून आपली उत्तरे सोडविता येतात.

तसेच कॉपी करण्याचे प्रकार सर्रास घडताना दिसतात. कागदावर मुद्दे लिहून घेणे, पुस्तकातील पाने फाडून जवळ ठेवणे, गाईडमधील उत्तरांची कागदावर मांडणीकरून आणणे व परीक्षेच्या कालावधीत पर्यवेक्षकांची नजर चुकवून उत्तरपत्रिकेत उत्तरे सोडविणे इ. प्रकारांनी चौर्य केले जाते.तर काही विद्यार्थ्यांना चांगली ग्रेड, टक्केवारी मिळविण्यासाठी चौर्य करावेसे वाटते.



Scanned by CamScanner

व्यक्तिगत चौर्य :-संशोधक अथवा लेखक स्वतःचा लेख अथवा माहिती परत प्रकाशित अथवा पुर्नमुद्रित करीत असताना मूळ लेखाचा संदर्भ न देता लेखन जसेच्या तसे प्रकाशित करीत असतात त्याला व्यक्तिगत वाङ्मय चौर्य म्हणता येइल.त्यामुळे प्रत्येक लेखकाने, संशोधकाने लेखाची, पुस्तकाची पुर्नमुद्रण वा दुसरी आवृत्ती काढावयाची झाल्यास मुळ आवृत्तीची तारीख किंवा प्रकाशन दिनांक दुस-या आवृत्तीत देणे महत्वाचे असते.

पत्रकारिता क्षेत्रातील चौर्य :-पत्रकार आपल्या दैनंदिन जीवनामध्ये नवीन माहिती वा बातमी मिळविण्याच्या उद्देशाने इतर पत्रकारांनी मिळविलेल्या माहितीचा आधार घेवून ती बातमी आपल्या चॅनलवर, वर्तमानपत्रात झळकविण्याचा प्रयत्न करीत असतात. तसेच काही प्रतिभावंतांच्या कविता पत्रकार आपल्या नावाने छापत असतात त्यामुळे या प्रकारालाही चौर्य म्हटले जाते.

इतिहास :-एखाद्या विषयाची ऐतिहासिक मांडणी करावयाची झाल्यास पारंपारिक पध्दतीतील लिखित नोंदी घ्याव्या लागतात म्हणजेच १६ व्या शतकातील सुरूवातीचा काळ त्यातील ठळक महत्त्वाच्या नोंदी घ्यावयाच्या झाल्यास ज्या मूळे संदर्भातील त्या नोंदी आहेत त्याचा उल्लेख करणे गरजेचे असते. तशा नोंदीचा संदर्भ न दिल्यास ते वाङ्मय चौर्य ठरते.

इंटरनेट :- इंटरनेट हे माध्यम माहितीचा शोध घेण्याचे प्रभावी प्रसारमाध्यम आहे. या माध्यमातून माहितीची कॉपी करणे, डाऊनलोड करणे इ. प्रकार होत असतात. मग सदरची माहिती फ्री असते म्हणून घेणे व आपल्या लेखात त्याचा समावेश करणे, ती आपलीच, आपल्याकडूनच निर्माण झालेली आहे असे दर्शविणे, मूळ माहितीचा संदर्भ न देणे इ. प्रकार हे चौर्य म्हटले जातात.

वाङ्मय चौर्य करण्यामागचे उद्देश :-वाङ्मयाची चोरी का केली जाते व कशासाठी केली जाते हे पाहणे गरजेचे वाटते.

सवय :-सध्याच्या स्पर्धेच्या युगात काही विघातक प्रवृत्तींना चोरून, दुस-याचे पाहून, थोडाफार बदल करून माहिती, लेख, संशोधन करण्यात आनंद वाटत असतो त्यांना अशा प्रकारची सवयच लागलेली असते. सवयीचा परिणाम म्हणून वारंवार अशा प्रकारचे कार्य त्यांच्याकडून होत असते.

तयार माहिती :-मूळ संशोधकाच्या संशोधनातील माहिती कोणतेही कष्ट न करता, काहीही शोध न घेता तयार मिळत असते. त्यामुळे संदर्भ सांधनांचा वापर न करता अशाप्रकारच्या तयार माहितीची निवड केली जाते व आपले संशोधन कार्य पूर्ण केले जाते. अशाप्रकारच्या घेण्यात येणा-या माहितीला चौर्य म्हटले जाते. कारण मूळ संशोधनाचा उल्लेख न देता हे संशोधन कार्य केलेले असते.

ज्ञान संपादन करण्याच्या घाईपोटी :-सर्वात प्रथम संशोधन आपणाकडून व्हावे, तसेच इतरांना ते ज्ञान, माहिती मिळू नये. म्हणून संशोधन पुस्तिका, प्रबंध, इंटरनेटवरून मिळविलेली माहिती, काही संदर्भसाधनातून मिळवलेली माहिती ही पहिल्यांदा आपल्या संशोधनात यावी म्हणून वाङ्मय चौर्य करून माहितीचा वापर आपल्या संशोधनात, लेखात केला जाणे म्हणजेच चौर्य करणे होय.

चौर्य प्रतिबंधक कायदे :-मूळ लेखातून, संदर्भ साधनातून, तसेच तंत्रज्ञानातील विशिष्ट प्रकारे केल्या जाणा-या चौर्याकरिता प्रतिबंधात्मक कायदे अस्तित्वात आहेत.

१) ट्रेडमार्क ॲक्ट :-स्दर कायद्याअंतर्गत कंपन्या आपल्या वस्तूंना बाजारातील पत राखता यावी म्हणून ठराविक मोनोग्राम अथवा लोगो वापरून विक्री करीत असतात व कायद्याअंतर्गत त्याचे रजिस्टर करून घेतात जेणेकरून त्यांचा ट्रेडमार्क इतर कंपन्या वापरू शकत नाहीत.

२) पेटंट ॲक्ट :-एखादा संशोधक त्याने निर्माण केलेली कला अथवा शोध हा सर्वस्वी त्याचा असतो त्यामुळे त्या शोधाची विक्री करणे, वा ती वस्तू पुरःश्च उत्पादित करण्याचा हक्क त्याला असतो त्या वस्तूची अथवा कलेची नक्कल इतर कुणी करू नये यासाठी त्याचे पेटंट करावे लागते.उदा. ॲपल आणि सॅमसंग या कंपन्यांचे घेता येईल. सॅमसंग या कंपनीच्या एका उत्पादनाची चोरी केल्याचा दावा ॲपलवर केला व त्यासाठी काही कोटी रूपयांचा दंड त्यांच्यावर लादला.

३) कॉपीराईट ॲक्ट :-वशिष्ट कृतीची, गोष्टींची निर्मिती अथवा पुननिर्मिती करणे, भाषांतर करणे, नाट्यकृतींची कादंबरी करणे तसेच एखाद्या नाटकाचे प्रयोग करणे इ. विषयीचा कायदा.या कायद्यांतर्गत वरील सर्व प्रकारांना संरक्षण मिळत असते.

सॉफ्टवेअर :-वाङ्मय चौर्य झालेले आहे की नाही हे तपासण्याकरिता काही सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. सदर सॉफ्टवेअरद्वारे संशोधकांनी त्याच्या संशोधन केलेल्या कार्यात चौर्य केलेले आहे की नाही हे तपासले जाते. जर सदर संशोधनात चौर्य केलेले आढळल्यास तो परिच्छेद अथवा ओळींना, वाक्यांना, एका वेगळया रंगाने दर्शविले जाते.

अशा प्रकारची सॉफ्टवेअर्स बाजारात उपलब्ध आहेत. काही कंपन्या अशा प्रकारची सेवा विनामुल्य देतात. सॉफ्टवेअरची नावे खालील प्रमाणे -

१) Duplicheckar, Free Software
२) Viper,The Anti plagiarism
३) शोधगंगा सदरचे सॉफ्टवेअर विद्यापीठांनी अंगीकारले असून या अंतर्गत संशोधकांनी विद्यापीठाकडे प्रबंध सादर केल्यानंतर ते तपासणीकरीता (वाङ्मय चौर्याची) शोधगंगाकडे पाठविले जाते.वाङ्मयीन चौर्य टाळण्याकरीता उपाय :-

माहितीच्या साधनांतून अथवा विविध संशोधन साहित्यामधून चौर्य होवू नये किंवा चौर्यापासून अलिप्त राहण्यासाठी उपाय.

१) लेखन साहित्य तयार करताना त्याबद्दल खात्री बाळगणे.
२) दुस-यांच्या लेखनातील कल्पनेपासून अलिप्त राहणे.
३) ग्रंथपालाबरोबर चर्चा करणे, ग्रंथालयीन कार्यशाळांना उपस्थित राहणे.
४) माहितीच्या महाजाळयातील ई-कागद कारखान्यातून सावध राहणे.
५) मूळ लेखनाचा संदर्भ घेतल्यास त्याचा उल्लेख करणे.
६) लिखित साहित्य, माहिती नाविन्यपूर्ण आहे हे पटवून देणे.
७) अस्तित्वात असणा-या कायद्यांचे पालन करणे.

अनुमान :-म्हणजेच काय ज्या साधनांचा वापर संदर्भासाठी केला आहे तो संदर्भासाठीच वापरणे त्यातून नाविन्यपूर्ण संशोधन निर्माण करणे, चौर्य करणा-यांना चौर्यापासून परावृत्त करून ज्ञानाच्या मूळ प्रवाहात आणणे तसेच प्रबोधन करून त्यांच्यात जागरूकता आणणे हा या लेखाचा मूळ उद्देश आहे.

संदर्भ :-

१) Wikipedia - www.wikipedia
२) शोधगंगा -www.shodhganga.com



Scanned by CamScanner

# महाविद्यालयीन युवकांचे व्यसन- एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. संजय संदे** , सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, रहिमतपूर ता. कोरेगाव जि. सातारा.

आजच्या आधुनिक भारतात शिक्षिताचे उच्चशिक्षितांचे प्रमाण वाढले. वाढत्या शिक्षणाबरोबरच काही सुसंस्कृत तरूणास निर्माण होत आहेत. हि अभिमानाची गोष्ट आहेच पण काही युवक धुम्रपान, मद्यपान, जूगार अवैद्यधंदे अशा व्यसनात आडकलेले आहेत. त्या युवकांची संख्या वाढते आहे. सुसंस्कृत तरूणापेक्षा व्यसनाधिन तरूणांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचालकरणाऱ्यांची संख्या दररोज वाढते आहे. ही बाब किरकोळ वाटत असली तरी समाजव्यवस्था, व समाज नियंत्रणव्यवस्था पोखरून टाकणारी गंभीर बाब आहे. या व्यसनाधिनतेत अडकलेल्या तरूणांचा नाश होतोच शिवाय नव्या समस्या आव्हानात्मक निर्माण होतात. याचे गांभिर्य ओळखून महाविद्यालयातील तरूणाचा व्यवसनाधिनेकडे ओढा वाढतो आहे. याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास प्रस्तूत शोध निबंधाद्वारे केला आहे.

**उद्दिष्ये-** १.महाविद्यालयीन तरूणामधील व्यवसनाधिनता कोणत्या प्रकारची आहे याचा शोध घेणे. २.कला, वाणिज्य, शास्त्र, इंजिनिअरिंग व वैद्यकीयशाखेतील तरूणांच्या व्यसनाचेप्रमाण शोधणे. ३.कोणत्या प्रकारचे व्यसन अधिकप्रमाणात तरूणांमध्ये वाढते आहे याची माहिती घेणे.

**गृहितके** १.महाविद्यालयीन तरूणामध्ये व्यसनाचे आकर्षण वाढले आहे. २.इंजिनिअरिंग व वैद्यकीय शाखेतील तरूण अधिकप्रमाणात धुम्रपान करतात. ३.कला व वाणिज्य शाखेतील तरूण तंबाखूजन्य पदार्थाचे व्यवसनाधिन अधिक

**संशोधन पध्दती-**

**१.नमुना निवड** - शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी सातारा जिल्हयातील कला, वाणिज्यशास्त्र व इंजि. व वैद्यकीय महाविद्यालयापैकी ०५ महाविद्यालयातील प्रत्येकी ११ विद्यार्थी असे एकूण ११० विद्यार्थ्यांची सहेतूक नमूना निवड पध्दतीने नमुना निवड केली आहे. निवड केलेल्या विद्यार्थ्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेऊन माहितीचे संकलीत करण्यात आली आहे. यामध्ये त्याच्याकृतीचे निरीक्षण करण्यात आले आहे. दुय्यम स्तोतामध्ये विविधप्रकारचे ग्रंथ, मासिके, पाक्षिके, वर्तमानपत्र इ. मधून माहितीचे संकलीत केली आहे.

**२.माहितीचे विश्लेषण-** आजच्या महाविद्यालयात तरूणांमध्ये संस्कृतपणा ही आहे. पण विविध मनोरंजनाची साधने, चित्रपट, टिव्हीवरील विविध मालिका, कादंबरी यामध्ये नायक हा कोणते ना कोणते तरी व्यसन करतो व तो मुलावर प्रभाव पाडतो. किंबहुना श्रीमंतीचे लक्षण, आवडत्या हिरोचे आकर्षण व त्याने केलेली व्यवसनाधिनतेची भूमिका किंवा समाजातील काही राजकीयनेते, त्याच्या वागण्याच्यापध्दती ह्या घटकांचा तरूणांच्या मनावर पटकन प्रभाव पडतो, तरूणांनाही वाटते आपणाला रूबाबदार पण राहण्यासाठी व इतरावर प्रभाव पाडण्यासाठी मद्यपान, धुम्रपान असे कोणतेतरी व्यसन केले पाहिजे या भावनेतून तरी काही मुले अधिक प्रमाणात अभ्यास करण्यासाठी जादा जागरण व्हावे म्हणून सहजपणे व्यवसनाच्या आहारी जातात परिणामी अनेक गंभीर परिणाम दिसून येत आहेत.

**महाविद्यालयीन तरूणामध्ये कोणकोणत्या प्रकारचे व्यसन केले जाते-** महाविद्यालयातील काही तरून कोणत्या ना कोणत्या व्यसनाच्या आहारी गेलेचे दिसून येते. यामध्ये तंबाखू, गुटका, सिगारेट, दारू, गांजा, नाशा येणाऱ्या गोळ्या, आशा प्रकारचे व्यसन करणारे तरूण ग्रामीण व शहरी महाविद्यालयात आढळून येतात. नमूना निवड यांच्याकडून मिळवलेल्या माहिती पुढीलप्रमाणे - सारणी क्र. १

| अ.क्र. | व्यसनाचे प्रकार | | % |
|---|---|---|---|
| १. | तंबाखू | १२ | २१.८२ |
| २. | गुटका | १७ | ३०.९१ |
| ३. | सिगारेट | १४ | २५.४५ |
| ४. | दारू | १० | १८.१८ |
| ५. | गांजा | -- | |
| ६. | नशाकारक गोळ्या | ०२ | ३.६४ |
| | | ५५ | १०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, शहरातील ग्रामीण महाविद्यालयातील ग्रामीण भागात ही २२ टक्के तरूण तंबाखू व्यसन करतात. ३० टक्के तरूण गुटका, किंबहुना मावा सेवन करतात. २५.४५ टक्के तरूण सिगारेट ओढतात तर १८ टक्के तरूण मद्यपान करतात यामध्ये बिअर, व्हीस्की, रम, याचा समावेश होतो तर ३ टक्के तरून नशा येणाऱ्या मॅडरेक्ससारख्या गोळ्या बाजारात सहज उपलब्ध आहे ह्या घेऊन नशापान करतात.

**एकाच वेळी अनेक व्यसन असणारे** :काही तरूणांना तंबाखू काही तरूणांना तंबाखू/ गुटखा/ सिगारेट/ दारू अशी दोन तीन व्यसन आहेत त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे-सारणी क्र. - २

| अ.क्र. | व्यसनाचे प्रकार | उत्तरदात्याची संख्या | टक्के |
|---|---|---|---|
| १. | तंबाखू/गुटका/ दारू | २७ | ४९.०० |
| २. | सिगारेट/दारू/गुटका | २४ | ४३.६३ |
| ३. | फक्त तंबाखु/फक्त गुटका | ०४ | ७.३७ |
| | | | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयातील ४९ महाविद्यालयातील काही युवक एकाच वेळी तीन प्रकारची व्यसने करतात. तंबाखु, गुटका, दारू, असे विविध व्यसन करणाऱ्या युवकांची संख्या ४९% आहे. तर सिगारेट, दारू, गुटका, मावा, सेवन करणाऱ्या युवकांचे प्रमाण- ४३. ६३ % आहे. तसेच फक्त तंबाखू किंवा गुटका, मावा याचे सेवन करणाऱ्या युवकांचे शेकडा प्रमाण ७.३७% आहे.

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते कि दिवसे-दिवस ग्रामीण शहरी भागातील युवकांचे व्यवसनाचे प्रमाण वाढले आहे.



Scanned by CamScanner

सारणी क्र. ३

| अ.क्र. | व्यसनाचे स्वरूप | उत्तरदाते | टक्के |
|---|---|---|---|
| १. | तंबाखू/गुटका, | १६ | २९.०९ |
| २. | सिगारेट/दारू | ०९ | १६.३७ |
| ३. | तंबाखू/दारू | १३ | २३.६३ |
| ४. | गुटका/दारू | १७ | ३०.९१ |
| | | ५५ | ३०.९१ |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, महाविद्यालयातील २९.०९ टक्के तरूणांना तंबाखु व गुटखा दोन्ही सेवन करण्याची सवय आहे. तर सिगारेट व मद्यपान यामध्ये बिअर, रम, विस्की अशा नावाने परिचित असणारे मद्य घेणाऱ्यांचे शेकडा प्रमाण १६.३७ टक्के आहे. तर तंबाखू सेवन व दारू पिणाऱ्याचे प्रमाण शेकडा २३.६३ टक्के आहे व गुटका व दारू पिणाऱ्यांचे प्रमाण ३०.९१ टक्के आहे. वरील माहितीचा विचार करता सिगारेट, तंबाखू, गुटखा सेवन व दारू पिणाऱ्या युवकांचे शेकडा प्रमाण ७०.९०% आहे ही परिस्थितीत अत्यंत गंभिर बनत चाललेचे लक्षण आहे.

**मटका, जुगार, लॉटरीचे व्यसनाधिन**–झटपट व विना कष्टाचे पैसे मिळावेत अशा भावनेतून आजचा युवक हा मटका, जुगार, व लॉटरी काढणे. अशा व्यसनात अडकलेला दिसून येतो त्यामुळे कर्तव्यापेक्षा नशिब आजमावण्यात आपला वेळ वाया घालवतो आहे. मटका, जुगार, लॉटरी यामार्गात पैसे मिळविण्यासाठी वेगवेगळया क्लुप्त्या वापरून आपल्या कुटुंबात पैसे उकळतात जेव्हा वारोवार मटका, जुगार, लॉटरी यामध्ये अपयश येते अशा वेळी तंबाखू, गुटखा, मद्यपान अशा व्यसनात अडकतात अशा युवकाची आजची स्थिती पाहणे अभ्यासाच्या दृष्टिने महत्वाची वाटते.

**सारणी क्र. –०४**

| अ.क्र. | व्यसनाचे स्वरूप | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मटका | १३ | २३.६३ |
| २. | जुगार | ११ | २०.०० |
| ३. | लॉटरी | १० | १८.१८ |
| ४. | कधी–कधी मटका | ०६ | १०.९१ |
| ५. | कधी–कधी लॉटरी | ०३ | ५.४६ |
| ६. | कधी–कधी जूगार | ०४ | ७.२७ |
| ७. | प्रतिसाथ नारी | ०८ | १४.५५ |
| | एकूण | ५५ | १०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, २३.६३ महाविद्यालयीन युवक मटका खेळतात २० टक्के युवक जूगार खेळतात तर १८.१८ टक्के युवक लॉटरी खरेदी करतात तर काही युवक कधी–कधी मटका, जूगार, लॉटरी खेळणाऱ्यांचे शेकडा प्रमाण आहे. २३.६४ टक्के आहे.

वरील सारणीवरून असे दिसून येते की, दैनंदिन जीवनात आजचा युवक हा मटका/जूगार, लॉटरी हया झटपट पैसे मिळविण्याच्या फसव्या जाळ्यात आडकलेले तरूणांचे शेकडा प्रमाण –६१.८१ टक्के आहे. आजच्या युवकांच्या भवितव्याच्या दृष्टिने गंभिरबाब आहे. यापैकी कधी–कधी मटका, जूगार, लॉटरी खेळणा–यांचे शेकडा प्रमाण–२३.६४ टक्के आहे उद्या या ही युवकांची भरती मटका, जूगार, लॉटरी दैनंदिन खेळणा–यामध्ये होऊ शकते. ही शक्यता नकारता येत नाही.

**व्यसनाधिन होण्याची कारणे–**

महाविद्यालयात तरूणांनी प्रवेश केल्यावर विविध विषयाचे शिक्षक/प्राध्यापक अनेक माध्यमाने विद्यार्थ्यांवर सूसंस्कार करत असतात पण विद्यार्थी बाहयदेखावा, सिनेमा, नाटक, कादंबरी, सहकारी मित्र, अथवा समाजातील प्रतिष्ठित गुंड लोक यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव त्यांच्या मनावर पटकन पडतो परिणामी काही युवक व्यसनाधिन बनतात. व्यसनांच्या कारणांचा शोध घेताना काही कारणे दिसून आली त्याचे प्रमाण खालील प्रमाणे

**व्यसनाधिन होण्याची कारणे दर्शविणारी सारणी–**

**सारणी क्र.– ०५**

| अ.क्र. | व्यसनाची कारणे | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | सिनेमा | ३७ | ३३.६४ |
| २. | नाटक | ११ | १०.०० |
| ३. | सहकारी मित्रसमूह | २७ | २४.५५ |
| ४. | समाजातील प्रतिष्ठीतांची राहणीमान | ०९ | ८.१८ |
| ५. | समाजातील गुंडाचे राहणीमान | १२ | १०.९० |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | कादंबरी किंवा ताण/तणाव | ०४ | ३.६४ |
| ७. | सांगता येत नाही | १० | ०.०९ |
| | | ११० | १०० |

वरील सारणीवरून असे दिसून येते की व्यसन मग ते कोणतेही असो हे व्यसन जडण्यास कोणते ना कोणते कारण असतेच त्यातील काही प्रमुख कारणांचा आढावा घेतला. असे लक्षात येते की ३३.६४ टक्के युवक हे सिनेमातील हिरो किंबहुना खलनायक यांच्या भूमिकेचे आकर्षण बनून व्यसनाधिन झाले आहेत. अनुक्रमांक २ नुसार १० टक्के युवक नाटक पाहून नाटकातील कलाकाराच्या भूमिकेचे आकर्षण वाढल्याने व्यसनात अडकलेले आहेत अनुक्रमांक तीननुसार २४.५५ टक्के युवक सहकारी मित्र व्यसन करतात त्यांच्या सहवासात अदिक काळ घालवल्याने व्यसनाधिन झालेले आहेत अनुक्रमांक चार नुसार ८.१८ टक्के युवक समाजातील राजकारणी व राजकारणाशी संबधित युवकांचे राहणीमान त्याचे व्यसन व सतत त्यांच्या सहवासात राहणे त्याचे बोलणे, वागणे यांचे अनुकरण करण्यामुळे व्यवसनाधिन झाले आहेत. अनुक्रमांक १०.९० टक्के युवक समाजातील काही गुंड, दादागिरी करणारे युवक त्यांचे व्यसन राहणीमान यांच्या प्रभावाला बळी पडून युवक व्यसनाधिन झाले आहेत अनुक्रमांक सहानुसार ३.६४ टक्के युवक कादंबरीतील नायक त्याच्या सवयीचे अनुकरण करण्यामुळे व्यवसनाधिन झाले आहेत. तर ९.०९ टक्के युवक हे कशामुळे व्यसनाधिन झाले आहेत हे सांगता येत नाही असे उत्तर मिळते.

वरील स्पष्टीकरणावरून असे दिसून येते की सिनेमा व सहकारी मित्रांचा समूह यांच्या प्रभावामुळे जवळ-जवळ ५८.१९ टक्के युवक व्यवसनाधिन बनले आहेत. तर सर्वात कमी जे कादंबरी वाचन्यामुळे व्यसनाधिन बनलेले आहेत या व्यसनामध्ये युवकांची संख्या दिवसे दिवस वाढू लागली तर अनेक रोग ग्रस्त युवकांची पिढीच निर्माण होईल तेव्हा व्यसनांचा नायनाट करणे आव्हानात्मक ठरेल सुदृढ, सक्षम, आरोग्य संपन्न पिढी पहायला मिळणे कठिण जाईल.

**काही उपाययोजना–**

१. सिनेमा गृहात व्यसनाचे दुष्परिणाम वारोवार प्रक्षेपण करणे.
२. सिनेमातील कोणत्याही कलाकाराला कोणत्याही प्रकारचे व्यसन करतो आहे असे न दाखवणे.
३. मद्यपान उत्पादन मर्यादित व वैद्यकीय इशा-याशिवाय घेण्यास बंदी आणावी.
४. आपला मित्र कसा आहे त्या नको असलेल्या सवयी स्विकारू नयेत.
५. समाजातील राजकीय/प्रतिष्ठित लोकांनी व्यसन मुक्त होऊन आदर्श समाजापुढे ठेवावा.
६. बिअर शॉपी व दारूविक्रीची दुकाने बंद करावीत.
७. समाजीतील गुंड प्रवृत्तीचे तसेच दादागिरी करणा-या लोकांचा सहवास टाळावा.
८. व्यसनाचे दुष्परिणाम परिणाम हे इयत्ता ५ वी पासून सक्तीचे अभ्यासक्रमात एक प्रकरण असावे.
९. व्यसनमुक्तीचे कार्य करणा-या व्यक्तींना सरकानी वर्षाला किमान २००,००० अनुदान द्यावे.
१०. व्यसनमुक्तीचे कार्यक्रम मनोरंजनाच्या माध्यमातून घडवून आणण्यासाठी शासनाने खर्च करावा.
११. दारू/सिगारेट/तंबाखू यांच्या उत्पादनावर मर्यादा आणाव्यात किंबहुना बंदी आणावी.
१२. व्यसनमुक्त गाव योजना जाहिर करावी.
१३. व्यसनमुक्त व्यक्तीचा सत्कार व त्याला रोजगार मिळवून द्यावा.

**सारांश –**

मध्यपान, धुम्रपान गस्त युवक ही सर्व जगाला भेडसावणारी समस्या आहे. म्हणून त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सर्वांनी या समस्येकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. या व्यसनाबाबत कडक धोरण शासन राबवत आहे पण या व्यसनावर मर्यादा राखण्याची जबाबदारी आम्हा सर्वांवरच आहे यासाठी व्यसनाचे निर्मूलन करणे ही काळाची गरज होऊ बसली आहे.

समाजातील रूढी व परंपरातील बदल करणे, अनिष्ठ प्रथा व अज्ञानाचे उच्चाटन जंगलवाद, उपभोगाला अतिरिक्त दिलेले महत्व कमी करणे. राहणीमान सुधारणे, निरोगी आरोग्य व सक्षम शरिर याचे महत्व युवकांच्यावर बिंबवणे व युवकांचे मन वाचन, व्यायाम, खेळ, क्रिडा यामध्ये गुंतवणे याची ही जबाबदार प्रत्येक नागरीकाची आहे याची जाणिव झाली पाहिजे मद्यपान, धुम्रपान, या व्यसनाचे निर्मुलन होणेसाठी या व्यसनांचे परिणामाबदल समाजात जागृती होणे गरजेचे आहे. प्रसारमाध्यमे, स्वयंसेवी संस्था, सांस्कृतिक मंडळे, शिक्षण संस्था या सर्वांनी जाणिव जागृती मोहिमेत आपला वाटा उचलणे महत्वाचे आहे.

**संदर्भसाहित्य –**


१. Madan G. R. – mdian social problems: social Disorganization & Reconstruction voi.1 page no. – 22
२. Ram Ahuja – Social problems in India p.p.64
३. डॉ. शोभना तीर्थस्थळी – सामाजिक समस्यांची पार्श्वभूमी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे– पान नं. ३५
४. G.R. Madan- Indian Social Problems (vaeme-z) Allied Publishers, New Delhi
५. G.R. Madan- Indian of Tomorrow Problems of social Reconstruction after fifth year of Independence Allied publiohers, New Delhil




Scanned by CamScanner

ISSN 2277-8063
Navjyot / Vol. IV / Issue – IV

# यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयकविचार

डॉ. पी .एम.माने, सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र अधिविभाग.शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर.

**प्रस्तावणा** : १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीपासून यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीस सुरूवात केली. वयाच्या ९ व्या वर्षापासून यशवंतरावांचा देशातील राजकीय घडामोडींशी संबंध आला. त्यांच्या शालेय जीवनापासून ते त्यांच्या आकस्मिक निधनापर्यंत ते एक कृतिशील लोकशाहीवादी राजकारणी म्हणून राहिले. महाराष्टाच्या आणि भारताच्या विस्तृत अशा राजकीय पटलावर त्यांनी संसदीय सचिवापासून ते देशाच्या उपपंतप्रधान पदापर्यंत अनेक महत्वाची पदे भूषविली. महाराष्ट्र राज्याला कुशल प्रशासनाचा पायंडा घालून दिला आहे. अतिशय मुरब्बी व कुशल प्रशासक होते. त्यांचा राजकीय व सामाजिक सावधगिरीचा, त्यांच्या शांत, संयमी व खंबीर नेतृत्वाचा लाभ महाराष्टाला व संपूर्ण देशाला मिळाला.

यशवंतराव चव्हाण द्विभाषिक मुंबई राज्याचे व महाराष्ट राज्याचे मुख्यमंत्री असतांना केलेली कार्ये, त्यांनी घेतलेले दूरदृष्टी निर्णयांनी मांडलेले विचार यामुळे आधुनिक महाराष्ट राज्याची पुनर्बांधणी झाली यशवंतरावांनी महाराष्ट्राचे नेतृत्व हाती घेतल्या नंतर सत्तेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणले. लोकशाही, धर्मनिरपेक्षता यावर त्यांची श्रध्दा होती. बहुजन समाजाच्या चौफेर विकासाचा विचार त्यांनी अंगीकारला होता. तर समाजवादाचे तत्वज्ञान त्यांनी आत्मसात करून समाजवादी समाजरचना निर्माण करणेचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपले विचार व कार्यांच्या माध्यमातून एक वेगळा ठसा निर्माण केला. यामुळेच महाराष्ट्र राज्य प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.गरिबांना शिक्षण घेताना किती अडचणी येतात याचा अनुभव त्यांना होता. ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांच्या मुलांना, दलित, उपेक्षित, वंचित अशा बहुजन समाजातील मुलांना शिक्षण घेणे परवडत नव्हते. यशवंतराव द्विभाषिकाचे मुख्यमंत्री झाल्यानंतर आर्थिकदृष्टया मागास वर्गासाठी मोफत शिक्षण देण्याची योजना त्यांनी मंजूर केली. यशवंतरावांनी महाराष्टामध्ये शिक्षण प्रसाराची प्रचंड चळवळ उभी केली.

**यशवंतरावांचे उच्च शिक्षण विषयक विचार :** महाविद्यालयीन व विद्यापीठीय उच्च शिक्षणाच्या बाबतीत यशवंतरावांचे विचार अत्यंत महत्वाचे आहेत. उच्च शिक्षणाची दारे त्यांनी बहुजन समाजाला खुली करून दिली. त्यावेळी प्रस्थापित बुध्दीवाद्यांकडून प्रचंड विरोध झाला. शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला. तेव्हा यशवंतराव या विषयी म्हणतात, ''ज्यांच्या अनेक पिढ्यांना शिक्षणाची दारे बंद होती अशा तरूण मुलामुलींना आपली परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने उच्च शिक्षण घ्यावेसे वाटले तर त्यात आक्षेपार्ह असे काहीच नाही. एवढेच नव्हे तर दूर दृष्टीने पाहिल्यास ज्ञानाच्या या प्रसारामुळे शिक्षणाच्या दर्जात सर्व बाजूंनी सुधारणा होणे अगदी शक्य होणार आहे. कारण जेवढे अधिक विद्यार्थी विद्यापीठात जातील, तेंवढ्या लायक विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी अधिक वाव मिळणार आहे. म्हणून शिक्षणाचा दर्जा सांभाळण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांनी त्याच कार्यावर आपले लक्ष केंद्रित केल्यास कालांतराने शिक्षणाचा दर्जा सुधारणे फारसे अवघड जाईल असे मला वाटत नाही.''[१] यशवंतराव आपले शिक्षणविषयक विचार पुढीलप्रमाणे स्पष्टकरतात, ''ज्ञानविज्ञानाच्या व्यासंगाने व प्रसादाने आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामर्थ्याने देशातील वातावरण बदलू शकते. समाजाचे संपूर्ण स्वरूप बदलू शकते याचा अनुभव आज अनेक प्रगत देशांत येत आहे. समाजवादी दृष्टीने समाजरचना करणाऱ्या देशांमध्ये तर हा अनुभव जरूर आला आहे. राजकीय दृष्टिकोणातून हा विचार मी आपल्यापुढे मांडीत नसून त्या विचारातून जी परिस्थिती निर्माण होते तिच्यासंबंधी मी बोलतो आहे. वैचारीक स्वातंत्र्यावर आधारलेला समाज यावा अशी आपली विचारधारा आहे. परंतु अशा प्रकारच्या स्वातंत्र्याचा विचार व आचार साम्यवादी देशातून अशक्य असतो असा एक समज आपल्या मध्ये आहे. प्रत्यक्षात मात्र आपणास आज निराळेच चित्र दिसू लागले आहे. ज्या ठिकाणी ही वैज्ञानिक व्यासंगाची लाट समाजातील घराघरापर्यंत जाऊन पोहोचली आहे, त्या समाजात एक प्रकारची नवी शक्ती निर्माण झाल्याचा आगळा अनुभव आज येतो आहे, त्या समाजाच्या वैचारिक स्वातंत्र्यावर शासनाकडून किंवा दुसऱ्या कोणत्याही शासकीय वा अशासकीय शक्तींकडून पडणारी बंधने, हे जे ज्ञानाचे स्वातंत्र्य निर्माण झाले आहे. त्यामुळे आपोआप ढिली होऊ लागली आहेत. इतके विलक्षण सामर्थ्य या ज्ञान विज्ञानाच्या प्रसारात आहे. आपल्याही देशात विद्यापीठांच्याद्वारे आपणास हे सामर्थ्य आता वाढवावयाचे आहे.''[२] ज्ञानविज्ञानाच्या सामर्थ्याने कोणत्याही देशाची प्रगती होते. आपल्या देशाच्या प्रगतीसाठी विद्यापीठांच्या स्थापनेद्वारे हे विज्ञानाचे सामर्थ्य वाढविले पाहिजे असे यशवंतरावांचे स्पष्ट मत होते. त्यादृष्टीने त्यांनी महाराष्ट्रामध्ये औरंगाबाद विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली आहे.यासंदर्भात पुढे ते म्हणतात, ''आज उच्च शिक्षणाचा जो प्रसार होत आहे. त्यामागे माझ्या मतें, देशांतील लोकशाहीच्या प्रसाराची प्रभावी शक्ति आहे. उच्च शिक्षणाचा लाभ जोपर्यंत फक्त मुठभर लोकांनाच मिळत होता तोंपर्यंत समाजजीवनाच्या निरनिराळया क्षेत्रांत पुढे येणाऱ्यांची संख्या अगदी अल्प असे. अशा परिस्थितीत या मूठभर लोकांची बौध्दिक वाढ खुंटल्यास सर्व समाजाचीच अधोगती होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणून निरक्षरता व अज्ञान यांत रूतून बसलेल्या लोकांच्या बुध्दीचा विकास घडवून आणून आणि त्यांच्या अंगच्या सुप्त गुणांचा पुरेपूर विकास होण्यासाठी त्यांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देऊन गुणवत्तेवर आधारलेले नेतृत्व आपण निर्माण करू शकू. तसे झाल्यास सामाजिक दर्जा, जात, कुळ यासारख्या गोष्टी हळूहळू मागे पडत जातील आणि परिणामी आपले सामाजिक जीवन अधिक निकोप व निर्मळ होईल यांत वाद नाही.''[३]



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

शिक्षणातून केवळ ज्ञानाची उपासना वा बुध्दीची जोपासनाच करून चालणार नाही. तर भावनांची प्रगल्भता आणि अंत:करणाचा मोठेपणा अंगी असणे आवश्यक आहे. कारण माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही. खरे सामर्थ्य निर्माण होत, खरी शक्ती वाढते आणि राष्ट्रे पहिल्या प्रतिची बनतात ती शेवटी बुध्दीच्या क्षेत्रात. ज्ञानाच्या क्षेत्रात निरलसपरणे अखंड सेवा करणारी जी माणसे असतात त्यांच्या कार्यामुळेच राष्ट्रे मोठी होतात. ज्ञानाच्या अखंड सेवेमधुन निर्माण होणारे जे सामर्थ्य आहे तेच खरे सामर्थ्य आहे.[४] देशातील लेखक विचारवंत, देशातील कलावंत शास्त्रज्ञ आणि संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे जे विचारधन आहे ते खरे म्हणजे समाजाचे फार मोठे धन आहे असे मी मानतो. ते असले म्हणजे वेग ओळखला जातो, समाज ओळखला जातो. समाजाचे जीवन प्रवाही राहते, चिरंतन राहते. समाज जिवंत रहातो तो त्याच्याजवळ असणाऱ्या सांस्कृतिक मुल्यांवर व विचारधनावर. त्यावरच समाज आणि देश जिवंत राहिलेले आहेत. वाढलेले आहेत, असा इतिहासाचा दाखला आहे.[५] यशवंतराव भाष्य करतात, ''या देशामध्ये आम्हांला एक प्रगत लोकशाही बांधावयाची आहे. प्रगत लोकशाहीचा घटक आहे माणूस,प्रत्येक स्त्री व पुरूष- मग तो शहरात राहणारा असो अथवा खेड्यात राहणारा असो, विद्यापीठाचा पदवीधर असो अगर पदवीधर नसो. त्याचे सामर्थ्य म्हणजे त्याच्या मनाचे सामर्थ्य, त्याच्या विचाराचे सामर्थ्य, त्याच्या अनुभवाचे सामर्थ्य आणि त्याच्या शीलाचे सामर्थ्य. हे सामर्थ्य जेणे करून वाढीस लागेल अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करून आपणांस आपली लोकशाही दृढमूल करावयाची आहे. ही आपली आजची मौलिक गरज आहे. हे सामर्थ्य देण्याची शक्ती शिक्षणात असते. म्हणून तर आपण शिक्षणाच्या पाठीमागे आहोत. अमूक एक पदवी मिळाल्याने अमूक एका क्षेत्रात यशस्वीरित्या प्रवेश मिळविता येतो, याच व्यापारी दृष्टिकोणातून केवळ आपण शिक्षणाकडे पाहता कामा नये . माणूस मनाने, विचाराने मुक्त व समर्थ कसा होईल, ही शिक्षणाची महत्वाची कसोटी व साध्य आपण मानले पाहिजे.''[६] यशवंतरावांच्या मते शिक्षणाने माणसाच्या मनाचे, विचाराचे शीलाचे व अनुभवाचे सामर्थ्य वाढले पाहिजे, जेणेकरून लोकशाही दृढमूल होईल. शिक्षणाकडे व्यापारी दृष्टीकोणातून न पाहता शिक्षणाने माणूस मनाने, विचाराने मुक्त व समर्थ कसा होईल हे पाहिले पाहिजे.

मराठवाडा विद्यापीठाच्या दिक्षांत समारंभामध्ये यशवंतराव आपले शैक्षणिक विचार पुढीलप्रमाणे मांडतात, '' विज्ञानाच्या क्षेत्रात क्रांतीकारक परिवर्तन घडत असतांना विश्वविद्यालयांतून होणाऱ्या विद्यादानाचे स्वरूप आहे तसेंच राहावे अशी अर्थातच कोणी अपेक्षा करणार नाही. निसर्गाची रहस्ये शोधून काढून त्यांचा आपल्या जीवनांत उपयोग करून घेणें, सुधारणेचा एक टप्पा गाठला कीं दुसरा टप्पा गाठण्यासाठी प्रयत्न करीत राहणे आणि अशा रीतींने सतत प्रगती करणे ही माणसाची उपजत प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीमुळेच आज प्रत्येक क्षेत्रात त्याने आघाडी मारली आहे. विद्यापीठे ही या प्रवृत्तींना चालना देणारी ज्ञानसत्रें असल्या कारणाने बदलत्या काळाबरोबर त्यांच्या स्वरूपात बदल होणे अपरिहार्यच नव्हे, तर आवश्यक आहे. या दृष्टीने विद्यापीठ हे ज्या भागांत वसले असेल त्या भागांतील परिस्थितीपासून ते तुटक वा अलग राहू शकणार नाही. तसे तें राहिलें तर त्याची उपयुक्तता अथवा परिणामकारकता संपुष्टात येईल. तेंव्हा विद्यापीठे ही त्यांच्या भोवतालच्या प्रदेशाशीं व परिस्थितीशी पूर्णपणे तादाम्य पावली पाहिजेत.''[७] विद्यापीठांनी स्वत:च्या कार्याचा सांधा सभोवतालच्या समाजाशी, विभागाशी आणि एकंदर परिस्थितीशी जोडून घेणे आवश्यक आहे. समोरची आव्हाने स्विकारून त्या-त्या भागातील विकास प्रक्रियेत विद्यापीठांनी सहभागी होणे आवश्यक आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आपापल्या विभागातील अडचणी व प्रश्न यांची दखल घेऊन ते सोडविण्याच्या कामी साहाय्य केले पाहिजे.विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी स्थानिक भागाच्या अडचणी व प्रश्नांची दखल घेऊन ते सोडविण्याच्या कामी सहाय्य केलें पाहिजे. याचा अर्थ संकुचित प्रादेशिक भावनांना उत्तेजन मिळावे असा मात्र नाही. कोणत्याही प्रदेशाचे हितसंबंध हे देशाच्या हितसंबंधाचा एक अविभाज्य भाग असतात आणि म्हणून नेहमी सर्व देशाच्या दृष्टींतूनच विचार केला पहिजे. ते पुढे विवेचन करतात,''भारताच्या या एकतेंतच आपले सामर्थ्य सामावलेंले आहे. ही एकता भंग पावली तर आपली अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही. हे सत्य सदैव नजरेसमोर ठेवून ते आचरणांत आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे . त्यांतच आपणां सर्वांचे व आपल्या देशांचे हित आहे.''[८]

**मातृभाषेतून शिक्षण विषयक विचार :**उच्च शिक्षणाची संधी समाजाच्या सर्वच थरांतील लोकांना मिळवून द्यावयाची असेल तर ते मातृभाषेतून दयावे लागेल, असा विचार यशवंतरावांनी स्पष्ट शब्दात अनेकदा मांडला होता. '' शिक्षण आम्हाला समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोहोचवावयाचे असेल तर ते परक्या भाषेतून तेथपर्यंत जाणार कसे ? ''[९] असा प्रश्न ते उपस्थित करतात. ज्ञानभाषा आणि लोकभाषा ही एकच असली पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. ज्ञानभाषा ही नेहमीसाठीच लोकभाषेपेक्षा भिन्न असेल तर बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहील, अशी भीती ते व्यक्त करत असत. यासंदर्भात यशवंतराव आपले विचार पुढील शब्दात सांगतात, ''भाषेचा विकास हा केवळ त्या भाषेतील ललित साहित्याच्या संदर्भातच होतो ही समजूत चुकीची आहे. निरनिराळ्या वैज्ञानिक शास्त्रांचा अविष्कार जेव्हा भाषा करू लागेल तेव्हाच तिचा खरा विकास झाला असे म्हणता येईल. तेव्हां साहित्यिकांबरोबरच शास्त्रज्ञ, इतिहासकार तत्ववेत्तेहे सर्वजण मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासास चालना देतील असा मला विश्वास वाटतो .''[१०] आपल्या ४६ व्या वाढदिवसादिवशी सांगलीमध्ये यशवंतराव महाराष्ट्रातील लेखकांना आव्हानात्मक विनंती करतांना आपले मत प्रांजळपणे मांडतात,'' नव्या महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचे काम आम्हांला करावयाचे आहे. जुने अमृतासारखे जे शब्द आहेत ते शब्द तर आम्हांला वापरायचे आहेतच, पण तुमच्या आमच्या जुन्या पिढीला माहीत नसणारे अमृतासारखे विचार अजून आपल्याला शोधून काढावयाचे आहेत. नवीन शास्त्रीय विचारांचा, शास्त्रीय ज्ञानाचा एक नवा इमला आपल्याला महाराष्ट्राच्या जीवनामध्ये उभारावयाचा आहे आणि या सगळया विचारांचे पोषण करणारे, त्यांना तोलणारे शब्द आणि भाषा तुम्हा-आम्हांला निर्माण करावयाची आहे.''[११] लेखकांनी आणि विचारवंतानी हे काम हाती घेण्याचे आवाहन त्यांनी केले होते. ज्ञान विज्ञानाचे



Scanned by CamScanner

मूलभूत संशोधन हाती घेण्याचा प्रयत्न ज्या भाषेत होतो तीच भाषा खऱ्या अर्थाने ज्ञानाची भाषा होऊ शकते. मुलभूत संशोधन, चिंतन आणि मुलभूत विचारनिर्मिती मराठीत होणे आवश्यक आहे.लोकभाषा हीच ज्ञानभाषा या विषयांवर विचार व्यक्त करतांना यशवंतराव ठामपणे सांगतात, ''उच्च शिक्षणाच्या प्रश्नामधून आज अनेक प्रश्न आपल्या देशामध्ये निर्माण झाले आहेत. त्यातल्याच एका प्रश्नाची हल्ली बरीच चर्चा सुरू आहे. उच्च शिक्षण हे मातृभाषेतून असावे की नसावे? असल्यास त्याची सुरूवात कोठून व्हावी? माझी स्वत:ची या प्रश्नासंबंधी काही ठाम मते आहेत. मी तीन भाषांचा,ज्याला थ्री लँग्वेज फॉर्म्युला म्हणतात त्याचा पुरस्कर्ता आहे. मातृभाषा, मातृभाषेच्या जोडीला हिंदी आणि हिंदीच्या जोडीला काही काळ तरी इंग्रजी हिंदुस्तानमध्ये राहणे आवश्यक आहे असे माझे मत आहे. मी इंग्रजी हटावोवाला नसून हिंदी पाहिजे म्हणणारा आहे. पण त्याच बरोबर मी हे ही सांगू इच्छितो की, आमच्या देशातील उच्च शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही असे माझे स्पष्ट मत आहे.''[१२] उच्च शिक्षण मातृभाषेतून दिले पाहिजे याला एक दुसरेही कारण आहे. ते कांहीसे ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. क्रांती होवून सामाजिक उलथापालथ करून एक प्रकारचे नवीन तऱ्हेचे जीवन बनले असे फारसे हिंदुस्तानात कधी घडलेले नाही. याचे खरे कारणअसे आहे की,''सामान्य माणसापर्यंत महत्वाचा विचार किंवा ज्ञान आम्ही कधी जावूच दिले नाही, ही माझी मुख्य तक्रार आहे. हा मुद्दा थोडक्यात सांगावयाचा झाला तर मी असे म्हणेण की, ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झालेशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही,विकसीत होत नाही. ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्तानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे. ऋषीमुनींची आणि पंडितांची ज्ञानभाषा होती संस्कृत. कारण ती देव भाषा होती आणि जनसामान्यांची भाषा होती प्राकृत, हे फार पूर्वी. पण नंतरही तेच झाले. मुसलमानी अमलात ज्ञानभाषा उर्दू, फारसी, अरबी जी काही असेल ती झाली. त्यांनतर इंग्रज आले आणि या देशातील ज्ञानभाषा इंग्रजी बनली. लोकभाषा अशा तऱ्हेने दुर्लक्षीत राहिल्यावर लोक शहाणे होणार तरी कसे? आता स्वातंत्र्यानंतर जेव्हा जनजीवन आम्हांला विकसित करावयाचे आहे असे आम्ही म्हणतो तेव्हांही लोकभाषा ज्ञानभाषा होणार नसेल तर ज्ञानभाषा हा ज्यांचा मक्ता होता त्यांचेच संस्कार आणि त्यांचेच साम्राज्य सांस्कृतिक जीवनामध्ये निर्माण होईल. ते होऊ देता कामा नये असे माझे स्वत:चे खंबीर मत आहे.''[१३] सामान्य माणसांपर्यंत ज्ञान व विचार पोहचण्यासाठी उच्च शिक्षणाची भाषा ही लोकभाषा असली पाहिजे असे यशवंतरावांचे मत होते. हिंदुस्थानमध्ये सामाजिक परिवर्तन झाले नाही याचे मूळ कारण हे लोकभाषा व ज्ञानभाषा या वेगवेगळया होत्या. यामुळे ठराविक वर्गाचे सांस्कृतिक जीवनामध्ये वर्चस्व निर्माण झाले. स्वातंत्र्यानंतर असे होऊ नये म्हणून यशवंतरावांनी उच्च शिक्षण मराठीतून देण्याची सोय केली. वाणिज्य,कला,विज्ञान,शेती, स्थापत्य यासारख्या अनेक विविध शास्त्रांचा अभ्यास करण्याची सोय सर्वांना उपलब्ध व्हावी म्हणून आपण आता महाविद्यालये काढतो आहोत. पण काही मंडळींचा असा आक्षेप आहे की, फार महाविद्यालये काढल्याने गुणवत्ता कमी होते आणि पुष्कळ मुले शिकून शहाणी झाली आणि त्यांना नोकऱ्या मिळाल्या नाहीत म्हणजे सुशिक्षीत बेकारांचा प्रश्न तयार होतो. त्यांना यात धोका दिसतो. पण धोका कोणत्या कामात नाही? आणि यांत धोका असलाच तर सुशिक्षीत बेकार व अशिक्षीत बेकार यामधला कुठला धोका अधिक मोठा? शिक्षणाने देशात बेकारीच निर्माण होणार असेल तर देशामध्ये सुशिक्षीत बेकार असणे अधिक चांगले असे म्हणेण. कारण सुशिक्षीत बेकार निदान विचार तरी करू शकेल. आपण बेकार का राहिलो याची तो कारणपरंपरा शोधील आणि ती दूर करण्याचा प्रयत्न करील. तेव्हा शिक्षणाने सुशिक्षित बेकारांचा धोका निर्माण होईल या शंकेत काही अर्थ नाही असे यशवंतराव म्हणतात. [१४] अशिक्षित बेकारीपेक्षा सुशिक्षित बेकारी जास्त धोकादायक नाही कारण सुशिक्षित बेकार विचार करू शकतो. त्यामुळे शिक्षणाच्या वाढीमुळे गुणवत्ता कमी होईल किंवा बेकारी निर्माण होईल ही टिका यशवंतरावांनी धुडकावून लावून महाविद्यालयीन व उच्च शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार आपल्या कारकीर्दीमध्ये केला.

उच्च शिक्षण हे संस्कृतिचे प्रवेशद्वार आहे यात शंका नाही. पण या प्रवेशद्वाराची किल्ली मात्र आता विज्ञानाच्या हातात गेली आहे हे आपल्याला विसरून चालणार नाही. यशवंतरावांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे महत्व जाणले होते. विकास आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेतला एक महत्वाचा घटक म्हणून विज्ञानाकडे पाहिले पाहिजे असे त्यांचे मत होते. म्हणून निरनिराळ्या शास्त्राचे ज्ञान मराठीत आले पाहिजे आणि मराठी भाषेचा उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून आपण स्विकार केला पाहिजे या गोष्टीवर त्यांचा भर होता. मराठी भाषेच्या विकासांवर त्यांनी खुप भर दिला होता. तिचा विकास करायचा असेल तर तिच्यात नवनवीन विचार आणावे लागतील, तिच्यातूनच 'विचार' करण्याचा प्रयत्न करावा लागेल. या संदर्भात ते आपला अभिप्राय पुढील शब्दात व्यक्त करतात,''खरे म्हणजे भाषा ही विचाराच्या पाठीमागे येत असते. भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे. संशोधनाच्या क्षेत्रात नवे विचार आणण्याचा प्रयत्न करणारी माणसे जस जशी निर्माण होतील, वाढतील तस तशी भाषा वाढत जाईल. नवे अनुभव आले, भाषा वाढली. नवे काम वाढले,भाषा वाढली. पहिल्याने मोटारीची कल्पना आली आणि त्या मोटारीबरोबरच किती तरी नवे शब्द आले. एक नवी परिभाषा आली. साखर कारखान्यांबरोबर कितीतरी नव्या कल्पना आल्या, नवीन जीवन आले. नवा विचार आला की भाषा नवे रंगरूप घेवून आपल्याशी येते आणि तो विचार व्यक्त करण्याच्या प्रयत्नात ती स्वत:च संपन्न होऊन जाते. भाषेचे स्वरूप हे असे आहे. तेव्हां भाषा ही सतत वाढत राहील, याबद्दल शंका नको.''[१५] यशवंतरावजींनी भाषाविकासाचे रहस्य किंवा सूत्रच आपल्याला सांगितलेले आहे. सर्वांगीण विकासाच्या कार्यातून भाषा विकसीत होते आणि भाषेच्या विकासातून सांस्कृतिक संपन्नता वाढते. या सर्व गोष्टीचे संक्रमण आणि संवर्धन उच्च शिक्षणातून व्हायला व्हावे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पहिला मुख्यमंत्री या नात्याने यशवंतरावजीनी महाराष्ट्राचा राज्यकारभार मराठीतून करावयाचे ठरविले. तर सबंध शिक्षण देखील मराठीतून देणे आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती आणि त्या दृष्टीने त्यांनी ठोस निर्णय घेतले. मराठी भाषा समृध्द, ती खऱ्या अर्थाने ज्ञानवाहिनी व्हावी म्हणून 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची' त्यांनी स्थापना केली. पूढे 'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ' आस्तित्वात आले. 'मराठी विश्व कोशाचे'



Scanned by CamScanner

ISSN 2277-8063

प्रचंड कार्यही त्यांच्याच प्रेरणेने व पुढाकाराने प्रारंभ करण्यात आले. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा अवलंब करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. निरनिराळया ज्ञानशाखा मराठीत आणाव्यात अशी त्यांनी भूमिका घेतली.''[१६] त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न करून मराठी भाशा समृध्द केली.

**सैनिकी शिक्षणाचे महत्व :** आजचे तरूण आणि सैनिक शिक्षण या विषयावर यशवंतराव आपले विचार पुढीलप्रमाणे मांडतात,''सैन्य हा जीवनाचा एक आवश्यक भाग झाला तरच एवढ्या विशाल देशाचे संरक्षण होऊ शकेल. म्हणून आम्ही शत्रूमध्ये धडक भरविणारी सामर्थ्यसंपन्न आधुनिक सेना उभारीत आहोत. तरूण विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनापासून सैनिकी शिक्षणाचे प्रशिक्षण मिळावे म्हणून भारत सरकारने १५ ऑगष्ट १९६३ पासून एन.सी.सी. चे शिक्षण अनिवार्य केले आहे. देशरक्षणाच्या शिक्षणाशिवाय विद्यार्थ्यांचे शिक्षण अपूर्ण आहे. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपणहून एन.सी.सी. चे शिक्षण घेण्यासाठी पूढे आले पाहिजे. एन.सी.सी. ही एक सैनिक योजना आहे. तसेच ती शिक्षणाची पूर्ति करणारी शैक्षणिक योजनाही आहे. हे शिक्षण सैनिक अधिकाऱ्याकडून दिले जाते म्हणून ती सैनिक योजना आहे. एन.सी.सी. च्या शिक्षणामुळे तरूणांमध्ये चारित्र्य, बंधुभाव, आदर्श, सेवावृत्ती व नेतेपणाची शक्ती यांची जोपासना व वाढ होते.''[१७] पुढे यशवंतराव प्रतिपादन करतात,''शत्रूशी सामना देण्यासाठी आपण आपला देश आर्थिक व वैज्ञानिक दृष्ट्या प्रबळ बनविला पाहिजे . देशांत नुसते मोठे सेनापती असून भागत नाही. तर शत्रूवर विजय मिळविण्याच्या कामी महान शास्त्रज्ञांची जरूरी असते. म्हणून शालेय जीवनात विद्यार्थ्याने आपले जास्त लक्ष वैज्ञानिक विषयांकडे दिले पाहिजे. त्या विषयांचा अभ्यास केला पाहिजे. युध्द केवळ रणांगणावर लढले जात नाहीं तर ते शेतात, कारखान्यांतहि लढवावे लागते. यासाठी कुशल तंत्रज्ञांची पण आवश्यकता आहे. समाजातील तरूणांचे मन व मनगट बळकट पाहिजे. ही सुध्दा लष्करी शिक्षणाची प्राथमिक गरज आहे. युवतींनाही देशाच्या संरक्षण कार्यात भाग घेता येईल. समाजातील क्षात्रधर्माची वृत्ती व निरंतर तयारीची ईर्षा जागृत ठेवण्याचे कार्य त्या गांवोगावी जाऊन कुशलतेने करूं शकतात . सैनिकांची सुश्रूषा करण्याची जबाबदारीही त्या सुलभतेने उचलू शकतात. या कार्यासाठी त्यांनी पुढे आले पाहिजे.''[१८] यशवंतरावांनी या ठिकाणी सैनिकी शिक्षणाचे महत्व सांगितले आहे. एन.सी.सी.च्या शिक्षणामुळे तरूणांमध्ये चारित्र्य, बंधुभाव, आदर्श व सेवावृत्ती तसेच नेतेपणाची शक्ती यांची जोपासना व वाढ होते. त्यामुळे एन.सी.सी.सी.चे शिक्षण प्रत्येक तरूणांना त्यांच्या शालेय जीवनामध्ये मिळाले पाहिजे. सैनिकी शिक्षणाबरोबर वैज्ञानिक शिक्षणाचे महत्व त्यांनी सांगितले आहे. त्याचबरोबर युवतींनीही एन.सी.सी.चे शिक्षण घेणे आवश्यक आहे. क्षात्रधर्माची वृत्ति जागृत ठेवण्यांचे कार्य त्या गांवोगावी करू शकतात असे यशवंतरावांचे मत आहे.आज देशात अनेक क्षेत्रे तरूण-तरूणींच्या कर्तृत्वाचे स्वागत करण्यास सिध्द आहेत. भारताचे संरक्षण करण्याची व स्वातंत्र्य चिरकाल टिकविण्याची जबाबदारी देशातील तरूण रक्तावर आहे. स्वत:चे रक्षण करू न शकणारा देश स्वाभिमानाने व स्वतंत्र कधीच राहू शकत नाही. म्हणून आपल्या कर्तृत्वाचा उपयोग प्रथम देश रक्षणासाठीच झाला पाहिजे

**शिक्षणासमोरील आव्हाने :** कराडमधील शिवाजी शिक्षण संस्थेच्या रौप्य महोत्सवामध्ये भाषण करताना यशवंतराव आपले विचार पुढील शब्दात व्यक्त करतात, ''आज सर्व देशामध्ये शिक्षणाचा पुनर्विचार करण्याची फार महत्वाची समस्या निर्माण झाली आहे यामध्ये शंका नाही. मला वाटतं आज देशातील जी काही महत्वाची प्रेरणा-समाजवादाची प्रेरणा घेऊन आम्ही आज पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहोत, त्यातलं हे एक महत्वाचे अंग आहे. मी राजकारणावरती बोलू इच्छित नाही. परंतु 'गरिबी हटाव' असा शब्द वापरला जातो, तो निव्वळ काही आर्थिक शब्द नाही आहे. त्यात संस्काराचा सुध्दा काही भाग आहे. शिक्षण देणं हा सुध्दा त्यातलाच एक भाग आहे. हिंदुस्थानामधील गरीबी विरूध्दची लढाई, जी अवघड झाली त्याच खरं कारण शोधायचं झालं तर, मी म्हणेन मुळातच हे एक कारण आहे की, गेली हजारो वर्षे आम्हाला गरिबी विरूध्दचा राग कुणी शिकवलाच नाही.गरीबीबद्दल संताप यावा आणि ही गरीबी मोडून तोडून टाकावी असं आम्हाला कुणी कधी शिकवलंच नाही. आम्हाला दैववाद शिकवला, आम्हाला प्रारब्धाची थेअरी सांगितली,आम्हाला कर्मथेअरी सांगितल, आणि गतजन्मातील पापपुण्य यांचा या जन्माशी संबंध लावायचं तत्वज्ञान आम्हाला शिकवलं गेलं! मला वाटतं हे मोडणं हा सुध्दा गरीबीच्या लढाईतील एक भाग आहे आणि म्हणून शिक्षणाच्या पाठीमागच्या प्रेरणा बदलण्याचा आजचा काळ आहे. त्याचबरोबर आजच्या आर्थिक जीवनाच्या ज्या अपेक्षा आणि आकांक्षा आहेत त्यांच्याशी हे शिक्षण जर कुठे जोडलं गेलं नाही, तर शिक्षण हे संकट होऊन बसलं आहे अस मानाव लागेल.''[१९] आमच्या शिक्षणाची पुनर्रचना मुळापासून केली तरच आमच्या देशातल्या शिक्षित बेकारांचा प्रश्न सुटू शकेल. आजच्या शाळेतून निघालेला विद्यार्थी हा गरीबीबद्दलचा राग असणारा विद्यार्थी असावा, गरीबाबद्दलची सहानुभुती बाळगणारा आणि त्याला मदत करणारा असावा. देशामध्ये जे नवे युग निर्माण होत आहे त्याचा पाईक असावा. मनानं, बुध्दीन व भावनेनं तो भारलेला असावा असे यशवंतरावांचे मत आहे. हे जर घडलं तर शिक्षणाचा उपयोग आहे. अन्यथा शिक्षण हे एक संकट होऊन बसेल.सभोवतालचे निराशाजनक वातावरण पाहून आशेच्या किरणासाठी यशवंतरावजी शिक्षणक्षेत्राकडे मोठया आपेक्षेने पाहात होते. मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो. केंद्रामध्ये संरक्षणमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि अर्थमंत्री या नात्यानी प्रदीर्घ काळ काम करण्याची संधी मला मिळाली. पण शिक्षणमंत्री होण्याची संधी मात्र मिळाली नाही अशी खंत त्यांनी एका समारंभात व्यक्त केली होती. त्यांनी शिक्षणाविषयीचा आपला आशावाद कधीही ढळू दिला नाही.''कारण शिक्षणाविषयीची निराशा ही भविष्याविषयीची निराशा होय.''[२०] शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण प्रगतीचे मूळ कारण आहे. शिक्षणाने माणूस सुसंस्कृत, विचारी, शहाणा झाला पाहिजे, त्याच्या ठिकाणी दुसऱ्याच्या सुख - दु:खाविषयी विचार करण्याची शक्ती आली पाहिजे असे यशवंतरावाचे मत होते. ते पुढे म्हणतात, ''समाज जीवनाच्या विविध गरजांशी शिक्षणाचा सांधा जोडला पाहिजे त्यावाचून आजची निराशेची व वैकल्याची भावना जाणार नाही.''[२१] यशवंतरावांच्या वरील शैक्षणिक विचारांमध्ये सर्वांगीण दृष्टी असल्याचे दिसून येते.



Scanned by CamScanner

**निष्कर्ष:** शिक्षणा शिवाय व्यक्तिगत जीवनाचा, कौटुंबिक जीवनाचा आणि सामाजिक जीवनाचा विकास होऊ शकत नाही. देशाचा आर्थिक विकास आणि लोकशाहीचे भवितव्य या दोन्हीही गोष्टी शिक्षणप्रसारावर अवलंबून आहेत. हे जाणून यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्याची शैक्षणिक धोरणे आखली. शिक्षण क्षेत्रात क्रांती घडविणारे असे अनेक निर्णय यशवंतरावजींच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना करून शिक्षणाची गंगा सामान्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न केला. माध्यमिक शिक्षणामध्ये सुसुत्रता निर्माण होण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची' स्थापना केली. शैक्षणिक कार्याला गती देण्यासाठी पुस्तकी शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणापर्यंत विविधांगी कार्यक्रम त्यांनी मोठ्या प्रमाणावर सुरू केले.आर्थिकदृष्ट्या मागास वर्गासाठी मोफत शैक्षणिक सवलती (EBC), सातारा सैनिक स्कूलची स्थापना , मराठवाडा विद्यापीठाची स्थापना, शिवाजी विद्यापीठाची स्थापना, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या स्थापनेत योगदान आहे.यशवंतरावांच्या शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्रामध्ये प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन व उच्च शिक्षणामध्ये महाराष्ट्र हे प्रगत राज्य बनले. यशवंतरावांनी ग्रामीण गरीब, शेतकरी, मागास, दलित विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिली. यशवंतरावांनी केलेल्या विविधांगी शैक्षणिक कार्यामुळे आणि यशवंतरावांच्या शैक्षणिक विचारामुळे महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास घडून आला. यशवंतरावांचे शैक्षणिक कार्य आणि विचार आधुनिक महाराष्ट्राच्या पुनर्बांधणीमध्ये महत्वाचे आहे.

**संदर्भ सुची%** १.चव्हाण यशवंतराव, *'सह्याद्रीचे वारे '*भाषण संग्रह , मुंबई-महाराष्ट्र शासन,प्रसिध्दी विभाग, १९६२ - पृष्ठ-१५६.
२.यशवंतराव चव्हाण, *युगांतर,* (निवडक भाषणांचा संग्रह)पुणे-कॉन्टिनेन्टल प्रकाशन -१९७०- पृष्ठ-१८०-८१.
३.उपरोक्त, चव्हाण यशवंतराव, *सह्याद्रीचे वारे* - पृष्ठ-१५६-१५७
४.दैनिक, ग्रामोध्दार, *१२ मार्च १९९३,* चा अंक.
५.पाटील विठ्ठल, पाटील वसंत, *यशवंतराव विचार आणि वारसा,* प्रकाशन -कराड,दीपक वि.पाटील-१९८९,पृष्ठ-२२.
६.उपरोक्त, चव्हाण यशवंतराव, *युगांतर,* पृष्ठ-१८०-१८१.
७.उपरोक्त, चव्हाण यशवंतराव, *सह्याद्रीचे वारे,* पृष्ठ-१४६
८.कित्ता- पृष्ठ-१४७-४८
९.उपरोक्त, चव्हाण यशवंतराव, *युगांतर,* पृष्ठ - १७२.
१०.उपरोक्त, चव्हाण यशवंतराव, *सह्याद्रीचे वारे,* पृष्ठ - १४८.
११.कित्ता- पृष्ठ - २६.
१२.उपरोक्त, चव्हाण यशवंतराव, *युगांतर,* पृष्ठ - १७१.
१३.कित्ता- पृष्ठ - १७२-१७३.
१४.कित्ता- पृष्ठ - १७०-१७१.
१५.सूर्यवंशी उत्तम, (सं.) *मराठी मातीचे वैभव,*सांगाती प्रकाशन,नांदेड-१९८९, पृष्ठ - १४२.
१६.कित्ता- पृष्ठ - १३९.
१७.बाबर सरोजिनी,(संपादिका) *मी पाहिलेले यशवंतराव,* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रकाशन, मुंबई, १९८८, पृष्ठ-११.
१८.कित्ता- पृष्ठ- ३-४
१९.श्री. शिवाजी शिक्षण संस्था, श्री. शिवाजी विद्यालय कराड, रौप्य महोत्सव, *स्मृती ग्रंथ,* १९४५- १९७०, ११-४-१९७१, पृष्ठ - १७१.
२०.उपरोक्त, सुर्यवंशी उत्तम, पृष्ठ - १४५.
२१.चव्हाण यशवंतराव, *'भूमिका',* पुणे-प्रेस्टिज पब्लिकेशन ,१९७९, पृष्ठ - १६४.



Scanned by CamScanner